: तारेचा पत्ता :
"कॉपशुगर" बारामती

विना सहकार नही उद्धार

: टेलिफोन नंबर :
५७ बारामती.

महाराष्ट्रातील सहकारी तत्वावर उभारणी केलेल्या साखर धंद्यात अल्पकाळांत अग्रगण्य ठरलेला व भारत सरकारच्या सहकारी तत्त्वप्रणित औद्योगीक समृद्धी व सेवेसाठीं सदैव तत्पर

## दि माळेगांव सहकारी साखर कारखाना, लि., माळेगांव

( बु० शिवनगर )

## तालुका बारामती, जिल्हा पुण

[ रजिस्टर नंबर जी–२६६ दिनांक, २४।२।१९५५. ]

शेतकऱ्यांची ही सहकारी संस्था यशस्वी करण्यासाठी जे लहान मोठे भागीदार, कामगार, अधिकारी व हितचिंतक यांनी आपलें सर्वस्व अर्पिलें त्या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद.

—० कारखान्याची वाटचाल ०—

| सन | ऊंस गळीत मे. टन | साखर निर्मिति | साखरेचा उतारा [ रिकव्हरी ] |
|---|---|---|---|
| १९५७–५८ | १,०४,६०५ मे. टन | १,१७,९६२ | ११.६३ |
| १९५८–५९ | १,३०,३३३ मे टन | १,५७,७६१ | १२.४३ |
| १९५९–६० | १,३७,३६२ मे. टन | १,६६,८४५ | १२.४६ |
| १९६०–६१ | १,६७,००७ मे. टन | २,१०,१७१ | १२.५९ |
| १९६१–६२ | १,६६,४६१ मे. टन | २,१३,२०५ | १२ ८२ |
| १९६२–६३ | १,८०,८६१ मे. टन | २,१७,२०२ | १२.०० |
| १९६३–६४ दिनांक १७-३-६४ अखेर | १,५९,३७० मे. टन | १,१२,९५९ पांढरी साखर<br>८२,७५० रॉ शुगर | १२.४८ |

—: कार्यकारी संचालक मंडळ :—

१. श्री. वीरसिंह चंद्रसेन जाधवराव, चेअरमन
२. श्री. शिवलिंग संगमनाथ हिरेमठ, व्हा. चेअरमन बी. एससी., एलएल. बी., (वकील)
३. श्री. रामचंद्र महादेव मोंगळे, डायरेक्टर
४. श्री. शंकरराव गणेश दाते, डायरेक्टर
५. श्री. उद्धवराव लक्ष्मणराव इंगुले, डायरेक्टर
६. श्री. गंगाधर व्यंकटराव तावरे, बी. एससी. ( ॲग्री. ) डायरेक्टर
७. श्री. गुलाबराव साहेबराव ढवाण, डायरेक्टर
८. श्री. सुभेदार मारुतराव आटोळे, डायरेक्टर
९. श्री. शंकरराव साधुजी गोफणे, डायरेक्टर
१०. श्री. दत्तात्रय पर्वती गावडे, डायरेक्टर
११. श्री. श्रीरंगराव कृष्णराव जगताप, डायरेक्टर
१२. श्री. नारायणराव संभाजी देवकाते, डायरेक्टर
१३. श्री. एन. डी. वैद्य, बी. कॉम., जी. डी. सी. ए. इंड. फाय. कार्पो. प्रतिनिधी
१४. श्री. डब्ल्यू. टी वसू, महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बॅन्क लि., प्रतिनिधी
१५. मेजर गुलाबराव बापूसाहेब देशमुख, मॅनेजिंग डायरेक्टर


खेड्यातील व स्थितीतील मुलांना
चार प्रबळ झाला. म्हणूनच महा-
णाची ' स्थाने ' ग्रामीण भागात
अशा महाविद्यालयांना परवानगी
जनताभिमुखी उदार धोरण स्वीकारले.
शब्दविद्या नाही. प्रत्यक्षाच्या आधारे
चे गूढ उकलू पाहात आहे. तांत्रिक
विश्व हेच मनुष्यास वश होत आहे.
ने माणूस एकमेकाच्याजवळ येत आहे.
स प्राप्त व्हावे म्हणून ग्रामीण विभागातील
परिसरात महाविद्यालये निर्माण केली.
स्थापणे, तिच्यासाठी अविरत झिजणे,
विकास साधणे हे एक श्रेष्ठ विधायक
संस्थांना मदत करणे हे

त्या विभागातील स्थानिक नेतृत्व पुढें येत आहे. म्हणूनच अशा संस्थांच्या व्यवस्थापनातही नवे नवे प्रश्न उत्पन्न होत आहेत. त्यांत स्थानिक जाणीव फार महत्त्वाची आहे. अशा जाणीवेत कधी राजकीय पक्षाचे प्रभुत्व आढळते, कधी पैशाचा पुरवठा करणाऱ्या सधन हाताचे प्रभुत्व असते तर कधी एखाद्या जमातीचा प्रभाव तेथे दिसून येतो. हे असे असणे अस्वाभाविक वा अकारण असते असे मात्र नाही. पण हे असेंच चालू राहणे मात्र अस्वाभाविक ठरेल. हळू हळू कां होईना शिक्षणक्षेत्र हे शिक्षकांच्याच प्रभुत्वांत आले पाहिजे. शिक्षण-संस्थांचे शासन हे शिक्षकांच्याच समु-दायात विभागले गेले पाहिजे. शिक्षण-मंदिरात पक्षोपपक्ष, वैयक्तिक हेवेदावे यांचा शिरकाव न होऊ देता एक निश्चित आचार संहिता निर्माण करून कोणत्याही संस्थेचे

# MARCH 1965

अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, पुणे
...सिद्धिरनेकान्तात्...
बारामती कॉलेज, बारामती.

*Editor in Chief :*
A. A. PATIL
*Managing Editor :*
R. M. DOSHI

: तारेचा पत्ता :
"कॉपशुगर" बारामती

विना सहकार नही उद्धार

: टेलि
५७

महाराष्ट्रातील सहकारी तत्वावर उभारणी केलेल्या साखर धंद्यात अल्पकाळांत अ
व भारत सरकारच्या सहकारी तत्वप्रणित औद्योगीक समृद्धी व सेवेसाठीं स

दि माळेगांव सहकारी साखर कारखाना, लि., माळेग

( मु० शिवनगर )

तालुका बारामती, जिल्हा पुण

[ रजिस्टर नंबर जी–२६६ दिनांक, २४।२।१९५५. ]

शेतकऱ्यांची ही सहकारी संस्था यशस्वी करण्यासाठी जे लहान मोठे भागीदार,
अधिकारी व हितचिंतक यांनी आपलें सर्वस्व अर्पिलें त्या सर्वांना मनःपूर्वक ध

वाटचाल ०—

Prin. A. A. PATIL, M.A., M.Ed. Editor - in - chief, - Chairman
Prof. R. M. DOSHI, M.A. (Max.), M.A. (Eng.), B.T. Managing Editor
Prof. K. F. CHORDIA, M.A. (Ardha Ma.), M.A. (Hindi). Pandit
Prof. N. G. LONDHE, M.A.
Prof. Miss. M. C. DALVI, M.Sc.
Prof. D. T. PATIL, M.A., B.Ed.
Shri ANANTKUMAR LALGUNKAR, Students' Representative

खेड्यातील व स्थितीतील मुलांना
विचार प्रबळ झाला. म्हणूनच महा-
क्षणाची ' स्थाने ' ग्रामीण भागात
. अशा महाविद्यालयांना परवानगी
जनताभिमुखी उदार धोरण स्वीकारले.
शब्दविद्या नाही. प्रत्यक्षाच्या आधारे
चाचे गूढ उकलू पाहात आहे. तांत्रिक
विश्व हेच मनुष्यास वश होत आहे.
साने माणूस एकमेकाच्याजवळ येत आहे.
स प्राप्त व्हावे म्हणून ग्रामीण विभागातील
परिसरात महाविद्यालये निर्माण केली.
था स्थापणे, तिच्यासाठी अविरत झिजणे,
विकास साधणे हे एक श्रेष्ठ विधायक
संस्थांना मदत करणे हे ...

त्या विभागातील स्थानिक नेतृत्व पुढें येत आहे. म्हणूनच अशा संस्थांच्या व्यवस्थापनातही नवे नवे प्रश्न उत्पन्न होत आहेत. त्यांत स्थानिक जाणीव फार महत्त्वाची आहे. अशा जाणीवेत कधी राजकीय पक्षाचे प्रभुत्व आढळते, कधी पैशाचा पुरवठा करणाऱ्या सधन हाताचे प्रभुत्व असते तर कधी एखाद्या जमातीचा प्रभाव तेथे दिसून येतो. हे असे असणे अस्वाभाविक वा अकारण असते असे मात्र नाही. पण हे असेंच चालू राहणे मात्र अस्वाभाविक ठरेल. हळू हळू कां होईना शिक्षणक्षेत्र हे शिक्षकांच्याच प्रभुत्वांत आले पाहिजे. शिक्षण-संस्थांचे शासन हे शिक्षकांच्याच समु-दायात विभागले गेले पाहिजे. शिक्षण-मंदिरात पक्षोपपक्ष, वैयक्तिक हेवेदावे यांचा शिरकाव न होऊ देता एक निश्चित आचार संहिता निर्माण करून कोणत्याही संस्थेचे

# संपादकीय

आमच्या बारामती महाविद्यालयाचे तिसरे वर्ष पूर्ण होत आहे आणि लवकरच चवथे वर्ष सुरु होईल. अशा संधिकालात आमच्या नियतकालिकाचा हा वार्षिक अंक आम्ही आमचे विद्यार्थी, प्राध्यापक आणि असंख्य हितचिंतक यांच्या हाती देत आहोत. आमच्या महा-विद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांनी निर्माण केलेले साहित्य प्रसिद्ध करणे हा तर या अंकाचा प्रमुख हेतु आहेच. पण त्याचबरोबर प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी आणि संस्थेचे व्यवस्थापक मंडळ या सर्वांच्या सहवासातून जे सुसंस्कृत, संघटित व ज्ञानोपासक जीवन निर्माण होते त्याचे दर्शन घडविणे हाही या अंकाचा महत्त्वाचा उद्देश आहे. या हेतूंच्या सिद्धीसाठी येथे काही विचार आम्ही व्यक्त करीत आहोत.

१९६४–६५ या एका शैक्षणिक वर्षांत जगात आणि भारतात अशा किती तरी घटना घडल्या आहेत की, ज्यांची दखल प्रत्येकांनी घेतलीच पाहिजे. २७ मे १९६४ रोजीं भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचे महान् अध्वर्यु व लोकशाही भारताचे थोर पंतप्रधान पं. **जवाहरलाल नेहरू** यांचा अकस्मात् अंत झाला. लोकशाही, जागतिक शांतता आणि विज्ञान व अध्यात्म यांचा संगम या तीन गोष्टीसाठीच हा आमचा महान् नेता आमरण कष्ट करीत होता. त्यांच्या पवित्र स्मृतीस आम्ही अभिवादन करतो आणि आदरांजली वाहतो.

पं. जवाहरलालजीनंतर आमच्या देशाच्या संसदेने श्री. लालबहादूर शास्त्री यांना पंतप्रधान म्हणून निवडले.

: तारेचा पत्ता :
"कॉपशुगर" बारामती

विना सहकार नही उद्धार

महाराष्ट्रातील सहकारी तत्वावर उभारणी केलेल्या साखर धंद्यात अल्पकाळांत
व भारत सरकारच्या सहकारी तत्वप्रणित औद्योगीक समृद्धी व सेवेसाठीं

## दि माळेगांव सहकारी साखर कारखाना, लि., माळे

( बु० शिवनगर )

## तालुका बारामती, जिल्हा पुण

[ रजिस्टर नंबर जी–२६६ दिनांक, २४।२।१९५५. ]

शेतकऱ्यांची ही सहकारी संस्था यशस्वी करण्यासाठी जे लहान मोठे भागीदार, अधिकारी व हितचिंतक यांनी आपलें सर्वस्व अर्पिलें त्या सर्वांना मनःपूर्वक

ना उपलब्ध करून दे... इत्यादि सर्व प्रश्नांबा... हे महामंडळ योग्य मार्ग...

...यक धोरणही प्रगत... हे स्वागतार्हच आहे... व कुलगुरु हे गेल्या... याचे कुलपतित्व... कुलगुरुत्व विद्यापीठ... वैभव वाढवतील...

आहे. या सव चालू घटनांचा अभ्यास [illegible] ची विद्यार्थ्यांनी तरी चिकित्सेने केला पाहिजे.

रशियाचे कर्तबगार व स्वतंत्रबुद्धीचे पंतप्रधान श्री. क्रुश्योव्ह यांना अचानक पदच्युत व्हावे लागले; पण अपेक्षेप्रमाणे त्यामुळे रशियाच्या कोणत्याच धोरणात बदल झाला नाही हे विशेषच म्हणावे लागेल! चीनने ॲटम बॉंबचे स्फोट केले आणि ॲफ्रो आशियाई राजकारणात आधिकाधिक नेतृत्व संपादन केले यात शंका नाही. रशियाने अंतराळात माणूस तरंगत ठेवला आणि सर्वांचीच दृष्टी क्षणभर थक्क झाली. हॉइल-नारळीकर याच्या संशोधनाने विश्वाचे गूढ उकलण्यास मदत होईल असा आशावाद सर्वत्र प्रकट केला गेला.

राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय प्रश्नावर दृष्टिक्षेप टाकून शैक्षणिक विश्वाकडे वळणे बरे. भारताचे शिक्षण मंत्री बॅ. छगला यांनी विद्यापीठ अनुदान मंडळाचे अध्यक्ष डॉ. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली जें शिक्षणविषयक महामंडळ नेमले आहे त्या मंडळाने आपल्या कार्यास आरंभ केला आहे. माध्यम भाषा, शिक्षणाचा दर्जा सुधारणे, उच्च-शिक्षण राज्य सरकार व केंद्र सरकार या दोघांचा विषय करणे, विज्ञानाचे अधिकाधिक संशोधन होणे, शैक्षणिक संस्थाचे विकेंद्रीकरण करणे, शिक्षण क्षेत्रातील सर्व स्तरातील शिक्षकांची आर्थिक स्थिति सुधारणे, कोणतेही

वाटचाल ०—

ग्रामीण [illegible] र्थ्यांच्या समस्या—

आमचे 'बारामती महाविद्यालय' हे ग्रामीण विभागात आहे म्हणूनच या समस्यांचा आम्ही विचार करतो आहोत असे नाही. देशातील शिक्षणतज्ज्ञानी आणि विचारवंतानी आता ग्रामीण भागातील शिक्षणासंबंधी अधिकाअधिक विचार केला पाहिजे अशी स्थिति आली आहे. अन्न आणि आरोग्याप्रमाणेच शिक्षण हेही आता मूलभूत गरजेत समाविष्ट झाले आहे. आमच्या राष्ट्राच्या मानेवरील पारतंत्र्याचे जोखड बाजूस फेकल गेले. त्या भारताच्या सर्वांगीण विकासास आरंभ झाला. विकासात शिक्षणाचे स्थान फार वरच्या दर्जाचे आहे. प्राथमिक अथवा माध्यमिक शिक्षणच नव्हे तर महाविद्यालयीन शिक्षण घेणे हाही जनतेचा हक्क आहे याची जाणीव देशात फार मोठ्या प्रमाणात निर्माण झाली. दळणवळणाची साधने नाहीत, आर्थिक स्थिति बरोबर नाही. पालक अशिक्षित आहेत. जमात भटकी आहे अथवा मागासलेली आहे अशा नानाविध कारणांनी ग्रामीण विभागातील शिक्षणाचा प्रश्न आजवर बिकट झालेला होता. पण राजकीय स्वातंत्र्याबरोबरच या प्रश्नाच्या सोडवणुकीस जनतेने स्वतः होऊन आरंभ केला. जे शिक्षण मुंबई–पुण्यातील विद्यार्थ्यांना मिळते, जे शिक्षण सामाजिक दृष्ट्या प्रगत अशा कुटुंबातील मुलांना मिळते

तेच शिक्षण कोणत्याही खेड्यातील व स्थितीतील मुलांना मिळाले पाहिजे, हा विचार प्रबळ झाला. म्हणूनच महाविद्यालयीन उच्च शिक्षणाची 'स्थाने' ग्रामीण भागात निर्माण होऊ लागली. अशा महाविद्यालयांना परवानगी देऊन विद्यापीठानेही जनताभिमुखी उदार धोरण स्वीकारले. ज्ञान म्हणजे केवळ शब्दविद्या नाही. प्रत्यक्षाच्या आधारे आजचा मानव विश्वाचे गूढ उकलू पाहात आहे. तांत्रिक ज्ञानाने पंचभूतमय विश्व हेच मनुष्यास वश होत आहे. समाजाच्या अभ्यासाने माणूस एकमेकाच्याजवळ येत आहे. असे हे ज्ञान आपणास प्राप्त व्हावे म्हणून ग्रामीण विभागातील लोकांनीआपल्या परिसरात महाविद्यालये निर्माण केली. अशी एखादी संस्था स्थापणे, तिच्यासाठी अविरत झिजणे, तिचा सर्वतोपरि विकास साधणे हे एक श्रेष्ठ विधायक कार्य आहे. अशा संस्थांना मदत करणे हे केंद्री अथवा प्रांतीय सरकारचे तर कार्य आहेच पण सत्तेच्या विकेंद्रीकरणातून जनहितास्तव निर्माण झालेल्या जिल्हा परिषदांचे व पंचायत समितींचेही ते कार्य आहे. आपल्या अधिसत्तेच्या कक्षेत येणाऱ्या जनतेच्या जीवनाचे महत्त्वाचे अंग जेथे घडविले जाते, सुसंस्कारित केले जाते त्या उच्च शैक्षणिक संस्थांना त्यांनी मदत करणे हेही आवश्यक ठरते. गेल्या काही वर्षांतच पुणे विद्यापीठाच्या अधिकार क्षेत्राचा विचार केला तरी महाड, अलिबाग, जळगाव, कोपरगाव, कर्जत, श्रीरामपूर, संगमनेर, बारामती, फैजपूर, भुसावळ, शिरपूर नंदुरबार अशा किती तरी ठिकाणी महाविद्यालये निर्माण झाली. हीही एक वैचारिक क्रांती आहे. यातून निश्चितपणे नवे जीवन घडत आहे.

ग्रामीण परिसरातील महाविद्यालयांच्या संदर्भात एक महत्त्वाचा विचार सहजासहजी सुचून जातो तो असा की, पूर्वीच्या शिक्षणसंस्था बहुधा शिक्षणक्षेत्रातील कार्यकर्त्यांच्या अथवा शिक्षकांच्याच पुढाकारानें निघत असत. कधीं **कर्मवीर भाऊराव पाटील** अथवा महर्षी **धोंडो केशव कर्वे** अशा एखाद्या ऋषितुल्य व्यक्तीभोवती शिक्षक एकत्रित येत आणि एक श्रेष्ठ दर्जाचे कार्य वटवृक्षाप्रमाणे उभे राही. पण अलीकडे ज्या संस्था निर्माण होत आहेत त्यांत त्या

त्या विभागातील स्थानिक नेतृत्व पुढें येत आहे. म्हणूनचं अशा संस्थांच्या व्यवस्थापनातही नवे नवे प्रश्न उत्पन्न होत आहेत. त्यांत स्थानिक जाणीव फार महत्त्वाची आहे. अशा जाणीवेत कधी राजकीय पक्षाचे प्रभुत्व आढळते, कधी पैशाचा पुरवठा करणाऱ्या सधन हाताचे प्रभुत्व असते तर कधी एखाद्या जमातीचा प्रभाव तेथे दिसून येतो. हे असे असणे अस्वाभाविक वा अकारण असते असे मात्र नाही. पण हे असेंच चालू राहणे मात्र अस्वाभाविक ठरेल. हळू हळू कां होईना शिक्षणक्षेत्र हे शिक्षकांच्याच प्रभुत्वांत आले पाहिजे. शिक्षण-संस्थांचे शासन हे शिक्षकांच्याच समुदायात विभागले गेले पाहिजे. शिक्षण-मंदिरात पक्षोपपक्ष, वैयक्तिक हेवेदावे यांचा शिरकाव न होऊ देता एक निश्चित आचार संहिता निर्माण करून कोणत्याही संस्थेचे व्यवस्थापक मंडळ व प्रत्यक्ष त्या संस्थेंत कार्य करणारे लोक त्या आचारांचे काटेकोर पालन करीत राहतील तर कार्य निर्विघ्नपणे प्रगत होईल.

### महाविद्यालयातील प्राध्यापक—

इंग्रजीतील 'College' या शब्दासाठी आपण 'महाविद्यालय' हा संस्कृत शब्द वापरतो. परंतु College मधील मूळ कल्पना त्यात समाविष्ट होतेच असे वाटत नाही. ज्ञानोपासनेसाठी एकत्र आलेल्या सहकाऱ्यांनी निर्माण केलेले मंडळ म्हणजे 'कॉलेज'. यांत प्राध्यापक, विद्यार्थी, कॉलेजमधील सर्व प्रकारचा सेवकवर्गही येतो. या सर्वांचे एक सामुदायिक जीवन तेथे तयार होते. आज संख्यावृद्धीमुळे शहरात तरी 'कॉलेज' ऐवजी खऱ्या अर्थाने 'महाविद्यालये' निर्माण झाली आहेत. त्यामुळेच प्राध्यापकातही शिक्षकास आवश्यक असणारे गुण फारच कमी प्रमाणात आढळतात. शहरातील प्राध्यापकवर्ग हा ग्रामीण भागातील प्राध्यापक वर्गापेक्षा प्रगत आणि श्रेष्ठ दर्जाचा असतो असाही एक गैरसमज पसरविण्यात येत असतो, पण त्यांतही काही तथ्य नाही. उत्तम प्रतीचे ग्रंथालय व प्रयोगशाळा, सुंदर निवासस्थाने, वाहनांची सोय इत्यादि बाह्य साधने उपलब्ध करून दिल्यास ग्रामीण भागातील प्राध्यापकही

: तारेचा पत्ता :
"कौपगुगर" बारामती

विना सह...

महाराष्ट्रातील सहकारी ...

... नवल! ज्ञानाची वाढ नेहमीच ... अनुभवाविषयी प्राध्यापकातआदर ... अनुभवाने स्थिर व पक्व होते. अनुभवाच्या ... पाहिजे, ... समाजाचे स्थैर्य टिकते.

प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांविषयीं सुद्धा आदर बाळगावा. त्यांच्याशी समरस व्हावे. पण सत्त्व टिकवूनच त्याने विद्यार्थ्यांत मिसळले पाहिजे. खेळीमेळीने विद्यार्थ्यांशी वागणे म्हणजे आपले 'गुरुत्व' सोडणे नव्हे. प्राध्यापकांच्या वागण्यात थोडेही संयमाचा अभाव झाला की, विद्यार्थी त्यांच्याविषयी आदर बाळगू शकत नाहीत. प्राध्यापकांच्या शिकवण्याप्रमाणेच त्यांच्या आचरणानेही विद्यार्थी प्रभावित होत असतो. विद्यार्थ्यांना जो विषय आपण शिकवितो त्याचा तर अभ्यास केलाच पाहिजे; पण त्याचबरोबर प्राध्यापकांनी आपल्या विद्यार्थ्यांचाही अभ्यास केला पाहिजे. म्हणूनच 'तास' संपला की प्राध्यापकांचे कार्य संपत नाही. विद्यार्थ्यांचा गुरु, मित्र व मार्गदर्शक नेता अशी विविध भूमिका प्राध्यापक पार पाडीत असतात. जर विद्यार्थ्यांनी उभारलेल्या चळवळीत आणि हुल्लडबाजीत प्राध्यापकच अनुयायी बनून स्वतःला झोकून देऊ लागले तर ते एक शिक्षणाचे दुर्दैवच!

**विद्यार्थ्यांच्या समस्या--**

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांत जो थोडासा बेजबा... दिसून येतो त्यासंबंधी ...

... उल्लंघन करू लागली तर मात्र ती दंडनीय होईल. अशा दंड झाला तर त्यांत पालकांनीही शिक्षण-संस्थेचीच बाजू घेतली पाहिजे. तरच शिक्षणाची प्रकृती निकोप राहील.

आमच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्याच्या वेळी भारतीय विद्यार्थी स्वातंत्र्याच्या ध्येयवादाने वेडा झालेला होता. आज ते 'वेड' उरले नाही. पण डोके मात्र रिकामे आहे. आणि तरीही भडकलेले आहे. राष्ट्राच्या प्रश्नांचा आत्मीयतेने त्याच्याकडून अभ्यास होत नाही. वाडवडिलांनी कमावलेल्या पैशावर स्वतःचा मोठेपणा मिरवीत हा विद्यार्थी आषाढातील मेघांच्या आगमनाबरोबरच महाविद्यालयात प्रविष्ट होतो. विद्या ज्या विनयाने, नम्रतेने उपासावयाची तो विनय किंवा ती नम्रता बहुतेक विद्यार्थ्यांत दिसत नाही. प्राचार्य किंवा प्राध्यापक जवळ आले तर आपण उभे राहून त्यांचा मान राखावा ही गोष्ट न सांगता त्यांना समजू शकत नाही. विनय म्हणजे भोळेपणा नव्हे. पण ज्ञानी हा नम्र व विनयीच असतो. आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य अ. आ. पाटील यांनी शिक्षण, शिक्षण-संस्था, प्राध्यापक, विद्यार्थी व संस्थेचे संचालक मंडळ यासंबंधी वेळोवेळी जे विचार ... आम्ही येथे मांडले ...

...कातील ब्रह्म गुणदासविरचित ... प्रसिद्ध करविण्याचेही ...

... वाय्. बी. एस्सी. चा अभ्यासक्रम ... करता आला नाही. परंतु बी. ए. व बी. एस्. अभ्यासक्रमांचे एस्. वाय्. चे वर्ग निघाले. चालू वर्षी या प्रदेशांतील गरज लक्षात घेऊन 'टीचर्स डिप्लोमा' (T. D.) ... हायस्कुलातील शिक्षकांना या अभ्यासक्रमाचा फार उपयोग झाला. टी. डी. च्या वर्गात एकंदर ३२ विद्यार्थी शिक्षण घेत होते. प्रा. सौ. वत्सलाबाई अ. पाटील एम्. एड्. यांच्या शिक्षणशास्त्रांतील व्यासंगाचा व अनुभवाचा विद्यार्थ्यांना विशेषच उपयोग झाला. प्रा. डी. टी. पाटील यांनी टी. डी. विभागाचे प्रमुख या नात्याने बरेच श्रम घेतले. बारामती येथील मिशन हायस्कूल व प्राथमिक शाळा, श्री. छत्रपती शाहू हायस्कूल व म. ए. सो. हायस्कूल यांनी पाठांसाठी आपल्या शाळांचा उपयोग करू दिला याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

बी. ए. स्पेशलसाठी मराठी, इतिहास, अर्थशास्त्र, या विषयांची सोय करण्यात आली असून बी. ए. जनरलसाठी राज्यशास्त्र, इंग्रजी, हिंदी व गणित या विषयांची सोय करण्यात आली आहे.

१९६४-६५ या वर्षात आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची एकूण संख्या ३१२ होती. त्यात ७० मुली होत्या, यातील बहुसंख्य विद्यार्थी बारामतीच्या परिसरातील ग्रामीण भागातून आलेले आहेत. आमच्या महाविद्यालयाला भव्य व प्रशस्त अशी इमारत नसल्यामुळे विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना बऱ्याच गैरसोयी सहन कराव्या ...

... खोदण्याचा समारंभ पार पडला. ... लवकरच तेथे उभी ... लयाची वसतिगृहाची भव्य इमारत ... राहील अशी आशा आम्ही व्यक्त करीत आहोत.

आमच्या महाविद्यालयात एन्. सी. सी. चे शिक्षण दिले जाते. या वर्षी 'बी' सर्टिफिकेट परीक्षेस ३६ कॅडेटस् व 'सी' सर्टिफिकेट परिक्षेस २ कॅडेट्स बसले आहेत.

ता. ३० नोव्हेंबर १९६४ रोजी अनेकान्त ए. सोसायटीच्या संचालक मंडळाचे सभासद व सुप्रसिद्ध उद्योगपती श्रीमान लालचंद हिराचंद दोशी यांचा त्यांच्या षष्ट्यब्दिपूर्तिनिमित्त आमच्या महाविद्यल्यात सत्कार करण्यात आला. श्रीमान लालचंदजींच्या पत्नी सौ. ललितावेन आणि स्व. मोतीचंद गौतमचंद यांच्या पत्नी श्रीमती कुसुमवेन याही या प्रसंगी उपस्थित होत्या.

९ जानेवारी १९६५ रोजी आमच्या महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे-महाराष्ट्राचे झुंजार पत्रकार आचार्य प्र. के. अत्रे यांचे सुश्राव्य असे भाषण झाले. आपल्या भाषणात त्यांनी आमच्या प्राचार्यांचा 'ध्येयवादी प्राचार्य' म्हणून गौरव केला आणि बारामती महाविद्यालयास सर्वांनी साहाय्य करावे असे त्या प्रसंगी उपस्थित असलेल्या बारामतीच्या बहुसंख्य नागरिकांना कळकळीचे आवाहन केले.

... वरील सर्व उपक्रमाबद्दल त्या त्या प्राध्यापकाचे आम्ही हार्दिक अभिनंदन करतो.

... निकाल

... विद्याशाखांचे निकाल ... लागले आहेत. या ...

आनंदाने कार्य करतील यात शंका नाही. प्राध्यापक अथवा शिक्षक यांचा पेशा हा थोडासा त्यागाने व तपश्चर्येनेच वैभवाला येणारा आहे; पण याचा अर्थ हा नव्हे की, त्यांची समाजाने कुचंबणा करावी. आजची सामाजिक प्रतिष्ठा पैशावर मोजली जाते. शिक्षणक्षेत्रातील लोकांना प्रतिष्ठा व मानसिक समाधान मिळण्यासाठी त्यांची आर्थिक स्थिती सुधारणे आवश्यक आहे.

प्राध्यापकांस शिक्षणाबद्दल प्रेम हवे. विद्यार्थ्यांबद्दल व ज्येष्ठ प्राध्यापकांबद्दल त्यांच्या मनात आदर पाहिजे. वरवरचे ज्ञान, पोशाखी दिखाऊपणा यामुळे लवकरच पदरी निराशा न आली तरच नवल! ज्ञानाची वाढ नेहमीच परंपरेने होते. म्हणूनच अनुभवाविषयी प्राध्यापकातआदर पाहिजे. विद्वत्ता अनुभवाने स्थिर व पक्क होते. अनुभवाच्या आदरामुळेच समाजाचे स्थैर्य टिकते.

प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांविषयीं सुद्धा आदर बाळगावा. त्यांच्याशी समरस व्हावे. पण सत्त्व टिकवूनच त्याने विद्यार्थ्यांत मिसळले पाहिजे. खेळीमेळीने विद्यार्थ्यांशी वागणे म्हणजे आपले ' गुरुत्व ' सोडणे नव्हे. प्राध्यापकांच्या वागण्यात कोठेही संयमाचा अभाव झाला की, विद्यार्थी त्यांच्याविषयी आदर बाळगू शकत नाहीत. प्राध्यापकांच्या शिकवण्याप्रमाणेच त्यांच्या आचरणानेही विद्यार्थी प्रभावित होत असतो. विद्यार्थ्यांना जो विषय आपण शिकवितो त्याचा तर अभ्यास केलाच पाहिजे; पण त्याचबरोबर प्राध्यापकांनी आपल्या विद्यार्थ्यांचाही अभ्यास केला पाहिजे. म्हणूनच ' तास ' संपला की प्राध्यापकांचे कार्य संपत नाही. विद्यार्थ्यांचा गुरु, मित्र व मार्गदर्शक नेता अशी त्रिविध भूमिका प्राध्यापक पार पाडीत असतात. जर विद्यार्थ्यांनी उभारलेल्या चळवळीत आणि हुल्लडबाजीत प्राध्यापकच अनुयायी बनून स्वतःला झोकून देऊ लागले तर ते एक शिक्षणाचे दुर्दैवच!

## विद्यार्थ्यांच्या समस्या--

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांत जो थोडासा बेजबाबदारपणा दिसून येतो त्यासंबंधी अनुभवाने काही विचार आम्ही मांडू इच्छितो. खरोखरच एखादी व्यक्तिगत समस्या असेल तर त्यावर जरूर सहानुभूतीने विचार केला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या अडचणी दूर करणे हे शिक्षणसंस्थांचे कार्यच आहे. पण आपल्या चुकीच्या वर्तणुकीचे समर्थन करावे व त्यासाठी जेव्हा विद्यार्थ्यांत सामूहिक सहानुभूती मिळावी म्हणून प्रयत्न केला जातो तेव्हा मात्र ती एक अक्षम्य घटनाहोऊन बसते. विद्यार्थ्यांनाही काही हक्क आहेत. त्या हक्कासाठी त्यांनी जरूर जाकरुक असले पाहिजे. पण स्वतःच्या वामकृत्याच्या समर्थनासाठी, विध्वंसक प्रवृत्तींच्या जोपासनेसाठी ही जागरूकता अंध होऊन सर्वसामान्य नीतिनियमांचे उल्लंघन करू लागली तर मात्र ती दंडनीय होईल. असा दंड झाला तर त्यांत पालकांनीही शिक्षण-संस्थेचीच बाजू घेतली पाहिजे. तरच शिक्षणाची प्रकृती निकोप राहील.

आमच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्याच्या वेळी भारतीय विद्यार्थी स्वातंत्र्याच्या ध्येयवादाने वेडा झालेला होता. आज ते ' वेड ' उरले नाहीं. पण डोके मात्र रिकामे आहे. आणि तरीही भडकलेले आहे. राष्ट्राच्या प्रश्नांचा आत्मीयतेने त्याच्याकडून अभ्यास होत नाही. वाडवडिलांनी कमावलेल्या पैशावर स्वतःचा मोठेपणा मिरवीत हा विद्यार्थी आषाढातील मेघांच्या आगमनाबरोबरच महाविद्यालयात प्रविष्ट होतो. विद्या ज्या विनयाने, नम्रतेने उपासावयाची तो विनय किंवा ती नम्रता बहुतेक विद्यार्थ्यांत दिसत नाही. प्राचार्य किंवा प्राध्यापक जवळ आले तर आपण उभे राहून त्यांचा मान राखावा ही गोष्ट न सांगता त्यांना समजू शकत नाही. विनय म्हणजे भोळेपणा नव्हे. पण ज्ञानी हा नम्र व विनयीच असतो. आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य अ. आ. पाटील यांनी शिक्षण, शिक्षणसंस्था, प्राध्यापक, विद्यार्थी व संस्थेचे संचालक मंडळ यासंबंधी वेळोवेळी जे विचार व्यक्त केले तेच आम्ही येथे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. कारण त्या विचारात सर्वांना मार्गदर्शन करण्याचे सामर्थ्य आहे असे आम्हाला वाटते.





## बारामती महाविद्यालय : तिसरे वर्ष

आमच्या महाविद्यालयाचे हे तिसरे वर्ष (६४-६५) प्राचार्य अ. आ. पाटील यांच्या सुयोग्य मार्गदर्शनाने व नेतृत्वाने आनंदात पार पडले. आर्थिक अडचणीमुळे सायन्स विभागातील एस्. वाय्. बी. एस्सी. चा अभ्यासक्रम या वर्षी चालू करता आला नाही. परंतु बी. ए. व बी. कॉम्. अभ्यासक्रमांचे एस्. वाय्. चे वर्ग निघाले. चालू वर्षी या प्रदेशांतील गरज लक्षात घेऊन ' टीचर्स डिप्लोमा ' (T. D.) चा अभ्यासक्रम आमच्या महाविद्यालयाने सुरू केला. हायस्कुलातील शिक्षकांना या अभ्यासक्रमाचा फार उपयोग झाला. टी. डी. च्या वर्गात एकंदर ३३ विद्यार्थी शिक्षण घेत होते. प्रा. सौ. वत्सलाबाई अ. पाटील एम्. एड्. यांच्या शिक्षणशास्त्रांतील व्यासंगाचा व अनुभवाचा विद्यार्थ्यांना विशेषच उपयोग झाला. प्रा. डी. टी. पाटील यांनी टी. डी. विभागाचे प्रमुख या नात्याने बरेच श्रम घेतले. बारामती येथील मिशन हायस्कूल व प्राथमिक शाळा, श्री. छत्रपती शाहू हायस्कूल व म. ए. सो. हायस्कूल यांनी पाठांसाठी आपल्या शाळांचा उपयोग करू दिला याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

बी. ए. स्पेशलसाठी मराठी, इतिहास, अर्थशास्त्र, या विषयांची सोय करण्यात आली असून बी. ए. जनरलसाठी राज्यशास्त्र, इंग्रजी, हिंदी व गणित या विषयांची सोय करण्यात आली आहे.

१९६४-६५ या वर्षात आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची एकूण संख्या ३१२ होती. त्यात ७० मुली होत्या, यातील बहुसंख्य विद्यार्थी बारामतीच्या परिसरातील ग्रामीण भागातून आलेले आहेत. आमच्या महाविद्यालयाला भव्य व प्रशस्त अशी इमारत नसल्यामुळे विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना बऱ्याच गैरसोयी सहन कराव्या लागल्या. कॉलेजची मुख्य इमारत, ( घारे बिल्डिंग ) बाघोलीकरांची भिगवण नाक्याजवळील जागा आणि टांकसाळे यांची मळ्यांतील जागा अशा तीन ठिकाणी वर्ग भरत होते. इतके करूनही जागा अपुरी पडल्यामुळे आर्टस् व कॉमर्सचे कॉलेज सकाळी व सायन्स कॉलेज दुपारी भरवावे लागले. वसतिगृहाची स्वतंत्र अशी इमारत नसल्यामुळे अनेक विद्यार्थी विद्यार्थिनींची मागणी असूनही त्यांच्या राहण्याची आम्ही मनाप्रमाणे सोय करू शकत नाही. सध्या बाघोलीकरांच्या इमारतीत व लेंगरेकरांच्या जागेत ( भिगवण रोड ) कांही विद्यार्थ्यांची कशी बशी सोय केली आहे. श्री. गालिंदे बंधूनी कॉलेजला दान दिलेल्या जागेवर वसति गृहाची इमारत लवकरच बांधली जाणार आहे. १७ फेब्रुवारी १९६५ रोजी श्री. सूरजमलजी संघवी यांच्या शुभ हस्ते वसतिगृहाच्या इमारतीचा पाया खोदण्याचा समारंभ पार पडला. बारामती महाविद्यालयाची वसतिगृहाची भव्य इमारत लवकरच तेथे उभी राहील अशी आशा आम्ही व्यक्त करीत आहोत.

आमच्या महाविद्यालयात एन्. सी. सी. चे शिक्षण दिले जाते. या वर्षी ' बी ' सर्टिफिकेट परीक्षेस ३६ कॅडेटस् व ' सी ' सर्टिफिकेट परिक्षेस ३ कॅडेट्स बसले आहेत. ता. ३० नोव्हेंबर १९६४ रोजी अनेकान्त ए. सोसायटीच्या संचालक मंडळाचे सभासद व सुप्रसिद्ध उद्योगपती श्रीमान लालचंद हिराचंद दोशी यांचा त्यांच्या षष्ट्यब्दिपूर्तिनिमित्त आमच्या महाविद्यलयात सत्कार करण्यात आला. श्रीमान् लालचंदजींच्या पत्नी सौ. ललिताबेन आणि स्व. मोतीचंद गौतमचंद यांच्या पत्नी श्रीमती कुसुमबेन याही या प्रसंगी उपस्थित होत्या.

९ जानेवारी १९६५ रोजी आमच्या महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे-महाराष्ट्राचे झुंजार पत्रकार आचार्य प्र. के. अत्रे यांचे सुश्राव्य असे भाषण झाले. आपल्या भाषणात त्यांनी आमच्या प्राचार्यांचा ' ध्येयवादी प्राचार्य ' म्हणून गौरव केला आणि बारामती महाविद्यालयास सर्वांनी साहाय्य करावे असे त्या प्रसंगी उपस्थित असलेल्या बारामतीच्या बहुसंख्य नागरिकांना कळकळीचे आवाहन केले.

पुणे विद्यापीठाचे माननीय कुलगुरु डॉ. न. वि. गाडगीळ यांनी दिनांक १-३-६५ रोजी आमच्या महा-

विद्यालयास भेट देऊन संतोष व्यक्त केला आणि " तुमच्या महाविद्यालयाची प्रगती होण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी मी स्वतः प्रयत्न करीन " असे आश्वासन दिले.

प्रसंगोपात्त पुढील सन्माननीय व्यक्तींनी या वर्षी आमच्या महाविद्यालयास भेट देऊन आम्हास उपकृत केले आहे. श्री. किसनदास रंगीलदास गुजर, फर्गसन कॉलेजचे इंग्रजीचे प्राध्यापक व पुणे विद्यापीठ कार्यकारिणीचे सभासद प्रा. ग. प्र. प्रधान, गीतरामायणकर्ते कविवर ग. दि. माडगूळकर, राजा मंगळवेढेकर, महाराष्ट्र विधान सभेचे सभासद आ. नारायणराव डी. पाटील, मुनिश्री भानुचंद्र विजयजी, टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्राचार्य वी. व्ही. बापट, बृहन्महाराष्ट्र कॉमर्स कॉलेजचे उपप्राचार्य सी. जी. वैद्य, खासदार श्री तुळसीदास जाधव व सकाळचे श्री नानासाहेब परुळेकर या सर्व थोर व नामांकित महाभागांनी आमच्या महाविद्यालयास भेट दिली व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

**प्राचार्य अ. आ. पाटील**—आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य अ. आ. पाटील M. A. M. Ed. (मुंबई) हे पुरोगामी विचाराचे, प्रगत दृष्टीचे शिक्षणतज्ज्ञ आहेत. इतिहास व राज्यशास्त्र या विषयाचे व्यासंगी प्राध्यापक म्हणून त्यांनी लौकिक मिळविला आहेच. पण त्यांची कर्तबगारी ही शिक्षणक्षेत्रातच सीमित झाली नाही. नवी समाजरचना हे त्यांचे ध्येय आहे. पुणे विद्यापीठाच्या कार्यकारिणी सभेवर ते दुसऱ्या वेळेसही प्रचंड बहुमताने निवडून आले यावरून त्यांचे कार्य बहुमान्य होत आहे यांत शंका नाही. चालू वर्षी रांची (बिहार) येथे भरलेल्या अखिल भारतीय इतिहास-परिषदेला पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधी म्हणून ते उपस्थित होते.

बहुजनसमाजात व कामगार वर्गांत राजकीय कार्याचा अनुभव घेऊन ते शिक्षणक्षेत्रात आले असल्यामुळे शिक्षणासंबंधी साचेबद्ध अशी चाकोरीतील विचारसरणी ते आदर्श मानीत नाहीत. नवे प्रयोग, नवीन प्रथा यांना ते नेहमीच अग्रक्रम देतात. गरीब परंतु बुद्धिमान विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी त्यांचा हात नेहमीच पुढे असतो. त्यांच्याच प्रेरणेने 'श्रम शिष्यवृत्तीं'ची योजना आमच्या कॉलेजात सुरु आहे. 'बारामती महाविद्यालय' ही एक आदर्श संस्था बनवावी अशी त्यांची तळमळ आहे. इमारती, पैसा ही बाह्य साधने महाविद्यालयाच्या संचालक मंडळाने पुरविली तर त्यांच्या तळमळीस लवकरच मूर्तस्वरूप येईल.

**प्राध्यापक वर्ग—**

१९६४-६५ या वर्षांत आमच्या महाविद्यालयातील प्राध्यापकांची संख्या २६ होती. आमच्या जुन्या सहकाऱ्यांपैकी हिंदीचे प्रा. रं. रा. तिवारी, तर्कशास्त्राचे प्रा. भू. दर्यापूरकर, इंग्रजीचे प्रा. ल. प्र. दाते, प्राणिशास्त्राचे प्राध्यापक अ. के. फाटक, ग्रंथपाल श्री. म. न. उदगांवकर, आणि शरीरिक शिक्षणाचे प्रमुख श्री. ज्ञानदेव झोडगे हे अन्यत्र गेले.

या वर्षी हिंदीसाठी प्रा. कां फु. चोरडिया, अर्थशास्त्र व राज्यशास्त्रासाठी प्रा. शांताराम पाटील व प्रा. न. म. जैन, तर्कशास्त्र व मानसशास्त्रासाठी प्रा. बा. य. देशपांडे, प्राणिशास्त्रासाठी प्रा. कु. मृणालिनी दळवी, इंग्रजीसाठी प्रा. सु. जि. भरवाडे, प्रा. के. मा. नाईक व प्रा. म. पु. केंदुरकर, वाणिज्य विभागासाठी प्रा. व्ही. ए. कुलकर्णी, टी. डी. विभागासाठी प्रा. दयाराम पाटील, पदार्थविज्ञानासाठी प्रयोगदर्शक श्री. ताम्हणकर आणि ग्रंथपाल म्हणून श्री. नंदकुमार कारखानीस हे नवीन सहकारी आम्हाला लाभले.

मराठीचे प्राध्यापक **रा. ति. अक्कोळे** यांना त्यांनी डॉ. शं. गो. तुळपुळे (पुणे विद्यापीठ) यांच्या मार्गदर्शनाखाली लिहिलेल्या 'प्राचीन मराठीतील जैन साहित्य' या प्रबंधास पुणे विद्यापीठाने पीएच्. डी. ची मान्यता दिली. तसेच पंधराव्या शतकातील ब्रह्म गुणदासविरचित 'श्रेणिक चरित्रा'चें संपादन करून ते प्रसिद्ध करविण्याचेही कार्य त्यांनी या वर्षी पार पाडले.

कॉमर्स विभागाचे प्रमुख प्रा. ज. खु. गोधा यांनी आपल्या कांही सहकाऱ्यांसमवेत लिहिलेले 'A Text book on Banking for F.y. B. com. students " हे पुस्तक सध्या प्रसिद्धीच्या मार्गावर आहे. पुणे विद्यापीठातर्फे भरविलेल्या अखिल भारतीय वाणिज्य परिषदेला पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधी म्हणून ते उपस्थित होते.

हिंदीचे प्रा. चोरडिया यांनी कांही मासिकातून आपले लेख प्रसिद्ध करविले. इंग्रजीचे प्रा. र. मा. दोशी यांनी पुणे जिल्हा परिषदेने आयोजित केलेल्या गांधी ज्ञान-सप्ताहात माळेगाव येथे महात्मा गांधीच्या जीवनावर व्याख्यान दिले.

वरील सर्व उपक्रमाबद्दल त्या त्या प्राध्यापकाचे आम्ही हार्दिक अभिनंदन करतो.

**गतवर्षाचा निकाल**

आमच्या कॉलेजातील तीनही विद्याशाखांचे निकाल गत वर्षीच्या निकालाप्रमाणे चांगले लागले आहेत. या वर्षी प्री डिग्री सायन्सच्या परीक्षेत पुढील पांच विद्यार्थी प्रथम वर्गांत उत्तीर्ण झाले. श्री. नलिन मारवाडी; श्री. किरण वसंतलाल मेहता; श्री. पी. एन्. कदम; श्री. पी. एन्. बालगुडे; व श्री. बी. पी. चावरे. त्याचप्रमाणे प्री. प्रोफेशनलच्या परीक्षेत चार विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. कु. वसुधा लंके; श्री एन्. व्ही. मेहता; श्री. रमेश शहाणे व श्री. सुभाष जी. कोठारी. या सर्वांचे कॉलेजच्या वतीने हार्दिक अभिनंदन. १९६३-६४ चा निकाल खालीलप्रमाणे. लागला आहे.

| वर्ग | नोंदणी | गैरहजर | बसले | प्रथमश्रेणी | द्वितीयश्रेणी | उत्तीर्ण | ए.टी.पी.टी. | एकूण | शेकडाप्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदवीपूर्व साहित्य | ४४ | — | ४४ | — | २१ | ११ | १ | ३३ | ७५·०० |
| पदवीपूर्व शास्त्र | ५६ | १ | ५५ | ५ | २० | ८ | १ | ३४ | ६१·८ |
| पदवीपूर्व वाणिज्य | २५ | १ | २४ | — | १४ | ५ | — | १९ | ७९·५ |
| प्री प्रोफेशनल | ३५ | १० | २५ | ४ | ९ | २ | -- | १५ | ६०. |
| प्रथमवर्ष साहित्य | ३० | — | ३० | — | — | १५ | १० | २५ | ८३·३३ |
| प्रथमवर्ष वाणिज्य | १८ | — | १८ | — | — | १० | ६ | १६ | ८८·८८ |

## अनेकान्त एज्युकेशन सोसायटी

### (१९६४-६५)

### उल्लेखनीय घटना व प्राप्त दान

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीमार्फत सध्या बारामती महाविद्यालय, बारामती व जयसिंगपूर महाविद्यालय, जयसिंगपूर अशा दोन संस्था चालू आहेत. बारामती महाविद्यालयासाठी बारामती येथील अनेकान्त ए. सोसायटीच्या स्थानिक समितीने श्री. घारे बंधूंनी बांधलेली इमारत भोवतालच्या चौदा एकर जागेसह ८६ हजार

सहाशे रुपयास खरेदी केली. आमचे महाविद्यालय आता स्वतःच्या जागेत भरू शकेल.

पुणे जिल्हा परिषदेने चालू वर्षी २५ हजार रुपयाची उदार देणगी बारामती महाविद्यालयासाठी देऊन एक अभिनंदनीय उपक्रम केला. पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्री. शंकरराव उरसळ आणि उपाध्यक्ष श्री. शिवाजीराव काळे, शिक्षण समितीचे चेअरमन श्री. विठ्ठलराव सातव तसेच श्री. मामासाहेब मोहोळ, आ. सौ. मालतीबाई शिरोळे, श्री. साहेबराव सातकर, श्री. धोंडीबा आ. सातव या सर्वांनी आमच्या महाविद्यालयासंबंधी जी सहानुभूति व प्रेम व्यक्त केले आहे त्याबद्दल त्यांना द्यावेत तितके धन्यवादच थोडे आहेत.

**बारामती नगरपालिकेने** आमच्या महाविद्यालयाच्या ग्रंथालय वास्तूसाठी जाहीर केलेल्या एक लाख रुपये देणगीपैकी उर्वरित हप्ता २५ हजार रुपयाचा देऊन आपला संकल्प पुरा केला. इतकेच नव्हे तर पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकात पुनः दहा हजार रुपये बारामती महाविद्यालयास मंजूर करून ठेवले याबद्दल बारामतीचे नगराध्यक्ष श्री. विठ्ठलबाबा सोनवले आणि इतर आजी व माजी नगरपिते याचे आम्ही ऋणी आहोत.

**श्रीमती कस्तुरबाई वालचंद ट्रस्ट.**, मुंबई यांच्याकडून सोसायटीस १० हजार रुपयांची देणगी चालू वर्षात प्राप्त झाली. सदरहू ट्रस्टचे विश्वस्त श्री. लालचंद हिराचंद श्रीमती कस्तुरबाई वालचंद आणि **फूलचंद गांधी** यांचा आमच्या संस्थेबद्दल सदैव उदार दृष्टिकोन आहे.

श्री. राधेश्याम अगरवाल, शिरवली यांनी आपल्या चिरंजीवांच्या विवाहाप्रीत्यर्थ ५०५१ रुपयाची देणगी देऊन या भागातील धनिकांसमोर एक नवा आदर्श निर्माण केला याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

बारामती मर्चंट असोसिएशन, बारामती या संस्थेने ३००० रुपये वर्गणी रूपाने जमवून दिले. श्रीमती गोपिकाबाई भाईचंद मोदी यानी १,००१ रुपये दिले आहेत.

वसतिगृहाच्या पाया खोदण्याच्य समारंभाच्या वेळी श्री. भिकोबा सखाराम तावरे यांनी स्वयंस्फूर्तीने ५०० रु. दान दिले. फलटणचे प्रांतसाहेब श्री. जयसिंगराव सिंधाणी यानी प्राचार्यांकडे होतकरू विद्यार्थ्यांना पुस्तकांची मदत द्यावी म्हणून ४०० रु. चा चेक स्वतः होऊन पाठवून दिला.

बारामतीचे मामलेदार श्री. पाटील साहेब, प्रांत श्री. मोहिते साहेब व श्री जाधवसाहेब (माजी प्रांत, बारामती) यांनीहि संस्थेच्या कार्यास सर्व प्रकारची मदत केली आहे.

वरील सर्वांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतों.

माळेगाव सहकारी साखर कारखान्याने बारामती कॉलेजसाठी मंजूर करून ठेवलेली रक्कम अद्यापि मिळाली नाही. त्यांच्याकडून लवकरच या बाबतीत पुढचे पाऊल उचलले जाईल अशी आम्ही अपेक्षा करतों. संस्थेच्या अडचणी व गरजा लक्षात घेऊन या भागांतील धनिक, बागाईतदार, कारखानदार यानी जास्तीत जास्त मदत करावी अशी त्यांना कळकळीची विनंती आहे.

**आभार**—प्रस्तुत अंक तयार करताना आम्हाला अनेकांचे अनेक प्रकारे साहाय्य झाले. प्राचार्यांनी दिलेले प्रोत्साहन हीच खरी या मागची शक्ती आहे. त्यांच्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. आमच्या सहकारी संपादकांचे, या अंकांतील लेखक, कवि व जाहिरातदार या सर्वांचे आम्ही अतिशय आभारी आहोत. साधना प्रेसचे संचालक श्री. पटवर्धन यांनी काम सुबक व वेळेवर मुद्रण करून दिल्याबद्दल आम्ही त्यांचेही आभारी आहोत.

—कार्यकारी संपादक





# भारत-भाग्यविधाता
## पं. जवाहरलालजी नेहरू



" मात्र मूठभर राखेचे गंगेत विसर्जन केल्यावर जी राख उरेल ती विमानातून उंच आकाशात न्यावी आणि उंचावरूनच ती भारतभूमीवर विखरून टाकावी, ज्या ठिकाणी भारतातील शेतकरी काबाडकष्ट करतो त्या शेतांतून ती पडावी, भारताच्या भूमीचाच तो एक अंश बनावा, हीच माझी अखेरची इच्छा आहे."

UNIVERSITY OF POONA

## EMPLOYMENT BUREAU

The Employment Bureau of the University of Poona offers help and guidance to graduates of the University in finding suitable jobs for them. Those graduates who desire to take advantage of the facilities offered by the Bureau should register their names with the Bureau, within one month of the declaration of their Degree Examination results, on payment of the Registration fee Rs. 5/- directly to the Registrar of the University, and enclose the receipt with their application to the Secretary, Employment Bureau. Applicants should be below 28 years of age.

Though the Bureau does not give any guarantee of employment, it assures that every effort would be made on the applicant's behalf to secure a suitable job for him.

**A. B. ARLICK,**

*Secretary,*

University Employment Bureau.

## नॅशनल लोन स्कॉलरशिप्

खालील विद्यार्थ्यांना ह्या वर्षी सदर स्कॉलरशिप मंजूर झाली.

| अ. नं. | नाव | वर्ग | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | श्री. कापडनीस अशोककुमार फुलाजीराव | पदवीपूर्व शास्त्र विभाग | ७२०.०० |
| २. | ,, फडतरे कृष्ण सर्जेराव | ,, | ७२०.०० |
| ३. | ,, वाघमारे मनोहर गोविंद | ,, | ७२०.०० |
| ४. | ,, चांदवले प्रदीपकुमार आनंतराव | ,, | ७२०.०० |
| ५. | ,, वजरिणकर सुभाष तुळशीराम | ,, | ७२०.०० |
| ६. | ,, पवार यशवंत धनाजी | ,, | ७२०.०० |
| ७. | ,, पाटील शिवाजी रघुनाथ | ,, | ७२०.०० |
| ८. | ,, शेख माणिक अब्दुल | ,, | ७२०.०० |
| ९. | ,, कुतवळ पांडुरंग मारुती | ,, | ७२०.०० |
| १०. | ,, भोसले दत्तात्रय रामचंद्र | पदवीपूर्व वाणिज्य विभाग | ७२०.०० |
| ११. | श्री. कदम दगडू संभाजी | पदवीपूर्व शास्त्र विभाग | ७२०.०० |
| १२. | कु. केसकर हेमलता रामकृष्ण | पदवीपूर्व शास्त्र विभाग | ७२०.०० |
| १३. | ,, भोयरेकर मालती पंढनारीथ | टी. डी. | ७२०.०० |
| १४. | ,, काळे सुमन कृष्णराव | ,, | ७२०.०० |
| १५. | श्री. झगडे अरुण भगवान | ,, | ७२०.०० |
| १६. | श्री. बालगुडे पांडुरंग नामदेव | पदवीपूर्व शास्त्र विभाग | ७२०.०० |
| १७. | श्री. मारवाडी नलिन रतनचंद. | प्रथमवर्ष शास्त्र विभाग | ७२०.०० |
| १८. | कु. जवळेकर पुष्पा जगन्नाथ | प्रथमवर्ष कला विभाग | ७२०.०० |
| १९. | श्री. लडकत सदाशिव बंडाजी | प्रथमवर्ष शास्त्र विभाग | ७२०.०० |
| २०. | श्री. भामे रामचंद्र जयसिंग | ,, | ७२०.०० |
| २१. | श्री. जगताप भिमराव नारायण | ,, | ७२०.०० |
| २२. | श्री. बोडके श्रीकांत निवृत्ति | ,, | ७२०.०० |
| २३. | श्री. महाजन अरविंद दिगंबर | ,, | ७२०.०० |
| २४. | श्री. देवकाते पोपट आप्पासाहेब | ,, | ७२०.०० |
| २५. | श्री. मिरजकर जयप्रकाश दामोदर | ,, | ७२०.०० |

### (५) राजकीय पीडितांच्या पाल्यासाठी स्कॉलरशिप्

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. इंगुले अशोक उद्धवराव | द्वितीय वर्ष, वाणिज्य विभाग | ४६०.०० |
| २. | श्री. बाचल विजयकुमार दत्तात्रय | ,, | ४६०.०० |
| ३. | कु. सावंत कुसुम दादासाहेब | ,, | ४६०.०० |



## विचार-श्रृंखला

संग्राहक--**यादव एम्. एन्.** पदवी पूर्व (वाणिज्य)

(१) भांड्यातून पाणी सांडून सूर्यबिंब नाहीसे झाले तरी सूर्य नाहीसा होत नाही !

**--ज्ञानेश्वरी**

(२) भेकडपणा व हिंसा यातच निवड करण्याचा प्रसंग असेल तर मी हिंसा करणे पत्करीन !

**--महात्मा गांधी**

(३) जीवन हा सुखाचा झरा असून श्रम हा सुखाचा आत्मा आहे.

**--टॉलस्टॉय**

(४) जगात काहीच बिघडलेले नाहीं, बिघडलेले जर कोणाला काही दिसत असेल तर तो त्याचा दृष्टिदोष आहे!

**--ब्राउनिंग**

(५) जीवनाच्या जमाखर्चात उधारीला जागा नाही, जो आज सुगंधी फुलाचा वास घेत नाहीं त्याला तो उद्या मिळेलच असे नाही.

**--वि. स. खांडेकर.**

(६) विवाह करा वा करू नका. दोन्ही बाजूनी माणसाला पश्चाताप करावा लागतोच.

**सॉक्रेटीस**

(७) स्त्री केवळ सौंदर्याची पुतळी नाही. ती प्रेम, दया व कर्तव्य यांची आदर्श प्रतिमा आहे.

**--रोमाँ रोलाँ**

(८) प्रेमाची चिकित्सा करू नये. प्रेम आपोआपच समजते.

**--साने गुरुजी**

(९) वाटाघाटीत जर यश मिळवावयाचे असेल तर आपल्या शब्दांच्या मागे शक्ती उभी असली पाहिजे.

**--नेल्सन**

(१०) प्रसंगी आत्मघात हेच आत्मकर्तव्य ठरत असते.

**--वि. दा. सावरकर**

(११) नीतीचा खून समाजाला पाहवत नसतो. पण माणसांचे खून तो हसत मुखाने पाहतो. माणसासाठी नीती असते. नीतीसाठी माणूस नसतो.

**--वि. स. खांडेकर**

(१२) मित्राशिवाय आयुष्य म्हणजे सूर्याशिवाय आकाश.

**--सिसेरो**

(१३) सतत यशाने आपणास जगाची एक बाजू दिसते. संकटामुळे दुसरी.

**--हेझलिट्**

(१४) वृद्ध सर्वांवर विश्वास ठेवतात, प्रौढ सर्वांबद्दल शंका काढतात, तरुणांना तर सारेच माहीत असते.

**--वाईल्ड**

(१५) जे आमची स्तुती करतात त्यांना आम्ही आवडतो. ज्यांची आम्ही स्तुती करतो ते आम्हांस आवडतातच असे नाहीं.

**--हेझलिट**

(१६) कृती चटका लावणारी असावी, चटका देणारी नसावी.

**--राधाकृष्णन्**

(१७) आपला देश आपणासाठी काय करू शकेल हे विचारू नका. परंतु आपण आपल्या देशासाठी काय करू शकू ते विचारा.

**--जॉन. एफ्. केनेडी**

(१८) लोभ हा पापाचा परमेश्वर आहे.

**--राम गणेश गडकरी**

(१९) तू जन्मलास तेव्हा रडत होतास आणि जग ? ......जग हसत होते. आयुष्यात तू अशी कृती कर की जाताना तू जाशील पण जग मात्र ढसढसा रडेल.

**--लोकमान्य टिळक**

(२०) त्याग बुद्धीचा आश्रय करून स्वार्थ बुद्धीला लगाम घालणे याला माणसाची संस्कृती साधना म्हणता येईल.

**--आचार्य भागवत**

*Quality is Our Creed*

# मे. रंगीलदास नारायणदास

पो. बॉ. नं. ३४ बारामती, जि. पुणे

अधिकृत एजंटस् :--

ज्योती लि. बरोडा – युनिबिल्ट पंप्स.
ज्योती कॅलार इमॅग लि. बरोडा.
इलेक्ट्रिक मोटार्स, स्टार्टर्स, डिस्ट्रिब्युशन बोर्डर्स.
रॅलि फॅन लि. : टेबल व पॅडस्टल फॅन्स.

आमच्याकडे इलेक्ट्रिक मोटार्स, स्टार्टर्स, मेनस्वीचेस्, युनिबिल्ट पंप्स, टेबल फॅन्स, इलेक्ट्रिक इस्त्र्या, गॅस लाइटर्स व इलेक्ट्रिक फिटिंग मटेरिअल हजर स्टॉकमधून उपलब्ध.

अद्यावत् पद्धतीने सुरू झालेले

## पूना स्वीट हाऊस

★

स्टेट बँकेसमोर, स्टेशन रोड.

उत्तम प्रकारची— ● स्वीटस् ● फरसाण ● सोडा-लेमन ● सरबत

★

जेवणाची उत्कृष्ट सोय असलेले एकमेव ठिकाण

## पूना आदर्श भोजनालय

स्टेशन रोड, बारामती.




**Statement about ownership and other particulars about Baramati College Annual, Miscellany as required under Rule 8 of the Registration of Newspapers (Central) Rules, 1956.**

## Form No. IV (See Rule No. 8)

| | | |
|---|---|---|
| 1. | Place of Publication. | Baramati. |
| 2. | Periodicity of its publication | Annual. |
| 3. | Printer's Name | Prin. A. A. Patil. |
| | Nationality | Indian. |
| | Address | Baramati College Baramati (Poona) |
| 4. | Publisher's Name | As above. |
| | Nationality | |
| | Address | |
| 5. | Editor's Name | As above. |
| | Nationality | |
| | Address | |
| 6. | Names and addresses of individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one percent of the total capital. | Baramati College, Baramati |

I, Appasaheb Annasaheb Patil, hereby, declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

**A. A. Patil**
Publisher.

Dated 1-5-1965

# मराठी विभाग

## विश्वधर्माची कल्पना—

आतां विश्वात्मके देवे । एणें वाग्यज्ञें तोषावें ।
तोखोनि मज द्यावे । पसायदान हे ॥
जे खळांची व्यंकटी सांडो । तयां सत्संगी रति वाढो ।
भूता परस्परे जडो । मैत्र जीवाचे ।
दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहे ।
जो जे वांछील तो ते लाहो । प्राणिजात ॥

ज्ञानेश्वरी १८ वा अध्याय.

## साहित्यात हे असावे—

नवरसा भरावें सागर । करवि उचित रत्नाचे आगर ।
भावार्थांचे गिरिवर । निफजवि माये ।
साहित्यसोनेयांचिया खाणी । उघडवि देशीचिया अक्षोणी
विवेक वेलीची लावणी । हो दे सैंघ

ज्ञानेश्वरी १२ वा अध्याय.



## शेठ लालचंद हिराचंद यांचा षष्ठ्यब्दिपूर्ति निमित्त सत्कार—




प्राचार्य अ. आ. पाटील, श्री शेठ लालचंदजी, सौ. ललिताबेन दोशी व श्रीमती कुसुमबेन मोतीचंद शहा, श्री जंबुकुमार शहा.

## वसतिगृह इमारतीचा पाया खोदताना—
श्री. सूरजमलजी संघवी



प्राचार्य पाटील, श्री जंबुकुमार, श्री चंदुलालजी सराफ, श्री पोपटलाल शहा इत्यादि.

१७।२।१९६५

# माझा गाव


**अनंतकुमार ललगुणकर**
द्वितीय वर्ष, वाणिज्य.


*माझा गाव !*

*अहा किती गोड वाटतात हे शब्द ! नाव उच्चारताच मन कसे प्रफुल्लीत होतं ! केवढा अर्थ साठविलेला आहे या दोन शब्दात ! माझ्या आनंद सागराला उधाण येते, ते माझ्या गावाचे नाव वाचल्यावर, पाहिल्यावर अथवा कोणी उच्चारल्यावर.*

*हा माझा प्रिय गाव—ज्या ठिकाणी बारा उच्च विचार एकतेने नांदतात, विविधतेत एकता पाहणारा बहुगुणी 'बारामती' होय.*

*पुंगीच्या नादानं नाग डुलावा, दिव्याच्या प्रकाशानं पतंगाने आपले देहभान विसरावं आणि प्रकाशज्योतीकडे झेप घ्यावी; आणि फुलपाखराने फुलातील मधासाठी फुलाकडे आकृष्ट व्हावे असाच काहीसा प्रकार माझ्या गावाबद्दल म्हटला पाहिजे.*

• • •

अगदी छोटासा प्रवास करूनसुद्धा गावी परतताना दुरवरूनच दिसूं लागणाऱ्या माझ्या गावच्या छोट्या मोठ्या इमारती, घरे, नदी व मंदिरे प्रवासाचा शीण हलका करतात, एवढेच नव्हेतर गावच्या सहवासात माझ्या आनंदाला—आणि उत्साहाला एक आगळीच छटा बिलगते.

तसं पाहिले तर प्रत्येकालाच आपआपल्या गावचे भूषण वाटते आणि मी म्हणतो ते कां नसावे ? परंतु उच्च-संस्कृती आणि समृद्धतेच्या छायेखाली विसावा घेत असलेला निसर्गरम्य माझा गाव आपल्याला आगळा आणि विरळाच वाटेल !

गावच्या परिसरातच चौफेर चार साखर कारखाने आहेत. हे कारखाने बारामतीच्या निकट उभे राहून सभोवारच्या ग्रामीण विभागाचे आर्थिक भाग्य घडवीत आहेत; गावाला भलं मोठं व्यापारी महत्त्वेचे आणि कीर्तीचे गाठोडे बहाल करीत आहेत.

गावा बाहेर हिंडताना उसाचा लागणारा तो थंडगार कोमल वारा मनाला एक आगळाच आनंद देतो, तर गावातील ती कापूस—गिरणींची उंच धुराडी स्वतःप्रमाणेच मान उंच ठेऊन, कर्तृत्ववान् होण्याचाच संदेश देत असावीत ! गावाजवळूनच झुळझुळ वाहणारी आमची नदी आम्हाला काहीशी वेगळीच चालना देते.

" जीवनात स्थिर राहू नका, धावत रहा, फिरत रहा "

असा प्रा० अत्रे यांच्या मताप्रमताणे ती संदेश देण्यात गर्क असते. नदीकाठावर पुरातन काळापासून आसने ठोकून बसलेल्या मंदिरांची तळपती शिखरे माझ्या गावबांधवांना वारंवार धडे देण्यामध्ये तत्पर असतात, तर त्याच नदीकाठावर, जुन्या पडक्या किल्ल्याच्या विटामधून कुजबुजूं लागणारा पुरातन इतिहास मनाला— स्फूर्ति देतो; जुन्या आठवणींना उजाळा देतो.

शेतीवाडी- कारखानदारी यांच्या समृद्धीमध्ये माझ्या गावची निसर्गसृष्टी— वनश्री आपल्याला विशेष खुलून दिसेल यात शंकाच नाही !

इतिहासकाळी ' बारामती ' ही एक थोर नगरी होती; याचा पुरावा इतिहास आजही देतो. कऱ्हा नदीचे ऐल आणि पैल तटावर हा इतिहास आजही भग्नस्वरूपात उभा आहे. पेशव्यांचे सावकार व व्याही बापूजी नाईक, त्यांच्या आश्रयाला राहून आपली आर्या केकारवात महाराष्ट्रभर घुमविणारे कविवर ' मोरोपंत ' आणि ' शिवलीलामृत ' सांगून भक्तिरसात दंग होणारे आबालसुलभ कवी ' श्रीधर ' या सर्वांच्या पवित्र वास्तव्याने या नगरीला थोर असा सांस्कृतिक वारसा प्राप्त झालेला आहे.

नदीच्या विस्तृत पात्रालगत शांत वातावरणात स्थानापन्न झालेले पुरातन " सिद्धेश्वराचे मंदिर " हे तर माझ्या गावाचे नाक आहे. कुठल्याही गावचा कुठलाही पाहुणा आला की सर्वप्रथम तो हे मंदिर पहाण्याची तीव्र उत्कंठा पूर्ण करतो. खरोखरच या मंदिरातील एका अखंड काळ्या पाषणात कोरलेली कलापूर्ण नंदीची भव्य मूर्ती, मंदिराचे गाभाऱ्यातील उत्कृष्ट रंगरंगोटी, कलाकुसर आणि नक्षीकाम पाहिल्यावर मन कसं प्रसन्न होते ! नेमकी हीच गोष्ट गावच्या माळावरील देवीच्या मंदिराची आहे.

गावच्या " नगरपालिकेच्या इमारतीला " तसेच गावाबाहेरील छोट्या पण आकर्षक " रिमांड-होमाच्या इमारतीला बारामतीकरांच्या हृदयात मोलाचे स्थान आहे.

माझा गाव विद्यादेवीचा गाढा उपासक आहे; गावच्या समृद्ध अशा परिसरात विद्यादेवीची आराधना करणारी उत्कृष्ट विद्यामंदिरे आहेत, की ज्या शैक्षणिक संस्था आपले पवित्र कार्य तळमळीने करून विद्यादेवीची उपासना करतात. यावरही कळस म्हणजे, नुकतेच जन्मास आलेले व सर्वदृष्टींनी प्रगतीपथावर असलेले माझे " महाविद्यालय " होय. गावाबाहेर शांत वातावरणात, निसर्गसृष्टीच्या राज्यात असलेली ती कॉलेजची छोटीशी इमारत पाहिली की कुठल्याही विद्यार्थ्यांची वा नागरिकाची कॉलर अभिमानाने ताठ झाल्याशिवाय राहणार नाही ! गावच्या प्रतिष्ठेचा सुगंध चौफेर उधळण्यात, माझ्या महाविद्यालयाचा वाटा डोळ्यात भरण्याजोगाच आहे !

सांस्कृतिक उत्सव साजरे करण्यात माझा गाव अग्रेसर आहे. गावातील विविध जाती-पंथांचे लोक प्रत्येक सण मोठ्या खेळीमेळीने आणि नव्या जोमाने पार पाडतात.

श्रावण महिन्यात प्रत्येक सोमवारी निघणाऱ्या मिरवणूकीतील अग्निखेळ; दांडपट्टा, लाठीकाठीचे खेळ पाहून मन अक्षरशः भांबावून जाते; तर दुसरीकडे ढोल लेझीमाच्या ताफ्याने आणि भजन कीर्तनांच्या गजराने मन भक्तीरसात डुंबल्याखेरीज रहात नाही.

गावचा गणपति-उत्सव हा तर बारामतीकरांच्या रसिकतेचा "उच्च-निर्देशांकच" म्हणा ना ! विविध ठिकाणी करमणुकीचे कार्यक्रम ऐकण्यास पहाण्यास जाणारी ती अलोट गर्दी पाहिली की करमणुकीचे महत्त्व आपोआप पटू लागते. तर गणरायापुढील आकर्षक रोषणाई व आरास पाहिल्यावर त्या कलाकारांची तोंड फाटेपर्यंत स्तुती केल्याशिवाय कोठलाही नागरिक पुढे जाणार नाही.





गणपती उत्सवामध्ये सर्व धर्मांच्या मंदिरात चालणाऱ्या पुजाअर्चा-भजन कीर्तने इ. विविध सांस्कृतिक कार्यक्रम पाहिल्यानंतर लो. टिळकांचा काळ डोळ्यासमोर उभा राहतो.

दसरा दिपवाळी सारखे सण लोक मोठ्या थाटामाटाने पार पाडतात.

' मोहरम ' दिनानिमित्त आमचे मुस्लीम बांधवांच्या उत्साहाला व आनंदाला आगळीच धार प्राप्त होते. या दिवशी नदीचे विस्तृत पात्रावर " डोल्यांचा लपंडाव " की ज्याला आम्ही " डावी-उजवी " म्हणतो ती पहाण्यास जमलेला अलोट रंगीबेरंगी रसिकवर्ग पाहिल्यावर त्या सणाला गावाच्या इतिहासात मथळ्याचे स्थान प्राप्त होते. डोल्याची कलाकुसर, रंगरंगोटी आणि आकर्षक रोषणाई कोणालाही मंत्रमुग्ध केल्याशिवाय राहणार नाही; आणि म्हणूनच गावचा ' मोहरम-सण ' सर्व महाराष्ट्रात चर्चेचा विषय होऊन नावाजला जातो,

गोकुळ आष्टमी, हनुमानजयंती, दत्तजयंती, महावीरजयंती, अशा धार्मिक उत्सवाच्या दिवशी, विविध मंदिरातील पुजाअर्चा, स्तोत्रपाठ, भजनकीर्तन, अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमाने माझा गाव अक्षरशः दुमदुमून जातो, प्रभुला आळविण्यात रममाण होतो.

' गावजत्रा ' की ज्याला आम्ही ' उरुस ' म्हणतो ही तर गावच्या इतिहासातील चालती-बोलती खळबळच !

दोन रात्र आणि दिवस ती अलोट रंगीबेरंगी गर्दी, दुकाने, गोंगाट आणि विविध प्रकार पाहिल्यानंतर—

' हौसे, ' नौसे ' गौसे ' या शब्दांचा अर्थ सहजपणे समजतो. ही गजबज व अलोट गर्दी पाहून, आपण मुंबईतील चौपाटीवर तर नाही ना ? असा भास झाल्याशिवाय राहात नाही. आमची गावजत्रा भावनापूर्ण आहे. बहुसंख्य लोक देवाला नवस करतात, तर बहुसंख्य लोक आपल्या नवसाची फेड नैवद्यासह मोठ्या इतमामाने करतात.

' गुरुवार ' हा आमचा बाजार दिवस बर का ? विविध आणि विचित्र आवाजांचे, रंगीबेरंगी पेहराव्यांचे आणि व्यक्तींचे हे एक भरगच्च संमेलनच म्हणाना !

माझा गाव पुढाऱ्यांचा पुढारी आहे. १५ ऑगस्ट, २६ जाने० सारखे राष्ट्रीय दिवस माझ्या गावात मोठ्या महत्तेने तोलले जातात. या दिवशी ' गावातील रोषणाई, आरास ही एक ' अद्भुतच ' होवून बसते. गावातील विविध इमारतीवरील दिव्य व आकर्षक रोषणाई प्रत्येकाला पुन्हा पुन्हा घराबाहेर पडावयास भाग पाडते.

' कीर्ती ' आणि ' मान ' पटकविण्यात माझ्या गावचा वाटा डोळ्यात भरण्याजोगाच म्हणावा लागेल !

गावामध्ये द्राक्षे-ऊस अशा विविध पीकस्पर्धेत अखिल महाराष्ट्रात प्रथम क्रमाकांचा कळस गाठणारे नामवंत कसबी शेतकरी-बागायतदार आहेत; तर अखिल भारतात वरचा क्रमांक पटकविणारे मोटार सायकलपटूही आहेत.

वारंवार गावात येणारे ' सर्कशीचे खेळ ' वा ' जादूचे प्रयोग ' अशा घटना म्हणजे गावातील खळबळ किंवा चळवळच म्हणा ना ! अशा वेळी आसपासच्या वस्तीवरून येणाऱ्या बैलगाड्यांच्या रांगा व गावातील रसिक चाहत्यांची ती तुडुंब गर्दी पाहिल्यावर अक्षरशः अशा खेळांना उत्साहाचे उधाण येते.

माझा गाव देशप्रेमी, कलावंत व नामवंत आहेच, त्याबरोबर ' रसिक ' पण आहे. एकुलत्या एक असलेल्या-इवल्याशा चित्रपटगृहाचे माझ्या गावबांधवाना असणारे भूषण मी काय बरे वर्णावे ?

प्रत्येक अडचणीच्या समयी धावून जाणे हे आमच्या गावाचे तत्त्वच म्हणा ना ! मग ती अडचण वा संकट उभ्या राष्ट्रावरचे असो वा एखाद्या व्यक्तीवरील असो !

प्रयत्नरूपी रथात बसून, काळाचा मार्ग भरधावपणे आक्रमीत ध्येयाचे-समृद्धतेचे शिखर गाठण्यास निघालेला माझा गाव एक कलावान् सारथीच म्हणा ना !

माझा गाव म्हणजे एक अल्हाददायक नंदनवनच आहे— बगीचा आहे; की ज्या बगीच्यामध्ये प्रत्येक नागरिक माळ्याची भूमिका वठवीत असून-—सद्गुण-सुबत्ता आणि ध्येयरूपी वृक्षांना, प्रयत्नांचे खतपाणी घालण्याचे माळी काम करीत आहे.

जेथे मोरोपंत-श्रीधरासारखे अमर कवी होऊन गेले; जे गाव विविध पीक स्पर्धेत व मोहिमेत अग्रेसर आहे; जो गाव विद्यादेवीचा गाढ उपासक आहे; जेथे जिवंत धार्मिक संस्कृती आणि धगधगते राष्ट्र प्रेम आहे; ज्या ठिकाणी सुबत्ता आणि एकता यांचा सुरेल संगम आहे; ज्या ठिकाणी नामवंत व हुशार खेळाडू, कवी, शाहीर, संगीतज्ञ, गाढ विद्वान्, वृत्तपत्रकार, हुशार व कसबी बागायतदार आणि दानशूर धनाढ्य आहेत, असा 'सर्वगुणसंन्न' बहुगुणी गाव मलाच काय, पण आपणा सर्वांना आवडल्याशिवाय राहणार नाही !

▣ ▣ ▣

## तीन गोष्टी

संग्राहक :—**रमेश दगडू बाहदुरकर**, पी. डी. आर्टस्

(१) तीन गोष्टींनी सुरुवात करा
चांगला विचार, चांगले कृत्य, गोड भाषण

(२) तीन गोष्टी स्वाधीन ठेवा
आपला राग, आपली जीभ, आपली इच्छा

(३) तीन गोष्टीची भक्ती करा
ध्यैर्य, शांती व परोपकार

(४) तीन गोष्टी अंगी बाणा
शहाणपणा, सहनशीलता, चांगुलपणा

(५) तीन गोष्टी करता भांडा
आपली अब्रू, आपला देश व मित्र

(६) तीन गोष्टींचा तिटकारा करा
गर्विष्ठपणा, निर्दयपणा, कृतघ्नपणा

(७) तीन गोष्टी शिकाव्या
सत्य, निष्ठा, समाधीपणा

(८) तीन गोष्टीवर मार्मिकता व रसिकता दाखवावी
ज्ञान, मान, शोभा

(९) तीन गोष्टी अंतःकरणात ठेवा
निर्मल मन आनंदी स्वभाव, भलेपणा

(१०) तीन गोष्टीसाठी प्रयत्न करा
आरोग्य, चांगला मित्र व स्वतंत्रता

(११) तीन गोष्टी परत येत नसतात
सुटलेला बाण, बोललेले शब्द, गेलेली अब्रू

(१२) तीन गोष्टीचा आदर करा
विद्या, कला, भावना

(१३) तीन गोष्टीवर प्रेम करा
माता-पिता, गुरुदेवता व मानवता

(१४) तीन गोष्टीत आनंद माना
सौंदर्य, मनाचा मोकळेपणा, स्वतंत्रता

(१५) तीन सौंदर्यांचा स्वीकार करा
विचार सौंदर्य, गुणसौदर्य व सौदर्य

(१६) तीन गोष्टीसाठी तळमळा
उज्वलता, विशालता, स्निग्धता

(१७) तीन गोष्टींचे दान करीत रहा
सहकार्य, ज्ञान, प्रेम

(१८) तीन गोष्टींना विसरू नका
आपला देश, आपले मन, आपले कर्तव्य.

(१९) तीन गोष्टीचा नायनाट करा.
अमानी, गरीबी, कलह

(२०) तीन गोष्टी झिडकारा
रिकामी बडबड, तापटपणा, कुढेपणा.

२१) तीन गोष्टीत लक्ष केंद्रित करा
चांगली पुस्तके, चांगले संस्कार, व चांगले मित्र.

▣ ▣ ▣



## कलियुगाचा आरंभ

कु. रत्नप्रभा बेलसरे
द्वितीय वर्ष, साहित्य.

*" घरी सूनबाय वाट पगत आसलं...*
*चिमनी आन् धोंड्या जेवायला जल्दी करत*
*आसतील, मी तर हित बाटली धरून बसलुया*
*......सैपाक ती कसा करेल ?"*

सायंकाळच्या सोनेरी प्रकाशात नदीचे विस्तीर्ण पात्र चमचमत होते. दुथडी वाहणाऱ्या त्या चंचल बालेच्या रुपेरी वस्त्राला लहरींच्या सुरकुत्या पडलेल्या होत्या. नाना छटाधारी मंद, सोनेरी प्रकाशात लहरी मधूनच झळाळत होत्या. स्वच्छंदपणे गुणगुणत जाणाऱ्या त्या जल-कन्येला जगाची पर्वा नव्हती. आपल्याच नादात, आपल्याच गुंगीत धुंद होऊन मदमस्त संगीत गात गात ती पुढे पुढे, अहोरात्र पुढेच जात होती.

तिच्या अलिकडील काठावर एक मोठे शहर वसलेले होते. पलिकडच्या काठावरील उंच टेकडीवर माळ्याची चार पाच घरे वसली होती. त्यांच्या जरा बाजूला ४-५ झोपड्यात महार लोक रहात होते. एकूण २०-२५ घरांचीच ती वस्ती होती. या लोकांचे सर्व व्यवहार शहराशी निगडीत होते. त्यांचे जाणे-येणे नदीच्या पात्रा-तूनच होई. नेहमी गुडघाभर पाणी त्या वाटेत असे. पुरामुळे मात्र मांडीएवढे पाणी चढे व त्याला वेगही फार असे.

काठी टेकीत व एका हातात गोड्या तेलाची बाटली सांभाळीत कुशाबा माळी शहरातून आला. पाण्याच्या



काठाशी येऊन तो थांबला. अंधाराची पुसट छाया पडू लागली होती. कपाळावर आडवा हात ठेवून नजर दूरवर फेकीत तो मागे पाहू लागला. परंतु वस्तीकडे येणारे कोणी त्याच्या दृष्टीपथात आले नाही. तेथेच बसकन मारून, काठी त्याने बाजूला ठेवली. बाटली वाळूत जरा पक्की केली. आणि कमर चाचपून, चुरगळलेली कागदाची पुरचुंडी बाहेर काढली. थोडीशी त्यातील चिमूट तोंडात टाकून ती परत जपून कमरेला खोवली; अन् पुन्हा पलिकडील वस्तीवर जाणारे कोणी येत आहे का हे न्याहाळण्यास त्याने सुरवात केली. आता अंधार झपाट्याने वाढत होता. उशीरा धुवायला आलेल्या २-३ बायका कपडे बदाबद आपटून पिळीत होत्या.

" काय महागाई हाय, का भुताड ! इक्ता म्या जल्म घालइला पर रुप्या शेराच्या वर त्याल गेल न्हाई...... आट दिसाला आनलं व्हतं तर अडीच रुप्ये किलु म्हन !......आज ग्येलो तर ३ रुपे किलू!! ह्ये पाव किलु त्येल आता किती दिस जाणारऽ ? आन् तो पतुर ४ रुपे भाव चढणार ! काय गरीबानं जगावं का मरावंऽ ?"

मनाशी तो पुटपुटत होता. जवळ ठेवलेल्या बाटली-कडे मधूनच बघत होता.

अंगावर फाटके उपरणे, डोक्याला गुंडाळलेला कळकट फेटा, गुडघ्यापर्यंतचे जाड, राठ धोतर नी त्याच्या उंची इतकीच जाडजूड, खाली कथिलाचे टोपण बसविलेली काठी होती. म्हातारपणाने दृष्टी कमी झालेली, डोळे खोल गेलेले आणि हातापायांना कंप सुटलेला होता. मोठ्या ताकदीने, काठीच्या साह्याने तो बाटली सांभाळीत येथवर आला होता पण आता नदी पार करून वस्तीवर जाणे त्याला त्याच्या आवाक्याबाहेरचे वाटत होते. तसा तो पलिकडे गेलाही असता परंतु बरोबर ती तेलाची बाटली होती ना! स्वतःपेक्षा तेल सुरक्षित घरी न्यायला हवे होते. म्हणूनच मदतीसाठी तो कोणाला तरी शोधत होता. डोळे बारीक करून लांबवर पुन्हा पुन्हा पहात होता.

"कोन! लक्क्ष्या दिसतुया जादवाचा! आन् बैलबी हायती संग! कुठ बाजाराला ग्येलता जनु!"

लक्ष्मण तोपर्यंत जवळ आला होता.

"यवढी बाटली पल्याड निवून ठीव रं लक्क्ष्या...... हातातून पडायच भ्या वाटत!!"

"आता साळतली प्वार येत्यालं मागून! त्येंच्यापाशी दे बाटली! बैलबी आन् बाटली बी संगट, मला नाय् जमायचं!!"

तिशीतला लक्ष्मण असे म्हणत पाण्यात शिरुन, बैलांना हाकारीत पलिकडे गेला सुद्धा!

म्हातारा कुशाबा अंधारात तो दिसेनासा होईपर्यंत त्याच्याकडे बघत होता. नाना विचारतरंग मनात उमटले नि विरले.

"घरी सूनबाय वाट पगत आसल...चिमनी आन् धोंड्या जेवायला जल्दी करत आसतील, मी तर हितं बाटली धरून बसलुया...सैपाक ती कसा करल?...म्या बी जवानी पाहिलीया म्हना लक्क्ष्या...पन् असला ताठा कंदी केला न्हायऽ..."

आणखी ती अधू दृष्टी अंधारात लांबवरचा शोध घेण्यास नकळत वळली.

ह्यो कोन आता येतु या?...सक्याचा गोईंदा न् कौशी दिसत्याती जनुं!!......हाय... तीच हायती? मानसा-परीस प्वारं थोर '...ऐकत्याल माज ती."

वस्तीवरून शहराकडे दळण आणण्यासाठी जाणाऱ्या कौशी गोविंदाला, नदीपार आल्यावर कुशाबान साद दिली. पोरे जवळ येऊन उभी राहिली.

"एवढी बाटली पल्याड ठीवून येरं गोईंद्या!...मागून येतोच मी!"

"अंदार किती झालाया...आमाला शेहरात जायाचं हाये. पान्यातनं आता आलु आन् लगीच परत जायाच. आमी नाय जात बा...चल कौशे...!"

दोन्ही पोरं मार्गाला लागली. त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे कुशाबा किती तरी वेळ पहात होता!

विचाराची वादळं मनात उठली होती. काय ही मनुष्य प्रवृत्ती! अडलेल्याला, असमर्थाला मदत करायला लक्ष्मण आणि ती मुलेही खरंच असमर्थ होती का?

अंधार आता गडद झाला होता. नदीकिनाऱ्यावर चिटपाखरूही दिसत नव्हते. टेकडीवरील घरातून झोपड्यातून मिणमिणता प्रकाश फाकला होता. नदीचा खळखळाट अविरत चालू होता. अंग लचकत, मुरडत बेहोष झाल्यासारखी ती वहात होती. आपल्या दुर्बलतेला ती जणु उपाहासाने हसते आहे, असा कुशाबाला क्षणभर भास झाला.

आता वस्तीवरून येणारी आणखी एक आकृती कुशाबाला दिसली. तो घरी जाण्यासाठी फार अधीर तितकाच केविलवाणा झाला होता. बसून बसून तो फार कंटाळला. रात्रीचा अंधार वाटतच होता.

"आता ह्येला तरी बाटली पल्याड नेयाची बुद्धी दे देवाऽ!" मनोमन तो परमेश्वराला आळवित होता.

किती ही असहाय्यता? केवढी ही दुर्बलता! ह्याच कुशाबाने आपल्या जवानीत म्हसोबाच्या जत्रेत आपल्या, पेक्षा भारी गड्याला कुस्तीत चीत करून जरतारी 'शेमला' मिळवला होता. पण आता...? 'कालाय तस्मै नमः...' हेच खरे! वार्धक्य म्हणजे परावलंबित्व...आयुष्यातील ही असहायता!! सर्वस्वी पराधीन जिणे...प्रती मरणच! जीवनातील सोनेरी काळाचा, पराक्रमाचा हा अंतच!

खळाळती नदी ओलांडून ग्यानबा त्याच्याजवळ केव्हा आला ते कळलेही नाही त्याला. अर्धीअधिक उमर ग्यानबाची झालेली होती.

"अंदारात काय करताया कुशाबा? घरी जायाचं न्हवं कां?"





"आर जायाचं तर हाय पर जानार कसं? ह्या वाहत्या पान्यात पाय ठरत नाई ती...नी संग बाटली हाय त्येलाची...गेलु असतु पर बाटली पडायचं भ्या वाटतया रं!!

"चल् आन ती इकडं...ह्यो माजा हात धर!" ग्यानबा उलट पावली पाण्यातून कुशाबाला पैलतीरी घेवून गेला.

"ग्यानबा...!" कुशाबाला काय बोलावे, कसे उतराई व्हावे, यासाठी शब्द सापडत नव्हते. तोपर्यंत नदी पार करून ग्यानबा त्या अंधारात हळूहळू दिसेनासा होऊन, गेला सुद्धा.

पुन्हा एकदा कुशाबाच्या विचार सागरात तुफान उसळले नी त्याची पावले त्याबरोबरच घराकडे पडूं लागली होती.

एका हातात ती बहुमोल झालेली 'पावकिलु गोडे तेलाची बाटली, नी दुसऱ्या हातात काठी घेवून तो वृद्ध अंधारात मार्ग क्रमत होता.

"माणुसकीचा, सहानुभूतीचा अंतकाळ आणि कलियुगाचा तो प्रारंभ होता."

▣ ▣ ▣

# संग्रहाचे वेड

श्याम जांभळे
प्रथम वर्ष, वाणिज्य.

*व्यक्ती तितक्या प्रकृती या न्यायाने प्रत्येक व्यक्तीला कोणत्या ना कोणत्या प्रकारचे छंद, म्हणा, अगर वेड म्हणा असतेच.*

मनुष्य म्हटला की त्याला छंद हा आलाच. छंद म्हणा की वेड म्हणा, अर्थ एकच. तथापि वेड हा प्रकार लहान वयात असतो, पण जसे कॉलेजचे भव्य प्रांगण पुढे दिसूं लागते तसेतसे मुलांना एक एक छंद जडावयास लागतात. छंद दोन प्रकारचे असतात. एक चांगले छंद अन् दुसरे वाईट छंद...हा आमचा आवडता छंद आहे असे पुष्कळ वेळा ऐकावयास मिळते. तेव्हा यावर जास्त विश्लेषण नको. तथापि वेड हा प्रकार काही असा नाही. दूरदृष्टीने पाहिल्यास दोन्हीही प्रकार चांगलेच आहेत असे वाटते.

व्यक्ती तितक्या प्रकृती या न्यायाने प्रत्येक व्यक्तीला कोणत्या ना कोणत्या प्रकारचे छंद म्हणा, अगर वेड म्हणा असतेच. 'कोणाला कशाचे अन् कोणाला कशाचे' अशी मराठीत म्हण पडली ती ऊगीच नाही. कोणाला पोष्टाची तिकिटे गोळा करण्याचा छंद असेल तर कोणाला स्वतःचेच फोटो-निरनिराळ्या 'पोझ' मधील-जमा करण्याचे वेड असेल. कोणाला नवनव्या व्यक्तींचे पत्ते घेण्याचा छंद असेल तर कोणाला देशाच्या प्रगति-विषयक अभ्यासाचा छंद असेल. पिण्डे पिण्डे मतिर्भिनाः या संस्कृत ऊक्तीप्रमाणे छंद लागत असल्यामुळे हा छंद चांगला तो वाईट असे आपणास म्हणता येणार नाही.

मोठमोठे लेखक म्हणा, कवी म्हणा अगर अन्य कोणी म्हणा. त्यांना छंद हे असतातच. हो, राहिलेच की, कोणाला निरनिराळया प्राण्याचे आवाज काढण्याचे वेड असते तर कोणाला भाव 'खाण्याचे' भारी वेड असते. तेव्हां काय म्हणत होतो मी, आठवले. काही माणसांना विसराळूपणाचा जबर छंद असतो. बरे आता "आपण आपल्या मुख्य विषयाला हात घालूं" हा ही एक वेडाचाच प्रकार नाही का? मला चांगले आठवते की, जेव्हा मी कॉलेजात होतो

तेव्हा मला एक प्राध्यापक होते. एकदा वर्गात 'लेक्चर' चालू होते. तेव्हा सांगावयाचे तात्पर्य हे की वरील वाक्य त्या महाशयांनी इतक्या वेळा उच्चारले की, ४५ मिनिटे होऊन गेली तरी मूळ विषयाला त्यांनी काही हात घातला नाही. ही गोष्ट तरी मला यावेळी नेमकी कशी सुचली. गतस्मृतीची आठवण करण्याचे मला वेडच आहे. एका माणसाने म्हणे एका मिनिटात दहादा 'एकदम' असा शब्द ऊच्चारुन स्वनःचेच पूर्वीचे 'रेकॉर्ड' ब्रेक केले. आहे की नाही गंमत. संग्रहाचे वेड हे असेच असते.

ज्याप्रमाणे अर्थशास्त्र सांगते की, Wants turn into Habits त्याप्रमाणे वेडाचे रूपांतर छंदात होत असते. तेव्हां वेड आणि छंद यात काहीच फरक नाही. नामदेवाला की मुक्तेश्वराला म्हणे असलेच छंद लिहण्याचे वेड होते. त्यामुळे मराठीत 'मुक्तछंद' आला असावा.

'मुले म्हणजे फुले' असे म्हणणे हा सुद्धा एक छंदच आहे. तेव्हां मुलांनी काही जरी गुण उधळले तरी ते क्षम्य मानणे हाही एका वेडाचाच प्रकार. कॉलेजात तर हे छंद हरघडी प्रत्ययास येतात. बाण मारणे किंवा 'मस्का' फेकून मारणे हे छंद काही अनोळखी नाहीत. बरे. असो! आता आपण आपल्या मुख्य विषयाला हात घालूं मात्र एक सांगायचे राहिलेच. आपण एखादी रहस्यमय अथवा तसल्याच दर्जाची इतर कोणती तरी कादंबरी वाचण्यात दंग झाला आहात, इतक्यात कोणी एक तुमचा 'जीवश्च-कंठश्च' तेथे आला त्याने तुमचे डोळे झाकले. त्याने तुम्हाला म्हटले, 'मी कोण आहे बरे?' मग तुम्ही काय म्हणता माहीत आहे 'च्यायला' हे ही एक वेडच नव्हे का? एवढे म्हटल्यानंतर तुम्हाला या लेखाचे मर्म कळाले नसेल तर माझा नाईलाज आहे. अशावेळी 'सॉरी' म्हणणे हे एक महावेडच!

व्यक्ती तितक्या प्रकृती या न्यायाने आपण वर जे पाहिले त्यावरून तुम्हाला एक 'वेड' लागले असेल असे मला वाटते. तुमचे ते वेड रास्त आहे, त्या वेडाचे समर्थन करण्यास मी असमर्थ आहे असे तुम्हास वाटते का? नाही, मात्र एक अट आहे. ती म्हणजे 'डोन्ट लाफ!'

छे! माझे वेड सांगण्याचे मला धाडसच होत नाही. पण थांबा, एवढे 'सिरीयस' होवूं नका. श्रीकृष्णाने म्हणे सोळा सहस्र बायका केल्या होत्या त्याप्रमाणें माझे 'हे' वेड असेल असे तुम्हास वाटते का? परंतु प्रिय वाचकहो, असा गैरसमज करून घेवूं नका. सर्व काही व्यवस्थित सांगतो. मात्र वेताळाने राजाला काय सांगून ठेवले याची नोंद ठेवा.

आमच्या सौ. ना एक सवय म्हणा अगर काहीतरी आहे. फार अजब सवय आहे ती. लग्नाच्या आधीपासून मी तिची ही सवय पहात आलो आहे. सांगू ती सवय? हो, सांगतोच— 'चला चावट कुठले!' मग मी काय केले माहीत आहे. मी त्यासाठी एक वही केली आहे. नुकताच मी त्याचा रौप्यमहोत्सवही साजरा केला. आहे की नाही आमचे संग्रहाचे वेड!


माफक व योग्य दरात माल मिळण्याचे एकमेव ठिकाण

**गोपाळ राजाराम निबंधे**

**बारामती**

किराणा, भुसार व बियांचे व्यापारी

आमच्याकडे देशी व विलायती भाजीपाल्याचे बी ठोक व किरकोळ दरात मिळेल.




# वार्षिक स्नेहसंमेलन

## आचार्य अत्रे यांचे स्वागत



प्राचार्य पाटील, आचार्य अत्रे, डॉ. व. मा. कोठारी, प्रा. चाफेकर व मागे प्रा. पाटील.

## आचार्य अत्रे यांचे मंत्रमुग्ध करणारे वक्तृत्व



## जिमखाना १९६४-६५



खुर्चीवर :– प्रा. सु. जि. आरवाडे, प्रा. र. मा. दोशी, प्रा. पं. शि. शेवाळे, प्राचार्य अ. आ. पाटील, प्रा. एम्. के. पाटील, प्रा. पी. आर. दोसी, प्रा. ए. एस्. किणिंगे.

उभे :– कु. पुष्पा यादव, श्री. एम्. ए. सावंत, श्री. डी. एस्. गायकवाड, श्री. गायकवाड, श्री. बडवे, श्री. जवाहर शहा, श्री. एस्. पी. जाधव, कु. रेचेल जाधव.

एक विनोदी नाट्यछटा :

# काट्यांना अभ्यासच करावयास नको


चं. दे. बाफना,
द्वितीय वर्ष, वाणिज्य


अग ऐकलंस का ! जरा इकडे ये बघूं. काय म्हणतेस, मला वेळ नाही ? मी काय तुमच्यासारखी रिकामटेकडी नाही. म्हणजे मी रिकामटेकडा आहे ! आणि तुम्ही सर्व कामात गुंतलेले आहात असंच ना ?

अगोदर आली असतीस तर ? पण गुपचुप कसे यायचे ? काहीतरी खुसपट काढायची सवय लागली आहे ना ती जाणार कशी ? हो बरोबर जित्याची खोड मेल्याशिवाय जाते का ?

बरं ते जाऊ दे काय म्हणतेस, मी कोठे धरून ठेवलंय ? बरं बाळ्या गेला कोठे ! काय म्हणतेस मी काय रिकामी आहे त्याच्याकडे लक्ष द्यायला ? अग मग आई कशाला झालीस ?

बाळ्या ए– बाळ्या...! काय म्हणतोस हुकमाचा बदाम ? अरे गाढवा, पत्ते खेळतोस होय. तुझा परीक्षेचा निकाल लागला ना ? मग प्रगती-पुस्तक दाखव. काय ? इस्पीकचा एक्का ? हरे राम राम, काय म्हणावे त्या मुलाला. अभ्यासच करायला नको काट्यांला, पत्ते खेळायला हवेत नुसते. अरे प्रगती-पुस्तक दाखव ना ! काय ? अरे गाढवा मी इकडे घसा फोडून ओरडतो आहे आणि तुझे आपले बदाम राणी चौकट गुलाम ?

काय म्हणतोस ? मास्तरांनी दिले नाही अजून ! अरे आज तीन दिवस झाले; मला मास्तरांनीं सांगितले काल ? बघा दप्तरात ? काय म्हणावे या काट्यांला ? बापाला उलट बोलतो ( प्रगतिपत्रक शोधीत ) हे बघ. इंग्रजीच्या पुस्तकात ( बघून ) लाल रेघ...धोका...धोका ! राम राम राम राम... पाच विषयात नापास. काट्यां पाच विषयात नापास झालास त्याचे काही वाटतेका ? पत्ते खेळतोस. थांब, तुला चोपल्याशिवाय तू वठणीवर येणार नाहीस. काय म्हणतोस ? पुढच्या परीक्षेला करील अभ्यास ह्याच वृत्तीमुळे मुले डोक्यावर बसतात. काट्यांना अभ्यास ! देखील करायला नको आणि वर आईचा पाठिंबा म्हणजे झाले, मुले पहिल्या नंबराने पास !

▣ ▣ ▣

# शिक्षण आणि चारित्र्यसंवर्धन

प्रा. दयाराम पाटील
एम्. ए. बी. एड्.

### प्राचीनकाळी—

शिक्षणाचे मानवी जीवनात फार मोठे स्थान आहे. शिक्षणाने मानवाची जडण घडण होत असते. शिक्षण-शास्त्रज्ञांनी शिक्षणाचे विविध उद्देश सांगितले आहेत. त्यात चारित्र्य संवर्धन-शील संवर्धन हा शिक्षणाच्या विविध उद्देशातील एक महत्त्वाचा उद्देश आहे. मानवी जीवनात शीलाचे फार महत्त्व आहे. 'सुखस्य साधनं शीलम्' 'शीलं परं भूषणम्' इत्यादि सुभाषितांच्या द्वारा आपणास शीलाचे महत्त्व कळते.

प्राचीन काळात आपल्या देशात गुरुकुल पद्धतीने शिक्षण दिले जाई. त्या शिक्षणात धार्मिक शिक्षणाला महत्त्वाचे स्थान होते, आत्म्याच्या उन्नतीचाही एक दृष्टिकोन होता-त्यासाठी तपश्चर्या, भक्ति आदि गोष्टी आवश्यक होत्या.

### शिक्षणशास्त्रात मानसशास्त्र आले.

पुढे काळ बदलला. औद्योगिक क्रांती झाली. शास्त्रीय प्रगती झपाट्याने होऊ लागली. निरनिराळ्या शास्त्रांचा अभ्यास होऊं लागला आणि शिक्षणाला महत्त्व प्राप्त झाले. विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात साहित्य शिकविले जाई. आणि भाषाज्ञानाच्या आधाराने औद्योगिक व शास्त्रीय माहिती विद्यार्थ्यांना मिळूं लागली. शास्त्र विषयातील विविध संशोधना मुळे विज्ञानाची वाटचाल वेगाने होऊ लागली. विद्यार्थ्यांच्या विचार शक्तीला व तर्कशक्तीला चालना मिळाली पण विद्यार्थ्यांच्या मनाचा विकास झाला नाही. परिणामतः शास्त्रीय ज्ञानाच्या जोरावर एक व्यक्ती दुसऱ्यावर, एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रावर कुरघोडी करूं लागले. मनुष्य स्वयंकेन्द्रित व स्वार्थी बनला. तेव्हा तत्त्वज्ञांचे लक्ष व्यक्तीच्या मनाकडे वळले लोकशाहीवादी विचारसरणी-मुळे त्यात एक नवा दृष्टिकोण निर्माण झाला. व्यक्ती हा एक समाजाचा घटक आहे. व्यक्तीची प्रगती नाही तर समाजाची प्रगती नाही, हे लक्षात घेऊन व्यक्तीच्या चारित्र्याच्या घडणीकडे विशेष लक्ष देण्यात आले. मानसशास्त्राचा उपयोग शिक्षण शास्त्रात करण्यात आला आणि आदर्श नागरिक निर्माण करण्याच्या दृष्टीने मनो-विकासाकडे लक्ष देण्यात आले.

### संघटित 'स्व' म्हणजे चारित्र्य—

चारित्र्याची (Character) व्याख्या करणे सोपे नाही. सुप्रसिद्ध शिक्षण शास्त्रज्ञ जेम्सरॉस यांनी चारित्र्याची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. "Character is the organised self" – संघटित-'स्व'-म्हणजे चारित्र्य होय. व्यक्तीच्या मनाचा कल, स्वभाव, प्रकृती, महत्त्वाकांक्षा इत्यादींच्या संकलीत परिणामातून व्यक्तीची झालेली घडण म्हणजे चारित्र्य. It is the organisation of our instincts and sentiments into the Master sentiments. आपल्या सहज प्रवृत्तींचे व भावनांचे एका उच्चतर अशा भावनेत झालेले एकीकरण म्हणजे चारित्र्य



अशी व्याख्या करता येईल. विशिष्ट गुणधर्मांनी युक्त अशा व्यक्तीबद्दल बोलतांना तो चारित्र्यवान आहे असे आपण म्हणतो. चारित्र्य ही एक प्रकारची क्षमता आहे, शक्ती आहे. ज्या शक्तीमुळे आपणास न्याय-अन्याय, सत्य-असत्य, चूक-बरोबर हे कळू शकते. सत्याचे ज्ञान होते, सत्कर्म घडते, अन्यायाबद्दलची चीड निर्माण होते, सहिष्णुता, कर्तव्यनिष्ठा, विवेकशीलता या गोष्टींची आपणास जाणीव होते. चारित्र्यात या सर्व गोष्टींना महत्त्वाचे स्थान आहे. शिवाय कर्तव्याकर्तव्याच्या संघर्षात उच्चतर कर्तव्याची निवड करण्याची क्षमता चारित्र्यात अभिप्रेत असते. चारित्र्यवान पुरुष अशावेळी श्रेष्ठतर कर्तव्यास महत्त्व देतात.

### भारतीय परंपरेतील आदर्श—

आपल्या भारतीय इतिहासात असे अनेक थोर पुरुष होऊन गेले की; ज्यांनी आपल्या जीवनात उच्चतर कर्तव्याला महत्त्वाचे स्थान दिले. प्रभू रामचंद्राच्या जीवनातील एक प्रसंग भवभूतीने आपल्या 'उत्तर रामचरितम्' मध्ये चित्रित केला आहे. एकीकडे प्रिय पत्नीला तिचे डोहाळे पूर्ण करण्याचे वचन श्रीरामचंद्र देतात. आणि त्याच वेळी परमपूज्य गुरूंकडून लोकांची आराधना आपल्या पूर्वपरंपरेला अनुसरून कर म्हणून आलेल्या निरोपाचा स्वीकार करतात व सांगतात की,

"स्नेहं दयांच सौख्यंच यदि वा जानकीमपि।
आराधानाय लोकस्य मुञ्चतो नास्ति मे व्यथा॥"

आणि पुढे श्री रामचंद्रानी प्रिय पत्नी सीता हिच्याबद्दल लोकापवाद निर्माण झाला असता-' लोकांच्या आराधनेला महत्त्व दिले व सीतेचा त्याग केला. स्नेह सौख्य एवढेच नव्हे तर सीतेचा जरी त्याग करण्याचा प्रसंग माझ्यावर लोकाराधनेस्तव आला तर तोमी अवश्य करीन. हे आपल्या गुरुला दिलेले वचन त्यांनी पाळले. त्यांच्या जीवनातील दिव्यत्वांचे दर्शन आपणास या द्वारा घडते.

गौतमबुद्धांनी समाजातील दुःख पाहिले. त्यांचे हृदय पिळवटले. त्यांनी मनाशी निश्चय केला आणि जीवनातील भौतिक सुखाचा, ऐश्वर्यांचा त्याग करून मानवी जीवनातील दुःख नष्ट करण्याचा मार्ग शोधण्यासाठी ते बाहेर पडले. कौटुंबिक सुखापेक्षा समाज कल्याण अधिक मोलाचे आहे. असे गौतमबुद्धांनी मानले.

तानाजीने शिवरायाची आज्ञा शिरसावंद्य मानून रायबाचे लग्न मागे ठेवून कोंडाणा सर करण्याची प्रतिज्ञा केली व ती पूर्ण केली.

महात्मा ज्योतिबा फुले, लोकमान्य टिळक; आगरकर, म. गांधी, पं. नेहरू इत्यादि थोर पुरुषांनी भौतिक सुखाचा त्याग करून आपले सर्व जीवन समाजाच्या कल्याणासाठी अर्पण केले. भारतीय परंपरेतील थोरांचा हा वारसा आपल्याला चालवायचा आहे.

चारित्र्याचा विचार करताना केवळ चार गुणांचा समुदाय म्हणजे चारित्र्य नव्हे; तर सर्व गुणांचा एक-मेकाशी संयोग होणे ही गोष्ट फार महत्त्वाची आहे.

### चारित्र्यात सवयींचे स्थान—

म्हणूनच लहान मुलांतील, विद्यार्थ्यांतील गुणांचे संयोगीकरण शिक्षणाच्या द्वारा होणे महत्त्वाचे आहे. प्रारंभी सर्वच क्रिया सहेतुक होत नसतात. पण पुढे त्या आपल्याकडून जाणीवपूर्वक होऊ लागल्या म्हणजे त्या स्थिर होतात. व त्या क्रिया, सवयी स्थिर झाल्या म्हणजे पुढचा विकास सुलभ होतो. सवयी (Habit formation) हा चारित्र्याचा एक महत्त्वाचा भाग आहे मुलांना केवळ उपदेश करून चांगल्या सवयी लागणार नाहीत तर चांगल्या सवयी स्वीकारण्याची त्यांच्या मनाची तयारी आपण करून घेतली पाहिजे. 'खरे बोला' हा उपदेश काम करणार नाही. धैर्याच्या कथा सांगून ते धैर्यवान होणार नाहीत. तर त्यांना ते गुण दाखविण्याची परिस्थिती निर्माण करून दिली पाहिजे. चारित्र्य निर्मितीसाठी सवयींची संगती लावली पाहिजे. या संवयी आदर्श व भावनांच्या मानाने दुय्यम अशा असाव्यात. संकट समयीच माणसाची कसोटी लागते, त्यावेळी दोन गोष्टींतील संघर्षात उच्चतम अशा गोष्टीची निवड करताना बुद्धीचा आश्रय घ्यावा लागतो. काही प्रमाणात दूरदृष्टी व परिणामाची कल्पना करण्याची शक्ती या गुणांचा उपयोग होतो. बुद्धीने जो क्रियाशील व जागृत असतो तो चारित्र्यसंपन्न ठरतो. इष्टनिष्ट विवेकबुद्धी त्याच्याजवळ असते.

स्वभाव हा मनाचा गुणधर्म आहे. आयुर्वेदाप्रमाणे वात, पित्त, कफ याच्या कमी अधिक प्रमाणावर माणसाची विशिष्ट प्रकृती बनत असते. निरोगीपणा व्यक्तीच्या चारित्र्याच्या घडणीस उपयुक्त ठरतो. स्वतःचे निश्चित

केलेले ध्येय चारित्र्य घडणीस उपकारक ठरते. सहजप्रवृत्तींचे उदात्तीकरण झालेले असते, चांगल्या सवयी सुसूत्रपणे एकरूप झालेल्या असतात. अनेक भावनांचे एका चांगल्या भावनेशी संयोगीकरण झालेले असते. आदर्शांची घडण झालेली असते अनिष्ट गुणांचे प्रयत्नपूर्वक उच्चाटण झालेले असते. बुद्धीचा उपयोग करण्याची क्षमता निर्माण झालेली असते. या सर्व गोष्टींचे संयोगीकरण एकाच वेळी जेव्हा प्रकट होते, ज्या व्यक्तीद्वारा ते प्रकट होते ती व्यक्ती चारित्र्यसंपन्न ठरते.

शिक्षणाच्या द्वारा विद्यार्थ्यांच्या बालमनावर या सर्व क्रिया प्रक्रिया होत असतात व त्यांच्या मनाची जडण घडण होत असते. ही सर्व क्रिया प्रत्यक्षात दिसत नाही. अप्रत्यक्षपणे ती विद्यार्थ्यांवर कार्य करीत असते.

**चारित्र्य घडविणारे : पालक आणि शिक्षक :—**

हे मूल जन्मल्यापासूनच त्याच्यावर संस्कार होत असतात. त्यावर होणारे हे बालपणातील संस्कार हे देखील शिक्षणच होय. हे शिक्षण त्याला आपल्या घरातील कुटुंबियांकडून मिळते. जसजशी त्याची वाढ होते तसतशी त्याची संस्कारक्षमता वाढत जाते. पुढे समाज-व-नंतर शाळा त्याच्या घडणीतील आपला वाटा उचलतात. आणि अशा प्रकारे कुटुंब, समाज व शाळा या तीनही घटकातून त्याची घडण केली जाते, कुटुंबातील चांगल्यावाईट अशा गोष्टींचा परिणाम त्याच्या बालमनावर होतो. वाईट सवयी त्याला लागू नयेत याची दखल कुटुंबियांनी घेतली पाहिजे–तसेच तो आपल्या दैनंदिन कामात तत्पर राहिल अशी योजना केली पाहिजे. कुटुंबात त्यावर झालेले चांगले संस्कार–समाजात वावरतांना त्याला वाईट गोष्टीं पासून परावृत्त करतील व समाजातील चांगल्या गोष्टींचे तो ग्रहण करील व अशा प्रकारे कुटुंब व समाज या द्वारा चांगल्या रीतीने घडविला गेलेला हा मुलगा–शाळेत आदर्श विद्यार्थी म्हणून नावाजेल. मुलांच्या घडणीत विशेषतः त्यांच्या चारित्र्याच्या घडणीत अशा प्रकारे घर (कुटुंब), समाज व शाळा हे तीनही घटक अतिशय महत्त्वाचे आहेत.

या तीनही घटकात विद्यार्थी सदैव वावरत असतो. त्याच्यावर सारखे संस्कार होत असतात. तो घडविला जात असतो. त्याचे मन संपन्न होत असते. त्याच्या चारित्र्याची घडण होत असते. एखाद्या वस्तूला उत्तम आकार येण्यासाठी ज्याप्रमाणे ऐरणीवर ती वस्तू ठेवून घणाचे प्रहार करावे लागतात. त्याप्रमाणे–घर, समाज व शाळा या माध्यमातून वावरणाऱ्या विद्यार्थ्यांवर सुसंस्काराचे प्रहार सतत झाले पाहिजेत. म्हणजे आपल्याला पाहिजे असलेला चारित्र्यसंपन्न नागरिक निर्माण करता येईल. कारण चारित्र्य यशाची गुरुकिल्ली आहे. “ Character is the key to success ” म्हणूनच शिक्षकांप्रमाणेंच पालकांनी देखील आपली आपल्या पाल्यांबाबतची जबाबदारी पार पाडली पाहिजे.

▣ ▣ ▣


—— मा णि क चं द ॲ न्ड ब्र द र्स ——
किराणा व भुसार मालाचे व्यापारी
बारामती ( पुणें )
• आमचेकडे घाऊक व किरकोळ,
निवडक किराणा व भुसार माल योग्य दरात मिळेल •




# मी आणि टी. डी. चा अभ्यासक्रम

**सौ. वैजयन्ती डंके,**
टी. डी.

मी आणि माझा टी. डी. चा अभ्यासक्रम [ समय रात्री २॥ वाजता ]

मी ? आणि कॉलेजला जाणार ? माझी मलाच ही कल्पना किती हास्यास्पद प्रथम ! अनंत अडचणींनी माझ्या या योजनेला कसून विरोध केला. परंतु मला हार्दिक प्रोत्साहन देणाऱ्या गुरुजनांचे प्रयत्न या अडचणीतूनही पार झाले. आणि खरोखरी मी कॉलेजमध्ये नाव दाखल केले. पण म्हणून अडचणींची ही चिवट परंपरा संपली असेल असे वाटते ? छे, उलट प्रसंगी तिचे उग्र स्वरूप पाहून मला अयशस्वी माघार घ्यायचा सतत मोह व्हायचा.

प्रथम वाटले, कॉलेजला माझ्यासारख्या संसारी स्त्रीने जाणे कितपत योग्य आहे ? बरं गेले, तर शाळा, अभ्यास, परीक्षा यांच्याशी सहा सात वर्षे गट्टी-फू केलेली मी, तशी एकाकीच पडणार. कॉलेजमध्ये मी म्हणजे एक करमणुकीचे पात्र तर नाही ना ठरणार ? किती म्हणून शंका शृंखलेसारख्या भोवती खळखळल्या; परंतु माझ्या मनातील ‘ केल्याने होते आहे रे ’ ही खोलवर रुजवली गेलेली सद्‌भावना त्या पोकळ शृखंलांना बद्ध करता आली नाही.

बरं, कॉलेजमध्ये येऊन शिकायचे काय तर म्हणे शिक्षणशास्त्र, तेही अधुनिक. मनात म्हणाले शिक्षक व्हायचं तर कोणालाही अन् केव्हाही होता येईल. त्यासाठी हा टी. डी. चा द्राविडी प्राणायाम कशाला हवा ? पण तात्पुरता हा विचार बाजूला ठेवून म्हणाले, पाहूं या तरी काय गौडबंगाल आहे ते! पण छे, सारच अजब इथं अभ्यासासाठी नेमलेले शैक्षणिक बालमानसशास्त्र, अधुनिक सामान्य अध्यापन पद्धती यासारखे लांबरुंद नावे असलेले विषय, बापरे ! पण नावात काहीच नाही असा अस्सल हिसका त्यांच्या अतिपरिचयाने समजला. मानसशास्त्राने माझ्या मनाची काय अवस्था केली हे न सांगणेच बरे. काय तर म्हणे ज्ञानसंक्रमण, ज्ञानार्जनाचे सिद्धांत, मन. शरीरसंबंध परिस्थितीचा विकास ( Stimulus Response ) आणि हो, डोक्याच्या कवटीतील व पाठीच्या मणक्यातील “ सुरक्षित ” असलेले मेंदु व मज्जासंस्था यांच्यातील गुंतागुंत समजावून घेता घेता माझ्या पाठीचा कणा मात्र खिळखिळा झाला. जोडीला आणि ती शिक्षणशास्त्राची मूलतत्त्वे, बालकेंद्री शिक्षण व व्यक्ति विकास यानी मला माझ्या सद्यः परिस्थितींत मनाचा समतोल राखायचा आदर्श ( ? ) अमृतोपदेश केला. आदर्श शालेय व्यवस्था कशी असावी याचे ज्ञान सुद्धा म्हणे आम्हाला हवेच. शरीरिक शिक्षणाच्या संदर्भात समजले की शिक्षक हा ज्ञान संपन्नते बरोबर सुदृढ व धडधाकट शरीरयष्टीचा हवा. पण जवळ जवळ बी. एड्च्या तोडीचा हा टी. डी. चा डोस पचविल्यानंतर ना ? सायन्स, आर्टस्‌चे एव्हरेस्ट प्रमाणे दिसणारे अभ्यासक्रम परवडले पण टी. डी. ची ही क्षुल्लक व ठेंगणी दिसणारी; पण प्रत्यक्ष चढणारास तिचे खरे अंतरंग दाखवणारी ही आडवळणी टेकडी

चढताना आमची व आम्हाला मार्गदर्शन करणाऱ्या त्या बिचाऱ्या प्राध्यापकांची काय अवस्था झाली असेल याचा विचारही नको. आणि मग मी कल्पनेने रेखाटलेले शिक्षकाचे हिडीस चित्र नकळत पुसले गेले. इतकेच काय पण 'मागता येईना भीक तर मास्तरकी शीक' या सर्व सामान्य कुचेष्टेच्या भावनेला जोरदार थप्पड बसली!

आता शिकायला प्रारंभ करून टी. डी. चे आव्हान तर स्वीकारले, पण म्हणून सर्व काही सुतासारखे सरळ नव्हते. निदान माझ्या बाबतीत तरी. 'आप लिखे खुदा पढे' असले अक्षर धीरे धीरे सुधारू लागले. सवयीचा परिणाम वाईटाप्रमाणे चांगलाही असतो हे तेव्हा पटले. रोज पहाटे उठून प्रथम गृहिणीची भूमिका पार पाडायची आणि मग आपण त्या गावचेच नाही जणू अशा भावनेने हल्लीच्या कॉलेजकुमारीकेचा आव आणून कॉलेजला जायचे. पण हे उसने अवसान न्यायाधीशाच्या शिरताजाप्रमाणे रोज चढवावे लागे. बाकीचे विद्यार्थी अगदी शिकवण्याकडे केंद्रिभूत झालेले असताना मी मात्र एखाद्या संपूर्ण परभाषी प्रांतात आल्याप्रमणाणे अधांतरी रहायची. वाटायचे, कसे जमणार मला हे? उगीच हात दाखवून अवलक्षण तर नाहीना होणार? पण आमच्या पूज्य व कुशल प्राध्यापक वर्गाने मला किती कळकळीने मार्गदर्शन केले व यशाची जवळची पाऊलवाट दाखवून दिली. उत्साहाने केलेल्यां अभ्यासात व तन्मयतेने घेतलेल्या पाठात मला माझ्या यशाचे स्वच्छ प्रतिबिंब दिसूं लागले.

खरोखरी, या शिक्षणशास्त्राच्या आधाराने अध्यापन कौशल्य आत्मसात करायचे म्हणजे येऱ्या गबाळ्याचे काम नव्हे. बालमानसशास्त्राच्या दृढ तत्त्वावर आधारलेली ही शालेय सुव्यवस्था राखायला शिक्षक ही तसाच हुशार, खंबीर व उमदा हवा. मनाने अन् शरीरानेही.

थोडक्यात काय? आपल्या प्रत्येक भावी पिढीची तावून सुलाखून, विकसित व सर्वगुणसंपन्न स्वतंत्र भारतीय अशी दृगोचर कलाकृती साकार करणाऱ्या या शिक्षकाची म्हणजे शिल्पकाराची भूमिका म्हणजे निःसंशय प्रदीर्घ उपासनेची व आराधनेची अखंड परंपराच होय.


उराडे ब्रदर्स

बारामती व अकलूज

सर्व प्रकारचे कापड
योग्य दरात
मिळण्याचे ठिकाण




# मूक–कलाकार


कु. पुष्पा जवळेकर,
प्रथम वर्ष साहित्य


*त्या चित्राखाली त्याने 'पोरके बालक' असे नाव घालून ते चित्र त्याने स्पर्धेत पाठविले आणि......*

खरोखर! तो दिवस उजाडला की अजूनही आनंदाच्या उकळ्या फुटतात. केवढा तो आनंद! केवढा तो गोंधळ! मधुकरच्या त्या आनंदाला सीमा नव्हती.

खरेच! आपले जे अत्यंत पूज्य असे संत शिरोमणी ज्ञानेश्वर महाराज जे म्हणतात की "सोनियाचा दिवस आजी अमृते पाहिला"। तोच दिवस सार्थ आहे. जे पारमार्थिक वृत्तीचे लोक असतात त्यांना देवाची भेट झालेला जो दिवस तोच सोनियाचा दिवस वाटतो. तेच त्यांचे भाग्य आहे असे ते समजतात. परंतु प्रापंचिक लोकांना असाध्य गोष्टी साध्य झाल्या की तोच दिवस सोनियाचा वाटतो. त्यांतच त्यांच्या जीवनाची सफलता साठविलेली असते.

वासंती व मधुकर यांचा तो "लता–कुंज" नावाचा भव्य बंगला येणाऱ्या जाणाऱ्यांच्या नजरेत भरत असे. अशा या भव्य नी सुंदर बंगल्यात मधुकर व वासंती हे तरुण जोडपे सुखाने नांदत होते. मधुकर हा अत्यंत सालस व विनोदी वृत्तीचा होता व त्याच्या आईवडिलांनी त्याला साजेशा वासंतीशी त्याचा विवाह घडवून आणला होता. असे एकविचाराचे व आनंदी जोडपे त्या लताकुंजात आपल्या सुखी आयुष्याची कालक्रमणा करीत होते.

पण दैवाची लीला अगाध असते! अशा लक्ष्मीचा वरदहस्त असलेल्या या सुखी जोडप्याला कितीतरी दिवस मूलच होईना. दिवसें दिवस त्या भव्य लता-कुंजात तिसरे माणूस अवतीर्ण होऊन तो शांत बंगला अशांत करावा असे त्या जोडप्याला वारंवार वाटत असे. मधुकरच्या आईवडिलांना आपला नातू आपण आपल्या मांडीवर कधी घेऊं व त्याला कौतुकाने चालताना, हंसताना, कधी पाहूं असे झाले होते. पण! त्यांच्या दैवी हे आजोबा पदाचे भाग्य नव्हते. काळाचा घाला अचानकपणे केव्हा पडेल हे मानवी मूर्तीला कधीही कळणार नाही. थोड्याच दिवसात मधुकरचे आई-वडील अचानकपणे मृत्यु पावले. वासंती ही मातृपदासाठी आसुसलेली होती पण दैवी कृपेच्यापुढे कोणाचे चालत नाही. अनेक नवससायास केले. शेवटी वासंती व मधुकरचे भाग्यकमल फुलले व तिला सुंदरसे पुत्ररत्न झाले. वा! मधुकरच्या आनंदाला पारावार उरला नाही. आपल्या मुलाच्या आनंदातच आई-वडिलांच्या दुःखस्मृतीचा पट तो विसरण्याचा प्रयत्न करूं लागला. पण मधुकरच्या नशीबी इतका आनंद होता कोठे! त्याचा आनंद दैवाला पाहवला नाही व दैवाने अचानक वासंतीवर घाला घातला. वासंतीने जन्मलेल्या बालकावर आपल्या आनंद लहरींचा वर्षाव करून हसतमुखाने एक दृष्टिक्षेप टाकून आपले डोळे मिटले.

अरेरे! ह्या हृदय विदीर्ण करणाऱ्या बातमीने मधुकराचा ऊर दुःखाने भरुन आला. त्याला सर्वत्र अंधार दिसूं लागला. त्याच्या नजरेपुढे सर्वत्र भयाणता पसरली. त्याच्या घरातील प्रकाशाची ज्योत विझली व या काळोखात राहणे मधुकरला असह्य झाले. वासंतीने लावलेल्या सुंदर बागेत मधुकर जेव्हां जेव्हां प्रवेश करी तेव्हां तेव्हां त्याला वासंतीची उणीव भासत असे. त्याच्या बंगल्याभोवताली पसरलेल्या बागेत वसंतऋतूत बहरलेले वृक्ष असूनही त्याला त्याचे आस्तित्व भासेना. त्याला बागेतील वासंती गेल्याने सर्वत्र उदास वाटूं लागले. त्याच्या भाळी दैवाने पत्नीसुख दिले नव्हते परंतु पुत्रसुख देण्याची तरी कृपा केली होती. तो सुंदर गोरा बाळ घेऊनच तो घरी आला. परंतु अशा ह्या पोरक्या बाळाचा सांभाळ करण्यासाठी त्याच्या घरी कोणीच नव्हते. वासंती ही आपल्या गोंडस बाळाला निष्ठुरतेने पोरके टाकून निघून गेली. त्या पोरक्या मुलाला पाहून मधुकरचे दुःख अनावर झाले.

मधुकरने ह्या मुलाला सांभाळण्याकरिता आपली एक विधवा काकू होती तिला बोलाविले. तिने आपला हस्तस्पर्श केला व त्या लुसलुशीत बालकाला अलगद उचलून घेतले. त्या गोंडस बालकाने आवाज न करता जणू काय घेण्याला संमती दिली. ते गोंडस बाळ वासंतीचीच प्रतिमा होती. त्या बालकाने आपल्या काकूने उचलताना आवाजही केला नाही, अथवा रडलाही नाही हे बिचाऱ्या त्या मधुकरच्या आनंदोन्मत्त स्थितीत त्याच्या नजरेसही आले नाही. परंतु त्याची ती जिजाकाकू तिच्या चाणाक्ष दृष्टीतून मात्र ही त्या मुलाची उणीव सुटली नव्हती.

मधुकरला आपला मुलगा फार आवडत असे. तसेच ह्या बालकात त्याला नित्य वासंतीचे दर्शन घडे. तो त्याच्यावर मनापासून प्रेम करीत असे. त्याच्या उजव्या हाताला सहा बोटे व डाव्या पायालाही सहा बोटे असून चंद्रावर जसा कलंक आहे तद्वत त्याच्या गोऱ्या मनगटावर मोठा काळा डाग होता. मधुकरला त्या खुणांचे फार नवल वाटे. तो म्हणे वासंतीतील व त्याच्यातील फरक जाणण्याकरिताच दैवाने ही योजना केली आहे. त्याची जिजाकाकू मधुकर स्वतः घरी असताना त्या बालकाचा छान सांभाळ करीत असे. परंतु मधुकर नसल्यावर ती त्याचे अत्यंत हाल करीत असे.

एकदा जिजाकाकूने असा विचार केला की, अशा मुक्या मुलाला आपल्या एवढ्या संपत्तीचा मालक करण्यापेक्षा त्या गोंडस बालकाचा चक्काचूर करणेच इष्ट आहे. मुलाची ही व्याद काढून मधुकरचे दुसरे लग्न करून देऊन त्याला सुखी करावे असा या जिजाकाकूचा कुटिल कट होता. आपला हा बेत एका पहाटे तडीस नेण्याचे तिने ठरविले. एके दिवशी पहाटेच उठून तिने सर्व वातावरणाची चाहूल घेतली. ते उन्हाळ्याचे दिवस होते. पहाट असूनही चंद्रकोर ही रोहिणी समवेत पृथ्वीवर अमृताचा वर्षाव करीत होती. सर्वत्र शांतता व आनंदी वातावरण पसरले होते. निद्रादेवी अखिल विश्वाला आपल्या कुशीत घेऊन शांतपणे निद्रिस्त झाली होती. सर्वत्र गुलाबाचा सुगंध दरवळत होता. गुलमोहर बहरलेला होता. प्राजक्ताच्या कलिका चंद्राकडे पाहून आपले स्मित हास्य प्रकट करीत होत्या व अशा ह्या निसर्गाच्या सुंदर वातावरणाच्या पार्श्वभूमीवर ती जिजाकाकू आपली खलत्वाची भूमिका वठवूं लागली होती. अशा या पहाटेच्या सुंदर वातावरणात एका दाट व शांत सावली असलेल्या प्राजक्ताच्या झाडाखाली त्या गोंडस बालकाला ती निष्ठुरपणे ठेवून निघून गेली. अशा या निष्ठुरकृत्याची असह्यता जाणवल्याने त्या चंद्राने मंदप्रकाश पृथ्वीवर पसरवून अमृताचा वर्षाव करण्याऐवजी काळोखाचे पांघरूण स्वीकारून तो ढगाआड झाला. झाडाखाली हे बालक मुके असल्याने आपली अस्वस्थता प्रकट करण्यासाठी फक्त शरीराची वेडीवाकडी हालचाल करीत पडून राहिले होते व आपल्या अंगावर वर्षाव झालेल्या प्राजक्ताच्या फुलाशी खेळत होते.

मधुकर घरी येताच तो बाळ्याकडे धाव घेत असे. परंतु आज मात्र धाव घेताच त्याला आपले बाळ दिसले नाही. बाळ न दिसल्याने त्याचे हृदय विदीर्ण झाले. त्याने काकूकडे बाळाची चौकशी करता तिने बाळ पहाटे एकाएकी नाहीसे झाल्याचे सांगितले. बिचारा मधुकर! आता पुत्रसौख्यालाही पारखा झाला. त्याने बाळाच्या नावाने हंबरडा फोडला. परंतु व्यर्थ! त्याला त्याचा बाळ दिसेना.

अरेरे! एवढा दुःखाचा कडेलोट झाला तरी जिजाकाकूला त्याची दया येईना. खरेच! दगडाला पाझर फुटतो; परंतु एखादे मानवी हृदय दगडापेक्षाही कठोर असते त्याला कधीकाळी पाझर फुटणे शक्य नाही.

परंतु बाळ हा झाडाखाली खेळत असताना एक चित्रकार सृष्टिसौंदर्य पहाण्याकरिता आला असता त्याला ते गोंडस बाळ दिसले. त्याला मूल नसल्याने दैवाने





## माननीय कुलगुरुसमवेत :- टी. डी. विभाग (१९६४-६५)



खुर्चीवर:- प्रा. र. मा. दोशी, प्रा. एम्. के. पाटील, प्रा. सौ. वत्सला पाटील, डॉ. वि. ना. भावे, कुलगुरु न. वि. गाडगीळ, प्राचार्य अ. आ. पाटील, प्रा. द. तु. पाटील, प्रा. नी. ग. लोंढे, प्रा. के. मा. नाईक.

उभे, १ ली रांग :- कु. निर्मल पेंढारकर, कु. कुसुम राहतेकर, सौ. डंके, कु.वीणा राजे, सौ. नातू, कु. कुसुम काळे, कु. हेमलता केसकर, कु. मालती भोयरेकर.

उभे, २ री रांग :- कु. पांडकर, कु. वसंता दोशी, कु. शकुंतला रिठे, कु. शैला जोशी, कु. प्रमिला जांभेकर.

उभे, ३ री रांग :- सर्वश्री–भास्करे, पवार, जॉन साठे, अनिल पहाडे, कादर, कुरकुटे, सैय्यद, जाधव.

## विद्यार्थी कार्यकारी मंडळ :– (१९६४-६५)



खुर्चीवर :– प्रा. ज. खु. गोधा, प्रा. र. मा. दोशी, प्रा. पं. शि. शेवाळे, प्राचार्य अ. आ. पाटील, प्रा. एम्. के. पाटील, प्रा. रा. ति. अक्कोळे, प्रा. कां. फु. चोरडिया.

२ री ओळ :– प्रा. सु. जि. आरवाडे, प्रा. द. तु. पाटील, प्रा. ए. एस्. किणिगे प्रा. पी. आर्. दोशी, प्रा. कु. मृणालिनी दळवी.

उभे १ ली ओळ :– कु. पुष्पा यादव, कु. कृष्णा गौर, श्री. शहा, श्री. डी. एस् गायकवाड, श्री. गायकवाड, श्री. पी. एस. शहा, श्री. गरुड, कु. पुरंदरे, कु. रेचेल जाधव.

उभे २ री ओळ :– श्री. इंगुले, श्री. सावंत, श्री. जाधव, श्री. वडवे, श्री. जे. एम्. शहा, श्री. ललगुणकर.

आपल्याला हे पुत्ररत्न पाठविले असे म्हणून त्याने ते बाळ घरी आणले व तो त्या बालकाला कला–विलास या नावाने संबोधू लागला. त्या चित्रकाराचे नाव दयासिंग होते व त्याच्या बायकोचे नाव करुणामाता होते. खरेच त्या दोघांनी त्या बाळाचा सुंदर सांभाळ करण्याचे ठरविले. कला–विलास मुका होता; परंतु त्याच्या अंगात उत्कृष्ट कला होती. त्याला बोलता येत नव्हते; परंतु त्याच्या हालचालीवरून दयासिंग व करुणामाता यांना सर्व कळत असे. जणू काही ही त्याची हालचाल हेच त्याचे बोलणे होते.

परंतु मधुकरचे काय झाले? मधुकरला आपल्या संपत्तीची फिकीर वाटेना. तो दुःखाने वेडा पिसा झाला. तो, वासंती व छोटा बाळ यांच्या स्मृती विसरण्यासाठी आपल्याला मद्य, गायन, वादन यात बुडवून घेत असे. अनेक विलासात तो रंगू लागला. परंतु तो नाचकाम वगैरे बघण्यास जात नसे. जणू त्याला सर्व स्त्रिया ह्या आपल्या वासंतीपुढे तुच्छ वाटत. कोणताही छोटा मुलगा दिसला की, तो आपला बाळ आहे असे समजून त्याला कवटाळीत असे, खाऊ देत असे; परंतु आपला बाळ सुखाने वाढत असेल अशी त्याला स्वप्नांतही कल्पना नव्हती; परंतु आपला बाळ आपल्याला भेटेल अशी त्याला खात्री वाटत असे. तो सर्वत्र हिंडताना आपल्या बाळाच्या खुणा न्याहाळीत असे.

परंतु दयासिंगने हा कला-विलास एक उत्कृष्ट चित्रकार बनविला. त्याने त्याला लिहायला शिकविले. तो त्याला रानावनात नेऊन अनेक निसर्गरम्य स्थळे दाखवी. कला–विलास हा वाद्यांचे वादन अत्यंत सुंदर रितीने करी. तो वाद्य–वादन करताना करुणामाता अतिशय दंग होई. तिला भानही रहात नसे. तिला सारखा तो सूर ऐकावासा वाटे. अशा आनंदी वातावरणात विलासचा विकास होऊन तो आनंदाने वाढू लागला. त्या गावात त्याची सर्वत्र कीर्ती पसरली. त्याला गावोगावी वाद्य-गायनासाठी आमंत्रणे येऊ लागली.

बाळ ज्या दिवशी जन्माला तो दिवस म्हणजे वट-सावित्रीच्या पौर्णिमेचा. त्याच दिवशी सावित्रीने आपला जो पती वारला त्याचे प्राण परत आणले; परंतु विला-सच्या घरी नेमके उलटे झाले होते. त्याची आईच वारली होती परंतु त्याचे वडील तिचे प्राण परतवू शकले नाहीत. अशा ह्या त्याच्या वाढदिवसादिवशी त्याच्या जन्मगावी त्याचे वाद्यगायन ठेवले होते. त्यासाठी विलासचे वडील जे मधुकर त्याने फार मोठी वर्गणी दिली होती. त्याला वाद्यगायनाचा अत्यंत नाद होता. त्या दिवशी कला–विलासची कीर्ती ऐकून अफाट गर्दी झाली. सर्व लोकांचे डोळे व कान कला–विलासची मूर्ति कशी असेल याची चिकित्सा करू लागले. कला–विला-सच्या सुंदर मूर्तीने स्टेजवर प्रवेश करताच सर्व लोकांनी आनंदित होऊन टाळ्या वाजविल्या. मधुकर हा गायन ऐकण्यासाठी अगदी पुढेच बसला होता. कला–विलासची ती उत्कृष्ट कला पाहून सर्व लोक आनंदित झाले; पण प्रत्येकाच्या हृदयात कोठे तरी खोल करुणेची लकेर उठत होती. कारण असा एक उत्कृष्ट कलाकार मुका असावा हे लोकांना बोचत होते. रूपाने अत्यंत सुंदर, कलेत इतका निपुण परंतु मुका बनविणाऱ्या ईश्वराचा खरोखरच सर्वांना राग आला. त्याच्या वाद्य–गायनाने सर्व लोकांना स्वर्गीय आनंद उपभोगीत असल्याचा भास झाला. त्या कला–विलासाने अनेक गाणी वाद्यावर म्हटली. शेवटी कार्यक्रम संपला. तो मुका मुलगा अत्यंत उत्कृष्ट गायलेला पाहून त्याला खूप आनंद झाला व त्या मुक्या परंतु उत्कृष्ट गायनकाराला भेटण्याच्या इच्छेने मधुकर त्या ठिकाणी गेला. त्या मूक गायनकाराला पाहताच त्याला आपल्या मुलाच्या अंगावर असणाऱ्या खुणा दिसल्या. त्या खुणा पाहून तो आपलाच पुत्र असावा की काय असा संभ्रम मधुकरच्या मनात निर्माण झाला व तो त्या मुलाची चौकशी करण्यास सुरवात करणार तेवढ्यातच घाई असल्याने तो गायनकार निघूनही गेला. ते पाहून मधुकर दुःखी झाला व दुःखी अंतःकरणाने घरी परतला.

पुढे असेच कांही दिवस गेल्यावर त्या गावी चित्र-कलेचे एक मोठे प्रदर्शन भरणार होते. दयासिंगने एकदा कला-विलासला तो त्याला कसा प्राप्त झाला हे सविस्तर सांगितले. त्यावरून चित्रकलेच्या स्पर्धेसाठी त्याने आपले लहानपणीचे चित्र रेखाटण्याचे ठरविले व निसर्गरम्य अशा दाट हिरवळींवर रानात एका प्राजक्ताच्या झाडा-खाली पहाटेच्या सुंदर वातावरणात एक तान्हे मूल आपल्याशीच खेळत असल्याचे दाखविले. व त्या निसर्गरम्य स्थळी एका भव्य पाषाणावर हे चित्र रेखा-टण्याकरिता त्या बालकावर आपली प्रेमळ दृष्टि रोखून बसलेल्या एका चित्रकाराचे चित्र काढले व त्याच वेळी त्या बालकाच्या अंगावरील खुणाही दाखविण्यास तो

विसरला नाही व त्या चित्राखाली त्याने "पोरके बालक" असे नाव घालून ते चित्र त्याने स्पर्धेत पाठविले. स्पर्धेच्या दिवशी दयासिंग, करुणामाता व कला-विलास त्या ठिकाणी आले दयासिंगने कला-विलासचे नाव सार्थ ठेवले होते. "कलेत विलास करणारा तो कलाविलास." चित्राचे प्रदर्शन पहाण्यासाठी अनेक लोक जमले. विलासी मधुकरही त्या ठिकाणी आला. अनेक सुंदर चित्रे पाहून त्याने शेवटी "पोरके-बालक" या शिर्षकाचे चित्र पहाण्यास सुरुवात केली, त्या वेळी इंद्रधनुष्याचे रंग जसजसे बदलत जातात तसतसे मधुकरच्या चेहऱ्यावरचे भावही ते चित्र पहाताना परिवर्तीत होऊं लागले. त्याचे मुखकमल आनंदाने उजळून निघाले. तो त्या चित्राकडे बराच वेळ पहात राहिला. तो खूप पैसे देतो. पण ते चित्र मला विकत द्या असा आग्रह करू लागला. तेथील लोकांनी चित्राच्या मालकाकडे जाण्यास व त्याला विचारण्यास सांगितले. त्याला तो कला–विलास पाहून आपोआपच एक प्रकारची आंतरिक ओढ लागली व तो त्याचा चेहरा न्याहाळू लागला. कला–विलासच्या अंगावरील खुणा पाहून त्याने त्याला घट्ट मिठी मारली व "वासंती आपला बाळ देवाने परत दिला." अशी आर्त किंकाळी फोडली. दयासिंग व करुणामाता यांना मधुकरने सर्व हकीकत विचारून हा आपला बाळ असल्याची खात्री पटवून घेतली व दयासिंग आणि करुणामाता यांना पितृहृदयाची जाणीव असल्याने पितापुत्रांची ही ताटातूट पाहून अत्यंत दुःख झाले व त्यांनी त्यांचा लाडका कलाविलास त्याच्या वडिलांच्या हवाली केला.

कला–विलासचा त्या स्पर्धेत पहिला नंबर आला हे ऐकून तर मधुकरचे हृदय आनंदाने भरून आले, परंतु त्याच क्षणी त्याच्या मनांत खोल कोठे तरी वासंतीच्या उणीवेची स्मृति उसळली. त्या ठिकाणी त्याच्या सांभाळलेल्या दयासिंग व करुणामाता या मातापित्यांचाही आदरसत्कार करण्यात आला व त्याच वेळी मधुकराचा व कला–विलासबरोबर आदरसत्कार करून फोटो काढण्यात आला. त्याच वेळी कला–विलासला आपल्या खऱ्या आईच्या उणीवेची जाणीव झाली व तो दुःखी झाला. दयासिंग व करुणामाता यांनी एका हरवलेल्या पुत्राला त्याच्या पित्याच्या स्वाधीन केले व ते दुःखी व जड अंतःकरणाने परतले. अशा रीतीने एक वेडापिसा झालेला पिता एका सुंदर कलाकाराचा पिता झाला.

▣ ▣ ▣

भरघोंस पिकांसाठीं ... ... ...

RALLIS TREE BRAND FERTILISERS

टाटा फायझन पेस्टीसाईडस् व रॅलीची

"झाड छाप" मिश्रखतें

वापरा.

❀ रॅलीच्या मिश्रखतांनी जमिनीचा कस टिकविला जातो.
❀ कमी खर्चांमध्यें भरपूर पीक निघते. ❀ माफक किंमती.

द्राक्ष, ऊंस, कापूस, धान्य, फळें, भाजीपाला वगैरे पिकांसाठीं खास मिश्रखतें व कीटक-नाशक औषधें मिळण्याचें ठिकाण.

एजंट :-

फोन नं. ८१

मे. छगनलाल निहालचंद मुथा

सर्व प्रकारचें बी, बियाणे, किराणा मालाचे व्यापारी,
( डालडा व लोटस होलसेलर ), बारामती. जि. पुणें.



# " कसंतरी "

किरण मेहता,
प्री प्रोफेशनल

मी फार दिवसापासून 'कसं तरी' करून एखादा लेख लिहावा व मॅगझीनमध्ये 'कसा तरी' छापून आणावा या विवंचनेत होतो. तुम्ही तो 'कसं तरी' करून वाचून काढाच, नाही तर मला 'कसं तरी' वाटेल. पहा बरे!

'कसं तरी' हा शब्द किती ठिकाणी, कशा तऱ्हेने व अर्थाने वापरला जाईल याचा तुम्ही 'कसा तरी' विचार करून पाहिला आहे काय? नसल्यास पाहू नकाच. कारण तुम्हाला 'कसं तरी' वाटल्या वाचून राहणार नाही.

आपणास ऐखाद्या मित्राबरोबर जायचे नसेल तर आपण हेच पाहिले अस्त्र सोडतो, "मला 'कसंतरी' वाटतय रे" हे लागू पडलेच पाहिजे. आपण जर आजारी पडलो तर डॉक्टरांना हेच सांगतो, अहो डॉक्टर, मला 'कसंतरी' वाटू लागलय हो' ह्याच वेळेस डॉक्टराची खरी पारख करता येते. कोणाकडे पार्टीस जायचे झाले, किंवा बाहेर जेवण घ्यावयाचे झाले तरी आपण आईस किंवा बायकोस (असल्यास) सांगतो, " आज मला 'कसं तरी' होतय ग. मी आज जेवणार नाही बरं का!"

तसेच आपणास एखादे काम करायचे नसेल तर, किंवा सिनेमास जायचे असेल तर, आपण ते काम 'कसं तरी' करून मोकळे होतों. एखाद्या ऑफीसरला घरी जायचे असेल किंवा प्राध्यापकास तास घ्यायचा नसल्यास तो 'कसं तरी' चाच उपयोग करतो किंवा म्हणतो 'कसं तरी' जाऊन ते काम 'कसं तरी' संपवतो. एखाद्यांस विनंती करावयाची असेल तरी म्हणतो, "तू 'कसं तरी' करून येच" कॉलेजमध्ये किंवा शाळेत जायचे नसल्यास 'कसं तरी' च्या मागेच लपतो. व गृहपाठ किंवा Tutorial 'कसं तरी' संपवून टाकण्याच्या मागे असतो.

सहसा कोणताही मुलगा किंवा मुलगी (कोणतीही) कॉलेजमध्ये जाऊ लागली म्हणजे पहिल्या महिन्या-दोन महिन्यात 'कसंतरी' हा रोग लागला म्हणून समजावे. एकमेकांचा चेहरा बघायला मिळाला नाही तर 'कसंतरी' वाटू लागतेच व मग संबंध दिवसभर कॉलेजवर लक्ष लागतच नाही. व मग ती मैत्रणीस म्हणते, "आज मला 'कसंतरी होऊ लागलय ग! मी घरी जाते" (किंवा तो मित्रास म्हणतो) तिच्या हृदयात 'कसं तरी होऊ लागते, म्हणजे हृदयात ज्योत पेट घेणे म्हणजे कसंतरी वाटणे हे समीकरण होऊन जाते. तो जवळ किंवा फार लांब असला तरी 'कसेतरी' होतेच. मग दुसऱ्या टर्ममध्यें आपण त्याच्याशी उगीचच भांडण केले किंवा तिने चार चौघात टाकून बोलल्या बद्दल एकमेकास राहून राहून 'कसंतरी' वाटत असते.

म्हणजे काय 'कसंतरी' ह्या शब्दावर विचार करू लागलोतर आपणासच कसंतरी वाटू लागते. आता माझेच पहाना 'कसंतरी' वर कसरत करून मलाच 'कसंतरी' वाटू लागले आहे. तुम्ही 'कसंतरी' वाटून घेण्याचे काही कारण नाही. कसेही 'कसंतरी' करून मला तुम्ही या 'कसंतरी' मधून वाचवाच.

▣ ▣ ▣

# व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण

**श्रीकृष्ण बडवे,**
द्वितीय वर्ष साहित्य

व्यापारी बँकेच्या कार्याचे साधारणपणे दोन भाग पडतात. ठेवी स्वीकारणे आणि त्यांच्या आधारे कर्जाचा पुरवठा करणे. रोजगारावर काम करणाऱ्या कामगारापासून तो अगदी मोठ्या पगाराच्या माणसापर्यंत सर्व जणांची खाती व्यापारी बँकात असतात. ह्या ठेवीदारांना त्यांच्या ठेवीवर व्यापारी बँका व्याज देतात; आणि बचतीच्या साहाय्याने जमा होणारा पैसा थोड्या जास्त व्याजाने कर्ज म्हणून पुरवितात. ह्या कर्जातून निर्माण होणाऱ्या भांडव-लाच्या आधारे उद्योगधंद्याचा आणि इतर उत्पादनाचा विकास करण्यात येतो. अशाप्रकारे व्यापारी बँका ह्या राष्ट्राच्या आर्थिक विकासात सहभागी होतात.

व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करावे असे म्हणणाऱ्यांचे मुद्दे आणि त्याला राष्ट्रीयीकरण करावे याला विरोध करणाऱ्यांची उत्तरे.

(१) व्यापारी बँकांना अफाट फायदा मिळतो, आणि हा फायदा त्यांच्या भागधारककारकांना वाटण्यात येतो. राष्ट्रीयीकरण झाल्यास हा सर्व पैसा सरकारला भांडवल म्हणून वापरता येऊन त्याच्या साहाय्याने राष्ट्राचा आर्थिक विकास साधण्यास मोठा हातभार लागेल.

व्यापारी बँकाच्या ह्या भागधारकांना अफाट फायदा मिळतो हे म्हणणे चूक आहे. ह्यासाठी १९६०-६१ ची आकडेवारी पाहिल्यास आपल्या लक्षात येईल की ह्या वर्षात भागधारकांना ९ कोटी रुपये फायदा वाटण्यात आला. आणि ह्या उलट सरकारला २९ कोटी रुपये मिळाले. कॉर्पोरेशन टॅक्स आणि सुपर प्रॉफिट टॅक्स ह्यांच्या साहाय्याने सरकारला ५०% टक्के रक्कम मिळाली.

(२) सरकारच्या सुवर्ण नियंत्रण धोरणाने अनेक प्रकारच्या करामुळे आणि मध्ये अमलात आणलेल्या सक्तीच्या बचत योजनेमुळे राष्ट्राचा आर्थिक विकास मंदावला आहे. आणि त्याच्यात बँकांचे राष्ट्रीयीकरणाने तर सरकार त्या विकासात आणखी अडथळे निर्माण करील. १९५६ मध्ये सरकारने विमा कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण केले. आता बँकांचे राष्ट्रीयीकरण अशी जर राष्ट्रीयीकरणाची मोहीमच चालू केली तर परदेशातून होणाऱ्या भांडवल गुंतवणूकी-वर त्याचा परिणाम होईल. कारण भारतात राष्ट्रीयीकरणा-वर भर देण्यात येतो. ते भांडवल गुंतवणारे असा विचार करतील की आपण भांडवल गुंतविले आणि आपले उद्योग धंदे चालू केले व जर येथील सरकारच्या मनात आले की उद्योगधंद्यांचेही राष्ट्रीयीकरण करावे तर त्यामुळे आपल्यास जास्त नुकसान सोसावे लागेल.

(३) स्टेट बँक आणि व्यापारी बँक यांची तुलना करणे चुकीचे आहे. स्टेट बँकेत सरकारचे सर्वात मोठे खाते आहे. ह्या सरकारच्या ठेवीला कोणत्याही प्रकारचे व्याज नसते. त्याचप्रमाणे अमेरिकन सरकारच्या पब्लिक लॉ. ४८० याच्या अन्वये भारताला जी मदत मिळते त्याच्यापासून मिळणारी रक्कम ही स्टेट बँकेत बिनव्याजी पडलेली असते. उदा. ह्या कायद्याचे अन्वये भारताला होणाऱ्या गव्हाच्या पुरवठ्यापासून जे उत्पन्न मिळते ते स्टेट बँकेत जमा करण्यात येते. ह्याच्या उलट व्यापारी बँकात कोणत्याही ठेवीवर मग ती लहान असो किंवा मोठी असो तिला व्याज हे द्यावेच लागते. स्टेट बँकेच्या बऱ्याच शाखा झाल्या आहेत. ह्याचा अर्थ असा नाही. की बँकेच्या शाखा वाढल्या म्हणजे राष्ट्राचा किंवा बँकेचा विकास झाला.

(४) बँका ह्या खाजगी असल्याने जास्त फायदा मिळवितात ह्याचा उपयोग सरकारी कामासाठी करावा बँका नफा मिळवितात हे मान्य आहे. स्टेट बँकसुद्धा नफा मिळवितेच की. मनुष्य कोणताही उद्योग किंवा धंदा करतो, हा फायदा मिळावा म्हणूनच ना? मग व्यापारी बँकांनी फायदा किंवा नफा मिळविला तर त्यात काय गैर आहे? व्यापारी बँका फायदा मिळवितात त्याचबरोबर ह्या बँका सरकारला भांडवलाचा पुरवठाही करतात. बँकांनी नियोजनासाठी सरकारला ७०० कोटी रुपये दिले.

(५) व्यापारी बँकात स्पर्धा असतात. ह्या स्पर्धा म्हणजे जास्ती बचती मिळविणे. ह्या बचतीचा उपयोग कर्जे देण्यासाठी करणे आणि जास्तीत जास्त फायदा मिळविणे. ह्याच्या मुळे ठेवीदाराला देण्यात येणाऱ्या व्याजाच्या दरात स्पर्धा चालते. ह्याचा परिणाम असा होतो की जास्त व्याजाचा दर असल्याने लोकांची बचत करण्याकडे जास्त प्रवृत्ती निर्माण होते. म्हणजेच जो जो बचत जास्त तो तो भांडवल गुंतवणूकही जास्त असते.

जर राष्ट्रीयीकरण केले तर ही स्पर्धा नष्ट होऊन बचत मंदावेल ह्याचाच अर्थ भांडवल गुंतवणूक कमी म्हणजे राष्ट्राचा आर्थिक विकास कमी.

(६) राष्ट्रीयीकरण झाले तर सरकार ह्या पैशाचा उपयोग इतर धंद्यांना आणि विकास योजनासाठी करील. त्यामुळे ठेवीदार निराश होतील. ठेवीदारांचे हितसंबंध बिघडतील. ठेवीदार बँकात ठेवी ठेवणार नाहीत. बचत न झाल्याने सरकारला अफार नुकसान सोसावे लागेल.

(७) व्यापारी बँका ह्या ठराविक किंवा विशिष्ट व्यक्तींना कर्जे देतात. त्या लहान उद्योगधंद्यांना आणि शेतकऱ्यांना कर्जे देत नाहीत. त्यामुळे राष्ट्राचा विकास होत नाही. परंतु सत्य पाहिले असता लहान उद्योग-धंद्यांना व शेतकऱ्यांना कर्जे देण्याचे काम आणि जबाब-दारी स्टेट बँकांवर असते. ह्या कार्यात स्टेट बँकांना अपयश आले ह्या अपयशाचे खापर व्यापारी बँकांवर का फोडता?

(८) रेग्यूलेशन ॲक्ट आणि बँकिंग कंपनी ॲक्ट ह्यांच्या साहाय्याने भारताच्या रिझर्व बँकेला व्यापारी बँकांचे सहज नियंत्रण करता येते.

(९) व्यापारी बँका ह्या व्यापाऱ्यांना कर्जे देतात. आणि कर्जांच्या साहाय्याने व्यापारी साठेबाजी करतात आणि कृत्रिम धान्य टंचाई निर्माण करतात. हे ही म्हणणे चूक आहे. कारण मुळातच जर उत्पादन अपुरे आहे तर ह्याचा काहीही परिणाम होणार नाही. या अन्न धान्य टंचाईवर राष्ट्रीयीकरण हा उपाय नसून उत्पादन वाढविणे हा उपाय आहे.

(१०) राष्ट्रीयीकरण केल्याने मालक आणि नोकर यांच्यातील संबंध सुधारतील असे म्हणणे चूक आहे. उदा.- भोपाळ येथील सरकारी मालकीच्या अवजड यंत्र-सामग्रीच्या कारखान्यात देखील संप करण्यात आला होता. त्याचप्रमाणे अशा सरकारी मालकीच्या उद्योगधंद्यात किंवा उत्पादन संस्थात अंदाधुंदी आणि दप्तर दिरंगाई वाढेल.

(११) नोकरशाहीचा बरचष्मा वाढेल आणि ह्याचा परिणाम म्हणजे किरकोळ कामासाठी अनावश्यक वेळ खर्च केला जाईल. वेळ गेल्यावर ह्या कर्जाचा काही उप-योगच होणार नाही.

(१२) राष्ट्रीयीकरणामुळे केंद्रीयीकरण करण्यास वाव मिळतो. ५०,००,०० कामगार आणि ५०० मॅनेजर्स यांचे काम सुकर होण्यासाठी राष्ट्रीयीकरण करणे चूक आहे. राष्ट्रीयीकरण केल्यास व्यापारी बँकांना व त्यांच्या भाग-धारकांना नुकसान भरपाई द्यावी लागेल. त्यासाठी अफाट पैसा लागेल व सध्याच्या आणीबाणीच्या काळात आणि विकास योजनांच्या काळात असा पैसा देणे धोक्याचे आहे. त्यासाठी राष्ट्रीयीकरण करू नये.

आर्थिकदृष्ट्या संपन्न असे एकच खाते रहाते आणि ते म्हणजे बँकांचे आणि सरकारच्या या धोरणामुळे असे स्पष्ट दिसते की सरकारचे विमा कंपन्यावरून पैशासाठी व्यापारी बँकावर लक्ष लागले आहे, म्हणून व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण हे अयोग्य आणि आर्थिक विका-साच्या दृष्टीने हानीकारक आहे.

# मंगळा गौर


र. गो. निबंधे,
प्रथम वर्ष शास्त्र


*" थोड्याच वेळात गाडी येत आहे, तयार रहा "*
*ते शब्द सुलूच्या हृदयातून आरपार गेले.*
*ती गाडीकडे धडधडत्या छातीने पहात होती.*

सतीशला येऊन आता दहा दिवस होऊन गेले होते. अजून रजेचे तब्बल तीन आठवडे होते. सतीशच्या सहवासात घालविलेले ते दहा दिवस सुलूला काही क्षणाप्रमाणे वाटत होते. तिला सतीश जवळ हवा होता. सतीश लष्करात कॅप्टनच्या हुद्यावर होता. त्याचे वय अवघे २६ वर्षांचे होते. गेल्याच वर्षी त्याला बढती मिळाली होती. नेफा आघाडीवरील पराक्रमाबद्दल त्याला वीरचक्र देऊन त्याचा गौरवही करण्यात आला होता. सुलूच्या खास पत्रावरून तो तिच्या मंगळा गौरीच्या दुसऱ्या वर्षालाही हजर राहणार होता सुलूच्या आणि त्याच्या लग्नाला नुकतीच दोन वर्षे पूर्ण झाली होती. लग्नाच्या वाढदिवशी रजा न मिळाल्याने त्याना तो विचार सोडून द्यावा लागला होता. म्हणून मुद्दामच मंगळागौरीचे दुसरे वर्षही मोठ्या प्रमाणावर करण्याचे त्या दोघांनी ठरविले होते. शिवाय सुलूच्या धाकट्या बहिणीचे, सुधाचेही यंदाच लग्न झाले असल्याने तिची पहिली मंगळागौर सुलूकडेच व्हावयाची होती.

आज रविवार होता. सुलू घरातील पसारा आवरत होती. पाहुणे येणार म्हणून घरात स्वच्छता आणि टापटीप करण्यात सुलू गुंग होती. छोटा अनिल अजून पाळण्यातच होता. सतीश " रविवार सकाळ " वाचत आरामखुर्चीत पडला होता.

एवढ्यात पोस्टमन सतीश आपटे कोठे राहतात म्हणून चौकशी करीत आला. शेजारच्या दिलीपने घर दाखविले. पोस्टमन दारात उभा राहून सतीशला म्हणाला, " तार आली आहे. " सतीशने वर्तमानपत्र बाजूला ठेवून सही करून तार घेतली. सुलूही धावतच बाहेर आली. तिच्या मनात नाना शंकाकुशंका येऊ लागल्या. सतीशने अधीरतेने तार वाचली. " स्टार्ट इमिजीएटली " मेजर गुरुबक्षसिंग सतीशची घोर निराशा झाली. सुलूचीही स्थिती केविलवाणी झाली. सतीशला जाणे भागच होते. त्याला दुपारी बाराला मेल होती. आणि संध्याकाळच्या गाडीने सर्वजण येणार होते सतीशला त्याच्या मुक्कामी पोहोचण्यास चार दिवस लागणार होते. अजून गाडीला चार तास अवकाश होता.

सतीशने " सकाळ "ची घडी घालून टेबलावर ठेवली आणि सुलूला पसारा आवरण्यास तो मदत करू लागला. एवढ्यात पाळणा हलू लागला. सतीशने सुलूला खूण केली. सुलूने सावकाश डबा फळीवर ठेवला आणि ती पाळण्याकडे आली. तोपर्यंत अनिलने दुपटे भिजविले होतेच. सुलूने पट्दिशी त्याला उचलून पदराखाली घेतले तिच्या डोळ्यात पाणी आले, सतीशने ते पाहिले. पण त्याकडे दुर्लक्ष करून स्वतःचे मन ताब्यात ठेवून पसारा आवरणे चालूच ठेवले. सुलूच्या लक्षात ही गोष्ट आली नाही. सतीशला आपले अश्रू दिसू नयेत म्हणून तिने चट्कन पदराने डोळे पुसले आणि अनिलेला सतीशकडे देत ती हसत म्हणाली, " अहो ऐकलत कां! हा गुलाम काय म्हणतोय ? त्याला म्हणे भुर जायचय. आणि बरं का ही आरशाच्या कपाटाची किल्ली घ्या आणि त्यातील तुमचे कपडे बाहेर काढून ठेवा. मी स्वयंपाक करून सुटकेस भरेन " अनिल टाऽटा !"

अनिलला घेऊन सतीश गॅलरीत आला. तोच शेजारची छोटी नीलिमा अनिल अनिल करीत त्याला घेऊन गेली. सतीशने घरात येऊन पलंगाखालील सुटकेस काढली आणि टेबलाच्या खणातील आरशाच्या कपाटाच्या किल्ल्या घेऊन त्याने सर्व कपडे पलंगावर काढून ठेवले. आंघोळीचे कपडे घेऊन तो बाथरुमकडे वळला. सुलूने जेवावयास पाने मांडली. आणि सतीशची आंघोळ होईपर्यंत त्याचे सारे सामान भरून ठेवले. सतीशची आंघोळ झाल्यावर ती जेवावयास बसली. जेवताना सतीशने मंगळागौरीविषयी साऱ्या सूचना दिल्या. जेवण करून सतीशने सामानाची बांधाबांध करावयास सुरुवात केली. सुलभेने स्वयंपाकगृहातील आवराआवर करून ती सतीशपाशी येऊन उभी राहिली. सुलूला एक हुंदका आला. सतीशने तिची समजूत घातली. एवढ्या वेळात दारात रिक्शावाला आला होता. सुलूने देवाला नमस्कार केला आणि सतीशला करावयास लावला. एवढ्यात एक छोटे पालीचे पिल्लू सतीशच्या पायापाशी पडले. सुलूच्या काळजात चर्र झाले. तिने देवाला पुन्हा एकदा नमस्कार केला आणि सतीशचा प्रवास सुखरूप होण्यासाठी देवाला विनवणी केली.

" बाई चला लवकर " या रिक्शावाल्याच्या हाकेने ती भानावर आली. तिने स्वयंपाक गृहाचे दार लोटले आणि बाहेरचे दार लावून ती गॅलरीत आली. सतीशने नीलिमाला खाऊसाठी पैसे दिले. सतीश आणि सुलभा रिक्शात बसले. सतीशने अनिलला मांडीवर घेतले होते. रिक्शा जोरानें चालली होती. सुलूच्या मनात मघाच्या प्रसंगाने काहूर माजले होते. काही वेळातच ते स्टेशनात आले. रिक्शावाल्याला पैसे देऊन सतीश सुलूसह प्लॅटफॉर्मवर आला. गाडीला अजून दहा मिनिटे होती. सतीश एका जुन्या मित्राबरोबर गप्पा मारीत उभा होता. एवढ्यात स्टेशन वरील लाउड स्पीकरने सूचना दिली. " थोड्याच वेळात गाडी येत आहे. तयार राहा. "

ते शब्द सुलूच्या हृदयातून आरपार गेले. सतीशने सुलूला गाडी येत असल्याची खूण केली. सुलू बाकावरून उठून उभी राहिली. ती गाडीकडे धडधडत्या छातीने पहात होती. गाडीने स्टेशनात प्रवेश केला. स्टेशन माणसांनी गजबजून गेले. सतीशचे सामान एका हमालाने घेतले व ते एका प्रथम वर्गाच्या डब्यात बसले. गाडीने शिटी दिली. सुलूच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. अनिलला घेऊन ती उतरली. हिरवे निशाण हालू लागले आणि गाडी स्टेशनाबाहेर गेली. सुलू स्तब्धपणे उभी होती. एका भिकारणीच्या आवाजाने ती भानावर आली. सुलूने एक रिक्शा ठरविली व ती घरी आली. तिचे मन कशातच लागत नव्हते. शेजारच्या यमुताईच्या सांगण्यावरून तिने मारुतीला फुलवात घातली आणि ती वेणी घालीत, येणाऱ्या पाहुण्यांची वाट पहात बसली. इतक्यात दारावर थाप पडली. सुलूने दार उघडले. वसंतराव आणि सुधा दोघेही आले होते. सुलूने सुहास्य मुद्रेने दोघांचे स्वागत केले पण त्यात कृत्रिमता होती. सुधाला ते जाणवले. ती त्याबद्दल बोलणार एवढ्यात वसंतरावांनी विचारले. " सुलभा ताई, आम्ही आलो आणि सतीश कोठे बाहेर गेले ? "

सुलूने त्यांना सर्व हकीकत सांगितली. सुधाच्या प्रश्नाचा आपोआपच खुलासा झाला. संध्याकाळपर्यंत सर्व पाहुणे आले. सुलूने सर्वांचे स्वागत केले; पण सतीशच्या अनुपस्थितीने सारेच निराश झाले. सोमवारचा दिवस, उद्याच्या मंगळागौरीची तयारी करण्यात गेला.

मंगळवारी तर साऱ्यांचीच धांदल उडाली. सकाळपासून सर्वत्र एकच गडबड. नेहमी उशीरा येणारे आपटे गुरुजी आज लवकरच आले. मुलीहि येऊ लागल्या. बारा वाजण्याच्या आतच पूजा संपली. जेवावयास पाने मांडण्यात आली. जेवणापूर्वी मंगळागौरीची आरती झाली. सुलूच्या मनात पुन्हा एकदा तो प्रसंग उभा राहिला. परंतु आरतीचे निरांजन मात्र जास्तच प्रकाशत होते. त्याचे तेज पाहून तिचे समाधान झाले. दुपारी दोन वाजेपर्यंत साऱ्यांची जेवणे झाली. नंतर सर्वजण

पहुडले. दोन दिवसाच्या कष्टांनी सुलूला लागलीच डुलकी लागली. तिला स्वप्न पडले. त्यात सतीशवर एक मोठा नाग चालून आल्याचे तिने पाहिले. ती एकदम किंचाळली. सारेच जण घाबरले. त्यानी सुलूला सावध केले. आईने खुलासा केला. स्वप्नांत नाग आल्यास संपत्ति मिळते. सारे जण पुन्हा खूष झाले. संध्याकाळपर्यंत सर्वजण गप्पा गाणी यात रंगून गेले होते. संध्याकाळी पुरुष मंडळी बाहेर गेली. स्त्रिया रात्रीची तयारी करण्यात दंग झाल्या. रात्री मंगळागौरीची आरती होऊन सर्व मुली जागरणा-साठी थांबल्या. पलीकडे एका सतरंजीवर सर्वांनी आपली छकुडी झोपविली होती. दोनचार मुलींनी गाणी म्हटली नसतील तोच दारावर थाप पडली. दार उघडले गेले. पोस्टमन तार घेऊन आला होता. वसंतरावांनी इंग्रजीतच तार वाचली. " Mr. Satish Apte had passed away near Patna in railway accident."

सर्वत्र एकच आरडाओरड झाली. सुलू बेशुद्ध पडली. सुधा धावतच बाहेर आली. तिने तिला पलंगाकडे नेले. मुली आपल्या छकुल्यासह बाहेर पडूं लागल्या. घरात आनंदाच्या सूर्याला ग्रहण लागले. रात्रभर पुरुष मंडळी सुलूच्या उशाशी बसून होती. डॉक्टरांनी तपासणी केली. घाबरण्याचे कारण नाही असे सांगितले. परंतु सकाळी सुलूला काय सांगावयाचे याचाच सारे विचार करीत होते.

रात्रभराच्या जागरणाने सारेजण थकून गेले होते. पाच वाजले. रस्त्यावर रहदारी सुरू झाली. वसंतराव रस्त्याकडे भकासपणे पहात होते. सुलू आता लवकरच शुद्धीवर येणार होती. वसंतरावांचे मन एका पोस्टमनने आकर्षून घेतले. रात्रीचाच होता तो. वसंतराव त्याच्याकडे रागाने पहात होते, तोच तो जिना चढून वसंतरावासमोर येऊन उभा राहिला तार आली आहे. वसंतरावांना त्यांचा अधिकच राग आला. परंतु त्यानी सही करून तार घेतली तार सतीशचीच होतो. 'काल सायंकाळी रेल्वे अपघातात मी निधन पावल्याची बातमी मला समजली आणि मला आश्चर्याचा धक्का बसला. मी माझ्या खिशात हात घातला. माझा खिसा कापला गेला होता. माझे ओळखपत्रहि खिसे-कापूने लांबविले होते. पाकिटातच तिकीट होते. टी. सी. ने तिकीट विचारताच खिसा कापल्याची जाणीव झाली. मी त्याला सारी घडलेली हकीगत सांगितली, त्याने मला घरी तार करण्यासाठी पंचवीस रुपये दिले. सायंकाळीच मला स्टेशनवर गुरुबक्षसिंग भेटले. त्यानी माझी रजा वाढविल्याचे सांगितले. अपघातात मी मृत्यू पावलो नसून माझा खिसेकापू मरण पावला आहे. ओळख पत्राने सर्व घोटाळा झाला. मे. गुरुबक्षसिंगानी मला पगारवाढ झाल्याची बातमीहि सांगितली. मी थोड्याच वेळात येथून निघत आहे " —सतीश.

किराणा भुसार व्यापारी व कमिशन एजंट
दोशी नथुराम मोतीचंद
बारामती, पुणें.
कानन देवन व ब्रुडीज्
मेन डीलर्स : स्वस्तिक ऑईल मिल्स.
चहाचे मेन डीलर



## अभिनंदन
## प्रा. डॉ. रा. ति. अक्कोळे



'प्राचीन मराठीतील जैन साहित्य' या प्रबंधास पुणे विद्यापीठाकडून पीएच्. डी. ची. पदवी मिळाली.

माननीय प्राचार्यासमवेत एन्. सी. सी. (१९६४–६५ )



## वाढणाऱ्या लोकसंख्येला कसे तोंड देणार ?

# शेवाळ्यातून अन्न समस्या सुटणार !

पी. एन्. बालगुडे,
प्रथम वर्ष विज्ञान

आजकाल भारतातील अफाट लोकसंख्येच्या वाढीबद्दल सर्वत्र चर्चा होत आहे, आणि त्यातूनच कुटुंबनियोजनाची कल्पना जोरात मूळ धरीत आहे. परंतु तसे पाहिले तर लोकसंख्येची भरमसाट वाढ हा केवळ भारतापुरता प्रश्न नसून तो एक जागतिक प्रश्न आहे. कारण, खुद्द साऱ्या जगाचीच लोकसंख्या इतकी बेसुमार वाढली आहे की, इतक्या तोंडांना खावयास अन्न कसे पुरवावे, ही एक मोठी समस्या निर्माण झालेली आहे. अगदी आकडे शास्त्रज्ञांच्या भाषेत बोलायचे तर गेल्या ३०० वर्षांत जगाची लोकसंख्या चौपट झाली असून, आज मितीला ती अडीच अब्ज आहे. हल्लीची तिची वाढ वर्षाला दोन कोटी आहे; आणि ही जर तशीच चालू राहिली तर आणखी सव्वाशे वर्षांनी जगाची लोकसंख्या पाच अब्ज होईल. तेव्हा काही तज्ज्ञांचे तर असे मत आहे की, ह्या वाढणाऱ्या लोकसंख्येला पुरेल इतके अन्नोत्पादन केले नाही तर त्यातून अशा काही बिकट समस्या निर्माण होतील की त्यापुढे हायड्रोजन बॉंबचे भय काहीच नाही.

ह्या सर्व परिस्थितीमुळे वाढत्या लोकसंख्येला पुरेल असे अन्नोत्पादन कसे करावे हा प्रश्न आतापासूनच सोडविण्यास लागले पाहिजे. अर्थात हा प्रश्न सोडविण्यासाठी दोन मार्ग अवलंबिता येतात; एक म्हणजे, प्रजोत्पादनाची वाढ कमी करणे व दुसरा म्हणजे, शास्त्रज्ञांच्या मदतीने अन्नोत्पादन भरमसाट वाढविणे. त्यापैकी पहिला मार्ग कुटुंबनियोजनाच्या कल्पनेला जाऊन मिळतो; आणि पाश्चात्यांनी तो आधीच हाताळलेलाही आहे. त्यामुळे त्या राष्ट्रांची जननसंख्या खूपच आटोक्यात आलेली आहे. परंतु विज्ञानाच्या वाढीमुळे तेथील लोकांची आयुर्मर्यादाही बरीच वाढली असून मृत्युसंख्येतही घट झालेली आहे. त्यामुळे जनन जरी कमी झाले असले तरी एकंदर लोकसंख्या वाढतच आहे असे म्हणावे लागते. ह्याउलट पौर्वात्य देशात. विशेषतः आशिया खंडात, आणि त्यांतूनही भारतात आयुर्मर्यादा अगदीच कमी असून मृत्यूचे प्रमाणही फार आहे. परंतु जननसंख्याही बेसुमार असल्यामुळे तेथील लोकसंख्याही एकंदरीत वाढतच आहे. तेव्हा केवळ कुटुंबनियोजन करून हा प्रश्न सुटणार नाही. त्याकरिता अन्नोत्पादनाचा वेग भरपूर वाढविणे हा दुसरा मार्गही आता अंमलात आणला पाहिजे.

### सृष्टीत अन्नोत्पादन होते तरी कसे ?

हा मार्ग हाताळावयाचा असेल तर प्रथमतः सृष्टीत अन्नोत्पादन होते तरी कसे, हे पाहिले पाहिजे. झाडात जे अन्नाचे उत्पादन होते ते साखरेच्या ( कार्बो हायड्रेट्स ) स्वरूपात होत असते. आणि त्याकरिता झाडाच्या

मुळातून पाणी आणि झाडाभोवती हवा असणे जरूर असते. पाण्यातील हायड्रोजन आणि हवेतील कर्बद्वि-प्राणील ह्यांच्या एकमेकाशी संयोग झाला की, साखरेच्या स्वरूपात झाडात प्रथम अन्न निर्माण होते. परंतु झाडात होणारे हे हवेचे व पाण्याचे शुभमीलन जर सूर्यप्रकाश हजर नसेल तर मात्र होऊ शकत नाही. म्हणजे भरपूर सूर्यप्रकाशाच्या साक्षीनेच जर हे शुभ मंगल झाले, तरच त्यातून अन्नाच्या स्वरूपातले गोड अपत्य निर्माण होते; नाही तर नाही. म्हणूनच सूर्यप्रकाश हा अन्नोत्पादनाला आवश्यक आहे.

तेव्हा अन्नोत्पादन वाढविण्याकरिता प्रथम वनसृष्टीला मिळणारा सूर्य प्रकाशाचा साठा वाढविणे जरूर आहे. सूर्यप्रकाशातील साठ टक्के भाग तर मुळी वातावरणाने शोषून घेतला जातो. त्यामुळे तो जमिनीपर्यंत पोहोचतच नाही. शिल्लक राहिलेला चाळीस टक्के भाग सर्वच्या सर्व जरी जमिनीवरील वनस्पतीना मिळाला तरी तो इतका भरपूर आहे की, जगाची लोकसंख्या हल्लीच्या दोन लाखपट वाढली तरी तिला तो अन्नोत्पादन पुरवू शकेल. परंतु तेवढा तरी सूर्यप्रकाश वनस्पतींना मिळतो आहे कोठे ? कारण झाडांच्या चारी बाजूस इतकी रिकामी जमीन असते की, तेथे पडणारा सूर्यप्रकाश वायाच जातो. शिवाय पृथ्वीवरील तीन चतुर्थांश भाग पाणीच असल्यामुळे तेथील मोठा सूर्यप्रकाशाचा भागही फुकट जातो. बरे, झाडावर जो सूर्यप्रकाश पडतो तो तरी झाडांच्या वाट्याला सर्वस्वी कोठे येतो ? त्यातला काही पानावर परावर्तित होऊन पुनः बाहेर फेकला जातो, तर काही पानातून आरपार निघून नाहीसा होतो. म्हणजे सूर्यप्रकाश वाया जाण्याच्या ह्या सर्व वाटा लक्षात घेतल्या तर अन्नोत्पादनाला अवघा दोन टक्के सूर्य प्रकाश उपयोगी पडतो.

अन्नोत्पादनात वाढ करावयाची असेल तर ह्या उपयुक्त सूर्यप्रकाशात प्रथम वाढ केली पाहिजे. म्हणजे त्याकरिता झाडाच्या पानाचे क्षेत्रफळ कसे वाढविता येईल ते पाहिले पाहिजे. तसेच झाडाच्या बाजूना रिकामी जागाही फार ठेवणे इष्ट नाही हे उघड आहे. कारण तेथील सूर्यप्रकाश वाया जातो. परंतु त्याचबरोबर ही झाडे अगदी जवळ जवळ असूनही उपयोगी नाहीत. कारण झाडे फार जवळ जवळ लावल्यास त्यांची मुळे पाण्याकरिता एकमेकांशी स्पर्धा करू लागतात व वाळून जातात.

परंतु इतकेही करून अन्नोत्पादन पुरेशा प्रमाणात वाढेल की नाही ह्याची शंकाच आहे. त्यामुळे वैज्ञानिकानी प्रयोगशाळेतच अन्नोत्पादन करण्याच्या खटपटी चालू केल्या आहेत. पण ह्या प्रयोगात एक मोठी अडचण आहे. ती म्हणजे सूर्यप्रकाशामुळे हवा व पाणी ह्यांचे मीलन होऊन जरी अन्नोत्पादन होत असले तरी एखाद्या काचेच्या नळीत निव्वळ पाणी व हवा भरून ती नळी उन्हात धरली असता मात्र अन्नोत्पादन होऊ शकत नाही. याचे कारण हे की, झाडात क्लोरोफिल नावाचे जे द्रव्य असते ते सूर्यप्रकाशात, हवा व पाणी ह्यांचा संयोग घडवून, साखर स्वरूपात अन्न तयार करते; आणि ते प्रयोगशाळेच्या काचनलिकेत बिलकुल नसते. तेव्हा वनस्पतीतील ' क्लोरोफिल ' हे द्रव्य अन्नोत्पादना करिता अत्यंत आवश्यक आहे. विशेष म्हणजे ही क्लोरोफिलची क्रिया कशी घडून येते हे गूढ अद्याप शास्त्रज्ञांना उकललेले नाही. नाहीतर त्यांना क्लोरोफिलसारखा दुसरा पदार्थ तयार करून काचेच्या नळीत हवा व पाणी भरून ती सूर्यप्रकाशात ठेवून कृत्रिम अन्नोत्पादन करता आले असते.

सध्या जरी शेवाळ्यातून अन्नोत्पादन साधले नसले तरी प्रचंड प्रमाणात अन्नोत्पादन करण्याची जी दुसरी युक्ती त्यांना सापडली आहे, ती मात्र अमोल आहे. हौदामध्ये पाण्यावर जे शेवाळे जमते ते सर्वांच्या पाहण्यात असतेच. ह्या शेवाळ्यावरच पुष्कळ प्रयोग करून, संशोधकांना असे आढळून आले आहे की, शेवाळ्यातून अन्नोत्पादन विपुल प्रमाणात होऊ शकते. उदाहरणार्थ एक एकर जमिनीतून दोन टन धान्योत्पादन होते, तर एक एकर शेवाळ्यातून ५० टन धान्योत्पादन होऊ शकते. कॅलिफोर्निया येथील स्टॅनफोर्ड संशोधन संस्थेच्या वनस्पति तज्ज्ञांचे तर असे म्हणणे आहे की, थोड्याच कालात एक एकर शेवाळ्यातून २०० टन अन्नोत्पादन करणे शक्य होईल- म्हणजे एक एकर शेवाळे हे १०० एकर जमिनी इतके अन्नोत्पादन करू शकेल. अशा तऱ्हेने जर अन्नोत्पादन वाढले तर मग वाढत्या लोकसंख्येचे भय पुष्कळच कमी होईल.

शेवाळ्यातून उत्पन्न होणाऱ्या अन्नात शरीराला पोषक असे घटक कितपत असतील, अशी शंका येणे रास्त आहे. परंतु हे घटक अगदी गव्हाइतके नसले तरी सोयाबिनच्या अन्नघटकांशी ते बरोबरी करतात असे सिद्ध झाले आहे. याशिवाय खर्चाच्या दृष्टीनेही हे फारसे महाग पडत नाही. परंतु शेवाळे तयार करण्याकरिता जे मोठमोठे हौद बांधावे लागतात त्यासाठी मात्र प्रथम बराच खर्च येतो; मग मात्र सर्व अन्नोत्पादन कमी खर्चात करता येते. विशेष म्हणजे राहत्या घराच्या गच्च्यावर हौद बांधून, घरोघरही अन्नोत्पादन करता येईल.

इतकेच नव्हे तर रुंद तोंडाच्या नळ्या आडव्या ठेवून त्यात पाण्याच्या प्रवाहाची योग्य व्यवस्था करून त्यातही शेवाळे वाढवून अन्नोत्पादन करता येईल. आणि हे शक्य झाले तर अशा अनेक नळ्या ठराविक अंतरावर ठेवून कितीतरी शेवाळे उत्पन्न करता येईल. म्हणजे भविष्यकाळी आपल्याला ही शेवाळ्याची शेते, अनेक मजली इमारतीप्रमाणे आकाशात उंच गेलेली आढळतील. साहजिकच त्यांमुळे हवे तितके अन्न निर्माण होऊन जगाची अन्न समस्या शेवाळ्यातून सुटणार असे म्हटले पाहिजे.

■ ■ ■

# दुर्दैवी !

अ. वा. संघवी,
प्रथम वर्ष विज्ञान

लगता नहीं दिल मेरा उजडे दयारमें।
किसीकी बनी है आलमें ना पाये दारमें ॥

असेच झाले माझे त्या दिवशी माझे कशातच मन लागेना. मी भान गेल्याप्रमाणे दिवसभर घरात बसून होतो. माझा मित्र मोहन तीनदा माझ्याकडे येऊन गेला. त्याचे म्हणणे होते की मी त्याच्याबरोबर बाहेर फिरण्यासाठी यावे. परंतु मला घराबाहेर पडावे असे वाटतच नव्हते. नाहीतर एरव्ही माझे पाऊल घरात पाच मिनिटे देखील टिकत नसे, आज मला आसपासच्या प्रत्येक माणसाबद्दल तिरस्कार वाटू लागला होता. खरे म्हणजे आसपासच्या लोकांची काही एक चूक नव्हती मी माझ्या मनाला पटविण्याचा पुष्कळवेळा निरर्थक प्रयत्न केला होता आणि करीत होतो. डोक्यात नुसते विचारांचे काहूर माजले होते.

त्याचे असे झाले एक महिन्यापूर्वी प्रीडिग्री सायन्सचा रिझल्ट लागला होता. जी डिग्री मिळविण्यासाठी मी परीक्षेपूर्वीच्या महिन्यात माझी कसोटी पणाला लावली होती ती काही मला मिळाली नव्हती त्याचे मला काहीच वाटत नव्हते. तसेच घरातल्याही कुणाला काही वाटले असावे असे दिसत नव्हते कारण घरातील वातावरण विशेष तंग नव्हते. सर्वजण मला धीर देत होते.

त्यानंतर आठच दिवसांची गोष्ट त्या दिवशी सकाळीच माझा मित्र मोहन माझ्याकडे आला व " नव्या, अरे कॉंग्रॅच्युलेशन्स पहा इकडे " असे म्हणत त्याने हातात आणलेले वर्तमानपत्र माझ्यापुढे केले. त्यातील एका ठिकाणी त्याचे बोट होते. मी प्रथम त्याच्या तोंडाकडेच पहात राहिलो. व नंतर त्याने बोट ठेवलेल्या ठिकाणी पाहिले ज्यात मला तसेच आणखी दुसऱ्या विद्यार्थ्यांना प्री-डिग्री मिळाल्याबद्दल छापले होते. प्रथम माझा माझ्या डोळ्यावर विश्वासच बसेना. मोहन म्हणजे मला अगदी देवदूतासारखा वाटला. खरे म्हणजे कधीतरी ती बातमी मला कळलीच असती. परंतु मोहनने ती प्रथमच सांगितल्यामुळे तोच माझा खरा मित्र होय असे वाटले. त्याला कोठे ठेऊ आणि कोठे नको असे मला झाले.

त्यानंतर दिवस कसे निघून गेले ते मला कळले देखील नाही. आज त्या गोष्टीला पंधरा दिवस झाले होते. थोड्या वेळापूर्वीच पोस्टमनने जे पत्र दिले होते ते अजून माझ्या हातात तसेच होते त्या विद्यापीठाच्या पत्रात मजकूर होता, तुमच्या नावापुढे चुकून दुसऱ्या विद्यार्थ्याचे मार्कस मांडले गेल्यामुळे तुम्ही पास झाला असे जाहीर करण्यात आले होते. परंतु तुम्ही प्री डिग्री परीक्षेत नापास आहात.

डोक्यात एकदम मोठा घाव बसावा असे मला झाले. डोके एकदम सुन्न झाले. काय करावे तेच मला सुचेना. विद्यापीठातील लोकांबद्दलही मला तिरस्कार वाटू लागला. वाटले, साधे एवढे काम करता येत नाही तर हे लोक नोकरीचा राजीनामा का देत नाहीत ? एकदा नापास झालात म्हणून जाहीर करतात, नंतर पास झालात म्हणून जाहीर करतात आणि त्यानंतर नापास आहात म्हणून घरी पत्र पाठवतात ही काय रीत झाली ? का ते पैसे घेत नाहीत. ?

प्रथम ज्या निकालाबद्दल काहीच वाटले नव्हते तोच निकाल मला आता एव्हरेस्ट शिखरासारखा वाटू लागला होता.

■ ■ ■

# थोडीशी वाट पाहिली असतीस तर !

आनंद गरूड,
प्रथम वर्ष साहित्य

किर्र रात्र झाली होती. आकाशात ढग जमा झाले होते. सर्व नगर झोपी गेले होते. समोरील जुन्या, पडक्या राजवाड्यातील कंदील अधून मधून काजव्यासारखा चमकून आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देत होता. जवळूनच टिटवीने कर्कश आवाज काढला नंतर दूरून एका कुत्र्याचाही विव्हळण्याचा अस्पष्ट आवाज आला आणि पुन्हा तेही शांत, पुन्हा स्तब्धता, सर्वच भयाननेत विलीन झाले.

रामा आपल्या छोट्या धन्याच्या सुरक्षिततेसाठी परमेश्वराजवळ याचना करीत होता. त्याची मुद्रा गंभीर झाली होतो. पाराच्या चौथऱ्यावर एका बाजूला तुळशीच्या कुंडीशेजारी आपले चोंदलेले नाक खांद्यावरील अर्धवट मळलेल्या रुमालाने चोळून मोकळे करीत होता आणि पुन्हा समोरील जाईच्या वेलीशेजारच्या दाराकडे एकटक लावून पाहात होता. कडाक्याची थंडी पडली होती पण थंडीची जाणीवदेखील होत नव्हती परन्तु थंडीचे परिणाम मात्र त्याजवर दिसून येत होते. मधूनच घरातील करडे मांजर जवळून अंगावरील केस ताठ करून रामाच्या पाठीला घासून जाई व रामाला दिलासा देई. रामालाही हायसे वाटे. रामाने आपलीसाठी बाबा पाटलांच्या घरात घाविलली होती. छोट्या धन्याला त्याने अंगाखांद्यावर खेळविले होते. छोट्या धन्याच्या अंगावरील तिळा-तिळांशी रामाचा संबंध आला होता. विश्वासाने आपल्या धन्याची चाकरी करून घरात आपुलकीची भावना त्याने निर्माण केली होती.

बाबा पाटील नगरातील एक बडे प्रस्थ होते. त्यांचे मूळ नाव दिनकरराव पाटील पण गाव आदराने त्यांना बाबा पाटील म्हणत असे. ते वयाने वृद्धच होते पण काळ्या पांढऱ्या झालेल्या मिशाच्या झुपक्यावर हात फिरवून ऐन तारुण्याची ऐट आणायला काही कमी करीत नव्हते. बाबा पाटलांचे घर आर्थिक दृष्ट्या पुढे आलेले नव्हते तरी पेशव्यांच्या काळात आपल्या बापजाद्यांनी शौर्याने मिळविलेल्या जायदादीवर ते आपले घर चालवित होते. बाबा पाटलांच्या कुळातील सर्वांनी देशाच्या संरक्षणासाठी छातीची ढाल करून वार झेलले होते. स्वतः बाबा पाटलांना मात्र युद्धावर जाण्याचा प्रसंग एकदाही आला नाही आणि म्हणूच ते आपल्या भाग्याला दोष देत होते. पण देशाच्या प्रत्येक पवित्र कार्यात उत्साहाने भाग घेऊन गावाला आपल्या कर्तव्याची जाणीव करून देण्याचे काम प्रथम बाबा पाटील करीत. कोणत्याही क्षेत्रातील काम प्रथम बाबा पाटलांच्या हातून झाले नाही असे कदापिही घडले नाही. त्यामुळेच आज त्यांचा शब्द लाखप्रमाण झाला होता.

पण सदा आनंदी, उत्साही व विजयाची छटा सतत चेहऱ्यावर खेळविणारे बाबा पाटील आज मात्र चेहऱ्यावरील प्रत्येक आठीची हालचाल करीत होते. त्यांची एकटक नजर आपल्या थोरल्या मुलाच्या तसबीरीकडे लागली होती. मधूनच एकदम हातातील विडीच्या थोटुकाने तंद्रीतून जागे होत थोडेसे विचारमग्न झालेले बाबा पाटील पुन्हा आपल्या पिकल्या केसात हात घालून बसले होते. पलीकडच्याच सोप्याच्या खोलीत घराची मालकीण सारजा व धाकटा तरुण मुलगा सदानंद नुकतेच झोपलेले होते. थोड्याच वेळात घड्याळाने रात्रीचे बारा वाजल्याची खबर दिली. आणि नंतर पुन्हां शांत सर्व झोपी गेले. पुन्हा शांतता, स्तब्धता आणि बोचरी गंभीरता.

चार वर्षांपूर्वी बाबा पाटलांनी आपला थोरला पंचवीस वर्षांचा, कर्ता-सवरता पिकल्या हापूस अंब्यासारखा भरलेला आणि पिकल्या कागदी लिंबासारखा गोरा गरगरीत मुलगा, विजय, सैन्यात पाठविला होता व धाकट्या सदानंदला युद्धावर जाण्यासंबंधी बाबा पाटील सांगत होते व तोही मोठ्या आनंदाने तयार होता. विजय आपल्या कर्तबगारीमुळे आज मोठ्या हुद्यावर गेला होता. आज त्याच्या हाताखाली पक्षाच्या थव्याप्रमाणे मोठी फौज होती. थोड्याच दिवसात युद्धावर जाण्याचे सूचनावजा पत्र देखील त्याने आपल्या वडीलांना धाडले होते. आणि आज तर विजय प्रत्यक्षात युद्धावर जाणार होता. राष्ट्राबद्दल कितीही अभिमान असला तरी बाबा पाटलांनी देशाला आपल्या काळजाचा तुकडा तोडून दिलेला होता. कांही दिवसापूर्वी विजयच्या सुरक्षिततेसाठी त्यांनी घरातील कुलदेवतेला नवसही केला होता.

आगामी युद्धवार्ता ऐकण्यासाठी सर्व उत्सुक झाले होते. रामाला देखील ही बातमी समजली होती म्हणूनच आज त्याचे कामावर लक्ष देखील नव्हते. त्याने सैन्यात न जाण्याबद्दल छोट्या धन्यांना सूचनाही केली होती आणि आजतर साक्षात् युद्धावर जाण्यासंबंधी बातमी समजली होती. त्यामुळेच तो अगदी खिन्न मनःस्थितीत गुरफटून गेला होता.

शेजारच्या विठा काकूंची शान्ता अधून मधून बाबा पाटलांच्या घरी येऊन विजय बद्दलची विचारपूस करीत होती. शान्ता विजय युद्धावरून परत येईल अशी अभिवचने सारजेला देत होती. शान्ताला बाबा पाटलांच्या घराबद्दल इतकी आपुलकी कां निर्माण झाली होती तर शान्ताने आपले सारे बालपण विजयबरोबर घालविले होते. दोघेही बरोबरच वाढले होते. शान्तानेही आता नुकतेच तारुण्यात पदार्पण केले होते. ती तरी थोडीशी खुजी असली तरी हाडापिंडानें साजेल अशीच होती. रंग अगदी केतकीसारखा नसला तरी डाव्या गालाच्या खालच्या बाजूवरील तीळ तिच्या सौंदर्यात खासच भर घालीत होता तिने आतापर्यंत भावी आयुष्याची खूप खूप स्वप्ने रंगविली होती. विजयच्या गैरहजेरीत लहानपणी खेळलेले खेळ मनःचक्षुपुढे आणून ती आपले आत्मिक समाधान करून घेत होती पण आज तिचेही मनोरे भूकंपामुळे थरथरणाऱ्या इमारतीप्रमाणे थरथरूं लागले होते.

विजय युद्धावर गेल्यापासून एकही अधिकृत वार्ता बाबा पाटलांना मिळालेली नव्हती. त्यामुळेच ते अधिकच अस्वस्थ झाले होते. त्या रात्रीचे दहा वाजले असतील बाबा पाटील बाहेर जाईच्या वेळी खाली उभे होते. रामही नुकताच येऊन उभा राहिला होता. सदानंद व सारजा बाबा पाटलांच्या तोंडाकडे पाहून विस्कळलेल्या मनःस्थितीत उभी होती मागून शान्ता आली होती. तिने बाबा पाटलांना "काय पहाता" असा शब्द उच्चारताच समोरच्या चमचमणाऱ्या ताऱ्यामधील एका ठळक ताऱ्याने आपली जागा बदलली आणि सर्वांच्या मनात चर्रर्र झाले.

आघाडीवर विजयची फौज नेटाने चाल करीत होती पण काळाने ओढ घेतली. पुढील महत्त्वाचे ठाणे हस्तगत करण्याच्या प्रयत्नात त्याची जीप सुरुच्या झाडावर आदळली छातीला जबर मार लागल्याने तो बेशुद्ध झाला थोड्याच वेळानं तो शत्रुकडून कैद केला गेला व विजयच्या सैन्याची शत्रुकडून हा हा म्हणता निर्घृण अशी हत्या केली गेली.

बिजय ठार झाल्याची तार बाबा पाटलांना घरी आली. घरात एकच एक गोंधळ माजला. वादळाच्या व पाण्याच्या वर्षावात सापडलेल्या जहाजाप्रमाणे सर्वांची परिस्थिती झाली होती. कोणीही कोणाला दोष न देता प्रत्येकजण आपल्या भाग्यावर फुल्या करीत होते. बाबा पाटलाचे दुःखाश्रु बाबा पाटलांना पुढील दिशा दाखविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठ करीत होते. पुढील क्षणीच त्यांनी सदानंदाचे नाव सैन्यभरतीत नोंदवून देशकार्यासाठी दुसरा मेरूमणी टांगून ठेवला व आपले कर्तव्य पुरे करून घराण्याचा इतिहास पुन्हा एकवार उजळून उज्वल केला.

इकडे शान्ताचे मनोरे क्षणार्धात विस्कटून पुन्हा पंचतत्त्वात विलीन झाले होते.

संपूर्ण एक दिवसानंतर विजय शुद्धीवर आला. आणि पहातो तो तर तो शत्रुच्या छावणीत आपल्या छावणीपासून किमान पाच सहाशे मैल दूर शिवाय या पहाऱ्या-

तून निसटून जाणे म्हणजे सात सात समुद्र ओलांडण्या-सारखे कठिण होते. परन्तु नशीब चक्रासारखे अस्थिर असते. थोड्याच वेळात छावणीतील एका कोपऱ्यात दारूचा छोटासा स्फोट झाला. आणि छावणीने पेट घेतला धुराचे लोटच्या लोट आकाशात विहार करूं लागले. विजय जळून गेल्याचे समाधान सर्व शत्रुसैन्याच्या तोंडावर उमलू लागले पण......लवकरच त्यांना कळून चुकले की तत्पुर्वीच विजय पळून गेलेला होता तरी देखील एका वयस्कर सैनिकाला विजयची चाहुल लागली व त्याने लगोलग त्या दिशेने दोन तीन बार काढले. दुर्दैवाने विजयच्या उजव्या पायाच्या पोटरीला एक व दुसरी गोळी डाव्या हाताच्या दंडाला नकळत चाटून गेली पण तरी देखील विजयने आतापर्यंत खूपच अंतर तोडले होते. किंबहुना तो शत्रूच्या तावडीतून संपूर्णपणे निसटून गेला होता.

विजयच्या एका पायातून रक्ताच्या गाठी बाहेर पडत होत्या, त्यावर पाला बांधून रक्तस्राव थांबविण्याचा तो एक-सारखा प्रयत्न करीत होता जवळ अन्नाचा कणही नाही अशा परिस्थितीत पाणी व पाला खावून तो जनावराप्रमाणे मार्ग आक्रमित होता. अंगावरील कपड्यांच्या चिंध्या झाल्या होत्या. दाढी वाढल्याने तोंडही नीट दिसत नव्हते कितीतरी दिवसापासून रानटी श्वापदे व जनावरे यांना तोंड देता देता तो बेजार झाला होता. शरीर रोगराईने पछाडलेल्या रोग ग्रस्थाप्रमाणे झाले होते. पाय सुजून गेले होते. प्रत्येक पाऊल देवाचे नाव घेऊन तो टाकत होता. अशा बिकट व अडचणीच्या प्रसंगातून तो एके दिवशी मध्यान्हाच्या सुमारास आपल्या छावणीजवळ आला. परन्तु छावणीत जाण्यापूर्वीच त्याच्या मनात भावनांच्या चलबिचलीचा रणसंग्राम सुरुं झाला होता. युद्धात बळी पड-लेल्या आपल्या हजारो साथीदारांची आठवण पुन्हा एक-वार आपल्या डोळ्यासमोर आणून व अत्यंत शोकाकुल परिस्थितीत डोळ्यातील आसवांनी त्यांना श्रद्धांजली वाहून त्याने आपली दिशा बदलली.

सकाळचे सात वाजले होते. सूर्य नुकताच डोकावून धरणीमातेला धुंडून काढत होता. पाखरे त्याला साथ देत होती. कुणबी आपल्या औतकाठ्या घेऊन शेतावर चालले होते. त्याच दिशेनें पाच सहा स्त्रियाही नदीवर पाणी आणण्यासाठी एक डोईवर व कंबरेवर एक माठ घेऊन चालल्या होत्या. पक्षांचा चिवचिवाट कानाला आनंद देत होता. वासरे गळ्यातील दोराला हिसके देवून आईच्या ओढाला लागली होती अशा मंगलप्रसंगी विजय एका ओळखीच्या टांग्यात बसून आपल्या वाड्यासमोर आला. टांग्याची घंटा वाजताच विजयच्या घराचा दरवाजा उघडण्यापूर्वीच शेजारच्या विठाकाकूंची शान्ता आपले दार सताड उघडून बाहेर आली. विजयकडे पहाताच तिच्या कंबरेवरील कळशी निसटून तिच्या पायावर पडली व तत्क्षणीच ती जमिनीवर कोसळली. विजय, शान्ताला सावरण्याचा प्रयत्न करीत असतानाच त्याचा उजवा पाय चमकला व तोही शान्ता जवळच कोसळला. डोके वर करून पहातो तो तर शान्ताच्या गळ्यात मंगळसूत्र, तत्क्षणी स्वतःच्या गळ्याला फास लागल्याचा भास विजयला झाला. परंतु हिन्दु पद्धतीनुसार तिला लवकर नाइलाजाने लग्न करणे इष्ट होते हे तिच्या चेहऱ्यावरील प्रत्येक रेषा त्याला सांगत होती. विजयच्या सर्व भावना ओळखून शान्ता आपल्या मृदू भाषेत उच्चारते "फार उशीर झाला" तत्क्षणी विजय तितक्याच ओघवी भाषेत उद्गारला "थोडीशी वाट पाहिली असतीस तर...!"

▣ ▣ ▣



# दाढी नसती तर !

सतीश खंडागळे,
प्रथम वर्ष विज्ञान

अरे रमेश बरं झालं भेटलास ते. कुठे निघालास ? मी तुझ्याकडेच निघालो होतो तुला निमंत्रण द्यायला. तू म्हणशील काय काढलस बुवा ? पण ते नंतर विचार. आज संध्याकाळी पाच वाजता फराळाला तू ये. म्हणशील, दिवाळी तर अजून खूपच लांब आहे आणि तू तर आजच बोलावतोस. अरे रम्या, आज ना मी माझ्या दाढीचा वाढदिवस साजरा करण्याचं ठरवलंय. तू म्हण-शील लोक आपल्या मुंजीचा, लग्नाचा वाढदिवस साजरा करतात, हा मात्र दाढीचा साजरा करतोय ! काय विचित्र माणूस आहे ! बरं ते जाऊ दे. तू मात्र नक्की ये. प्रकाश, सुरेश पण येणार आहेत. खरं सांगू का रमेश तुला, अरे उद्या आपला दिवाळी सुट्टीचा एन्. सी. सी. कॅंप जाणार आहे. बरोबर एक वर्षापूर्वी मी जेव्हा N. C. C. त दाखल झालो, तेव्हा हवालदारसाहेब म्हणाले, दाढी केल्याशिवाय परेड करायची नाही. तो प्रसंग नेमका आज या कॅंपमुळे आठवला व त्याबरोबर आरसा पाहिला, ती दाढी वाढलेली म्हटल परत कॅंपमध्ये आपली बिन-पाण्याची होऊ नये म्हणून सकाळीच वस्ताऱ्याने नापिता-कडून करून आलो. बरंय जाऊ का ? संध्याकाळी मात्र जरूर जरूर न विसरता ये हं !

लोकांच्या पुढे मोठे मोठे प्रश्न उभे रहातात. "सूर्य उगवला नाही तर ?" पाऊस पडला नाही तर ? "दारू-बंदी नसती तर ?" "तिसरं महायुद्ध सुरू झालं तर ? तर काय होईल ? अहो पण मी म्हणतो कशाकरिता त्या-बद्दल एवढी काळजी करायची. म्हणतात ना "घरच झालं थोडं आणि व्याहानं धाडलं घोडं". अहो, स्वतःच्या अडचणी सोडवता सोडवता मारामार आणि लागलेत जगाचीकाळजी करायला.

मला सर्वात मोठी अडचण वाटते, ती म्हणजे मनु-ष्याला जर दाढीच नसती तर ? माझ्या दृष्टीने या प्रश्नाचे उत्तर सोपे आहे. ते म्हणजे माझी N. C. C. परेड बुडणार नाही. प्राध्यापकांचा, ऑफिसरांचा दिवसाआड दाढीचा त्रास वाचेल वगैरे वगैरे.

पण माझ्या मनात एकदम वेगळाच विचार आला. दाढी नसलेले शिवाजी महाराज, समर्थ रामदास कसे वाटतील बरं ! दाढीशिवाय रविंद्रनाथ किंवा गोळवलकर गुरुजी तर कसेसेच वाटतील. इतकं कशाला दाढीशिवाय अशोक मेहता ओळखता येतील का कुणाला ? उलट याच दाढीमुळे सुभाषबाबू तुरुंगातून सुटूं शकले. 'एसेम'ना याच दाढीमुळे "इमाम अल्ली नूरभाई" बनता आलं ! फार फार कशाला रशियाच्या बुल्गानीनं दाढीच ठेवली नसती तर, "बुल्गानीन फॅशन" पडलीच नसती.

काही व्यक्तींना खरोखरीच दाढी शोभून दिसते. मात्र हे "हे वस्त्र घडी केलेले आहे तोपर्यंतच शोभून दिसते" असे चारुदत्त म्हणतो. हे मात्र खरं आहे. काही कवींना म्हणे त्यांच्या कवितेपेक्षा दाढीच शोभून दिसते !

बाकी एक गंमत वाटते ती अशी की दाढी वाढविल्याचा राग यायचा तो " नापित " वर्गाला. समजा, उद्या दाढी वाढविणाऱ्यांना सरकारने काही विशेष सवलती दिल्या तर उत्पन्नावर परिणाम व्हायचा तो "नापितांच्या" बाकी दाढ्यांची पाती, दाढीचा साबण, ब्रश इ. साधनांचा खप एकदम कमी होईल नि या महागाईच्या दिवसात चार पैसे वाचतील हे समाधान मात्र मिळेल हे मात्र निश्चितच.

बाकी दाढीमध्ये प्रकारही पुष्कळ आहेत. भरघोस दाढी वाढविणारा व विरक्तीचा आव आणणारा हा कोणीतरी राजकीय संत वा भक्तिमार्गावरील प्रवासी असतो. थोडीबहुत दाढी वाढली असली तर सौभाग्यवती माहेरी गेल्याने काही काळ एकाकी जीवन कंठणारा विरही असेल. दिवसातून दोनदा दाढी घोटणारा हा एखादा " चॉकोलेट हिरो " असेल किंवा नूतन परिणीत असेल या विवाहेच्छू असेल.

बाकी दाढी वाढविली म्हणजे त्याप्रमाणात मेंदूच्या तल्लखपणात वाढ होतेच असे नव्हे. " लांब दाढीचा माणूस मूर्ख असतो " हे वाचनात आल्यावर स्वतःची दाढी दिव्यावर जाळून घेणाऱ्या नि पर्यायाने त्या विधनाची सत्यता स्वतःच अनुभवणाऱ्या शहाण्या काजीची कथा कोणाला माहिती नाही? हे सर्व खरं असलं तरी संत-महंतावर अपार श्रद्धा ठेवणाऱ्या भारतात दाढीला एक आगळे महत्त्व आहे यात शंका नाही.

दाढीमुळे काही विशिष्ट जाति-जमातींना विशेष महत्त्व आहे. उदा. शीख लोक. शीख लोक हे दाढीमुळे विशेष परिचित आहेत. अर्थात ते दाढी कां राखतात हे त्यांचे त्यांनाच ठाऊक म्हणा. काही लोक दाढीची टर उडविण्यांत व ओढण्यात फारच उपयोग करतात. अहो, दिल्लीला परवाच, लोकसभेत आपले अन्नमंत्री श्री. सुब्रह्मण्यम् यांनी श्री. कामत (स. प. खासदार) यांच्यावर " बोकड दाढी"चा आरोप केला की नाही? म्हणजे श्री. सुब्रह्मण्यम् यांनी हा एक दाढीचा नवीन प्रकारच शोधून काढला म्हणा! जर श्री. कामत यांना दाढीच नसती तर? तर लोकसभेत वादच निर्माण झाला नसता. आपल्या विधानसभेत एका आमदाराने " विनोबा दाढी वाढवून तत्त्वज्ञान सांगत फिरतात " असा आरोप केला. म्हणजे " दाढी वाढली म्हणजे उपदेश करण्याचा विशेष हक्क येतो असे नाही ना त्या आमदाराला वाटले? असावे. अर्थात यामुळे दाढी ही विद्वत्तेशी निशाणी का स्वतःकडे मोठेपणा हा वाद निर्माण होतो.

अशा तऱ्हेने दाढीचा विचार करताना खूप तर्कवितर्क मी केले पण दाढीबद्दल मात्र जास्त आकर्षण वाटू लागले. कारण दाढीमुळे पुरुषाचे पौरुषत्व सिद्ध होते. मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वात चटकन बदल होतो, व मनुष्य रुबाबदार दिसतो. तो रणजितसिंहाचा फोटो पाहिला की अंगात त्वेष येतो आणि असं वाटतं, आत्ताच्या आत्ता हिमालयावर जाऊन त्या चिन्यांचा नायनाट करावा!

हे कां? तर रणजितसिंहाच्या व्यक्तिमत्त्वाला शोभून दिसणाऱ्या त्याच्या दाढीमुळे. दाढीमुळे जोष येतो तो असा. मला तर असं वाटतं, मुस्लिम राज्यकर्त्यांना उदा० औरंगजेब, शहाजान इ० बादशहांना " शेहनशहा " ही, पदवी शोभत असेल तर ती त्यांच्या दाढीमुळेच होय.

अशा तऱ्हेने मी हळूहळू बदलू लागलो आणि शेवटी निश्चय केला की कँपनंतर दाढी राखायची व रुबाबदार N, N. C. ड्रेसवर फोटो काढायचा.

इतक्यात रमेश-प्रकाश-सुरेशचं " संगम त्रिकूट " फराळाला पांच वाजता येऊन थडकलं. पण मी मात्र चांगलाच हादरलो. कारण " दाढीच्या वाढदिवसाची " घरात कोणालाच कल्पना दिली नव्हती. शेवटी गेलो "अजंठा" मध्ये आणि इडली–डोशावर ताव मारून आलो. पण मला मात्र चांगला तीन रुपये भुर्दंड पडला. याचे कारण होती माझी दाढी. शेवटी पश्चाताप झाला आणि म्हटले " दाढी नसती तर " ?......?......??





## पुणे विद्यापीठाच्या १९६४ च्या पदवीपूर्व विज्ञान शाखेच्या परीक्षेत प्रथम वर्ग मिळविणारे आमचे विद्यार्थी



श्री. पांडुरंग वालगुडे



श्री. भरतकुमार चावरे



श्री. नलिन मारवाडी



श्री. द. सं. कदम



श्री. किरण मेहता

## नासिक क्रिकेट विभागातर्फे खेळण्यासाठी निवड झालेले विद्यार्थी



श्री. प्रभुणे, प्रथम वर्ष विज्ञान आणि श्री. श्रीकृष्ण वडवे, द्वितीय वर्ष साहित्य.

# आई !


अनिलकुमार पहाडे
प्रथम वर्ष वाणिज्य


मराठीचा तास होता. सर वर्गात यशवंतांची 'आई' कविता शिकवीत होते कवितेतील हृदयस्पर्शीपणा व सरांची मन लावून शिकवण्याची हातोटी यामुळे सारेजण गहिवरून आल्यासारखे दिसत होते. मी सहज शेजारी बसलेल्या अशोककडे पाहिले, तो बिचारा अगदी रडायला आला होता. त्याची माझी दृष्टीभेट होताच डोळ्यांतील पाणी व तोंडावरील खिन्नपणा दूर करून हसण्याचा खोटा प्रयत्न तो करू लागला. त्याच्या त्या केविलवाण्या प्रयत्नांची मला कीव आली. त्याच्याबद्दल कुतूहल आणि आपुलकी वाटू लागली. मी त्याला 'मधल्या सुटीत बोलू असे सांगून अभ्यासाकडे लक्ष देऊ लागलो.

तास संपला. त्याला विचारले, "कां रे, अगदीच रडकुंडीला आला होतास?" त्याने ओठावरून जीभ फिरविली व डोळयाच्या कोपऱ्यातील अश्रू पुसले. तो म्हणाला, "नाही रे, सर कविता फार चांगली शिकवित होते." "कितीहि चांगली शिकवली तरी काय रडायला येतं होय रे?" मी उलट प्रश्न केला. मला वाटले की हा काही तरी सांगायचे टाळतोय. म्हणून त्याला म्हटले, "बघ अशोक, विनाकारण दुःख मनात ठेवून स्वतःला क्लेश करून घेण्यात काही अर्थ नाही. दुःखाचा भार ते दुसऱ्याला सांगितल्याने कमी होतो. अरे, मित्राला जर तू आपले दुःख सांगत नाहीस तर आम्ही मित्र काय कामाचे? फक्त तुझ्याबरोबर मजा करण्यापुरतेच का रे? काहीही कर बुवा पण खरे काय ते कळू दे एकदा" जरा शांत झाल्यावर तो सांगू लागला, "माझे दुःख मी कोणाला सांगत नाही, माझे म्हणणे ऐकून चुकचुकणारी, अरेरे म्हणणारी व कोरडी सहानुभूती दाखवणारी माणसे मला नकोशी वाटतात. आणि त्यांचे ते नेहमीचे ठराविक साच्याचे चुकचुकणे आणि उन्हात तापलेल्या एखाद्या गोल गरगरीत दगडासारखी त्यांची सहानुभूती, अगदी वीट आलाय बघ त्याचा, मग मला सहानुभूती, खरे प्रेम खरी माया कोण देईल बरं? कोणी वाटते मला खरे प्रेम खरी माया कोण देईल बरं? कोणी कोणीच देऊ शकणार नाही व मी तशी अपेक्षा करणेही मूर्खपणाचे आहे. कारण सर्वजण जिच्याबद्दल एवढे वर्णन करतात, व जिच्या थोरपणाची साक्ष पटवून देणारी, हृदय भेदून टाकणारी कविता यशवंतांनी लिहिली ती, ती आईच मला नाही. अन् बहीणही नाही. मग सांग अनिल, अशा वेळी माझ्या वागण्यात जर वेगळेपणा आला तर तो माझा दोष आहे का?

"कधी कधी विचार येतो, जर माझी आई आज असती तर? तर हा अशोक अशोकच असता, त्याला शोक करण्याची पाळी आली नसती कधीच! वाटतं, आपल्याला आईने काय नावाने हाक मारली असती बरं? अशोक? बाळ्या? की अशा. माझ्या हातून चूक झाली असती तर कसे समजावलं असते तिनं? मी काम करत नाही म्हणून कशी रागावली असती ती? मीं

आजारी पडलो असतो तर कशी शुश्रूषा केली असती तिने माझी ? अशा वेळीं मी पूर्ण सुखात डुंबत राहिलो असतो. मी कसा बरे वागलो असतो तिच्याशी ? तिची आज्ञा पाळून करून तिला सुख दिले असते ना ? की एखाद्या दुसऱ्या मुलाप्रमाणें तिची अवज्ञा करून खूप त्रास दिला असता तिला ? आपण साधं ठेंचाळलो तर 'अग आई ग!' म्हणतो. आपण देवापेक्षा देखील आईलाच प्रथम आठवतो. कारण देव ही जरी महान शक्ती असली तरी त्याची जाणीव आईच आपल्याला करून देते. शिवाय देव हा केवळ दगड. घडविलेला पाषाण याच स्थितीत आपल्याला दिसतो. या उलट आईच्या अवर्णनीय प्रेमाची वर्षा आपण रात्रंदिवस अनुभवतो. आपण पहिल्यांदा बोलायला शिकतो ते 'आई' या शब्दापासूनच ना ! आणि आई हाच आपला सर्वांत लाडका शब्द

तुम्ही माझे सगळे मित्र कधी कधी म्हणता, आज माझी आई माझ्यावर फार रागावली, अशी बोलली, तशी बोलली, माझ्यासाठीं तिने हे केले, ते आणले. अशा वेळीं मला फार हेवा वाटतो तुमचा आणि मग मनात विचार येतो मला इतक्या स्त्रिया भेटल्या त्यातल्या कोणी मला आईसारखा ळळा लावतील का ? अशा वेळी मी त्यांनाच "आई" मानून मनाचे समाधान करून घेतो. कधी वाटतं, आपल्याला बहीणही नाही. जर एखादी मानलेली बहीण आपल्याला असती तर ! पण माझ्या ह्या भावना जाणून घेण्याचा प्रयत्न कोणीच करत नाही. मी मग जगावर खूप चिडतो."

इतक्यात मधली सुट्टी संपल्याची घंटा झाली वर्गाकडे जाता जाता तो मला म्हणाला, "खरंच, आई म्हणजे अमूल्य ठेवा आहे. तिच्या सानिध्यांत तिची किंमत कळत नाही. तिला आपण टाकून बोलतो, लाथाडतो. पण तीच व्यक्ती आपल्या आईला मुकली तर मात्र त्याला पदोपदी जन्मभर आपल्या वागणुकीचा पश्चात्ताप होतो. आणि आपण आपल्या आईला समाधान देऊं शकलो नाही ही खंत सतत हृदयाला टोचत राहाते."

वर्गात बसून मी अशोकच्या दुःखाने करपलेल्या हृदयातील, व कोरड्या सहानुभूतीला विटलेल्या मनांतील अनुभवाच्या बोलातील शब्दांशब्दांचा अर्थ लावत होतो. आणि माझे मन मग जास्तच उदास बनत होते.

▣ ▣ ▣


Sathe Biscuits, Cocoa and Chocolates

पो. बॉ. ७४

फो. नं. ९५

मेसर्स शहा मगनलाल भोगीलाल

दुकान, बारामती

किराणा होलसेल आणि पेंढीचे व्यापारी

साठे बिस्किटस् व डालमिया बिस्किटस्.




## धन्य धन्य जवाहरलाल—


**मोहन नाइकरे,** पदवीपूर्व साहित्य


भारत शांतिमय देशात
स्वातंत्र्याच्या काळात
जवाहर नेता झाला
भारताचा पाठीराखा बनला
जय जवाहरलाल बोला जी जी ॥ १ ॥

गादीवर वीर तो आला
तेजाने चमकू लागला
भूतली वीर गाजला
लोकशाहिला प्रणाम केला जी जी ॥ २ ॥

अण्वस्त्राने पेट घेतला
ज्याला उपाय नाही उरला
मदतीला त्वरित धावला
पुढे त्यातून मार्ग दाविला
शान्तीचा धडा शिकविला जी जी ॥ ३ ॥

चीनने डाव साधला
पाकिस्तान मित्र बनविला
आणि दोघांनी हल्ला केला
भारत देश गिळण्याला
पण धैर्य मेरु नाही ढळला जी जी ॥ ४ ॥

केनेडीला जवळ केलं
ख्रुशोवशी बोलणं केलं
शांतीचे महत्त्व पटविलं
त्रिखंडात नाव मिळवलं जी जी ॥ ५ ॥

तो काळ-दिन उगवला
हा सूर्य अस्ताला गेला
शांतीचा तारा निखळला
मानवतेचा वाली हा गेला
अनंतात विलीन झाला जी जी ॥ ६ ॥

ते गेले परलोकात
राहिले पंचशील फक्त
चला आधार देऊ त्याला
करू प्रणाम पंचशीलाला
धन्य धन्य जवाहर झाला जी जी ॥ ७ ॥

## साळीच्या शेतात—

कुंडलिक बगाडे
पदवीपूर्व साहित्य.

फाटके तुटके तनूवर लुगडे
जरि चोळीचे झाले तुकडे
रानीं कोण ती उभी एकटी, घेऊनी हाती कोयते ॥ १ ॥

कमल कलिकेपरी कोवळी
बांधा ठुसका काळी सावळी
पदर शिरीचा सांवरण्याला, सारखी धडपडते ॥ २ ॥

गरीबीतहि ही सुखी किती दिसते
नयनांतुनि निर्भयता हसते
वाट कुणाची बघण्यासाठी, दृष्टि भिरभिरते ॥ ३ ॥

दूर कुणी तरी दिसता 'अपुले'
सूक्ष्म लहरींनी शरीर भरले
सभोवती जसे शेत साळीचे, पवनी सळसळते ॥ ४ ॥

दुनिया हिची ही अशी आगळी
जाई विसरुनी दुःखे सगळी
वास्तव दुनियेच्या तापातुनि, शीतलता झुळझुळते ॥ ५ ॥

फाटो जरि हे वस्त्र अंगचे
तुटो जरि दो घास पोटचे
परि तुटो न हे नाते 'अमुचे' मनि ती पुटपुटते ॥ ६ ॥



## व्यथा—

—कु. प्रमोदिनी सावंत
प्रथम वर्ष विज्ञान

मनाच्या मातीला
लावुनी कस्तुरी
दूर तू गेलास
शोधिते तिमिरीं

प्रीतीच्या वीणेची
तुटली रे तार
निराश जाहले
उरला झंकार

आशेचे पांखरु
तुला रे शोधिते
स्वप्नातच स्पष्ट
दर्शन घडते

भेटी या जीवनीं
होतात कशास !
जिवंत असुनी
लागे गळफास.

जाते जाते मीच आता
